म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
क्र. १२४९




REFBK-0010901

# शब्दसृष्टीचे ईश्वर

—बाळशंकर देशपांडे.

# शब्दसृष्टीचे ईश्वर

बालशंकर देशपांडे

आतां वंदूं कवेश्वर । शब्दसृष्टीचे ईश्वर ।
ना तरी हे परमेश्वर । वेदावतारी ॥

अनुक्रम २८८०६
विभाग निबंध
क्रमांक ११२८
नों. १८



REFBK-0010901

पुरस्कार : डॉ. रा. शं. वाळिंबे

१०८०१

दोन रुपये

वोरा ऑण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि.

श्री : २६९

★

© : १९६०

सौ. पद्मावती देशपांडे

आवृत्ति पहिली
१९६०

मूल्य २ रुपये

पृष्ठसंख्या : १२०

प्र का श क :

**अ. ल. गाडगीळ**
वो रा ॲ ण्ड कं प नी
पब्लि. प्रा. लि. करितां
३, रा उं ड बि ल्डिं ग
काळबादेवी, मुंबई २.

मु द्र क :

**ज. ग. जोशी**
ज ना र्द न प्रे स,
३९४ सदाशिव पेठ,
पुणें -२.

आपल्या लोकोत्तर व्यक्तिमत्वानें

औदुंबर (उमरखेड) क्षेत्रास

पावन करणाऱ्या सर्व संत

मंडळींस भक्तिभावपूर्वक

स म र्प ण.

□

पुरस्कार

माथा लववितांना–

शब्दसृष्टीचे ईश्वर


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ ज्ञानेश्वर | ... | १ |
| २ नामदेव | ... | २१ |
| ३ एकनाथ | ... | २७ |
| ४ तुकाराम | ... | ३६ |
| ५. रामदास | ... | ४३ |
| ६ मुक्तेश्वर | ... | ५२ |
| ७ भूषण | ... | ५७ |
| ८ सूरदास | ... | ६३ |
| ९ तुलसीदास | ... | ७० |
| १० कृष्णदयार्णव | ... | ७८ |
| ११ उत्तमश्लोक | ... | ८४ |
| १२ कबीर | ... | ९१ |
| १३ श्रीधर | ... | ९७ |
| १४ आध्यात्मिक लोकशाहीचे प्रणेते | ... | १०६ |
| १५ महाराष्ट्रांतील संत कवयित्री | ... | १११ |

# पुरस्कार

लघुकथा, लघुनिबंध, कादंबरी, कविता, प्रवासवर्णन व वाङ्मयीन टीका इतके वाङ्मयप्रकार हाताळून श्री. बालशंकर देशपांडे मराठी वाचकांच्या परिचयाचे झालेलेच आहेत. आतां त्यांनीं वाङ्मयाच्या वेगळ्या दालनांत प्रवेश केला आहे आणि या नवीन दालनांतील सौंदर्याचें मर्म विशद करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे.

ज्या हेतूनें त्यांनीं हें कार्य केलें आहे तो हेतु बऱ्याच प्रमाणांत सफळ झाला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. मराठी भाषा ज्यांनीं समृद्ध केली व तिच्या द्वारें बहुमोल विचारधन निर्माण केलें असे थोर जुने कवि श्री. देशपांडे यांनीं विवेचनासाठीं घेतले आहेत. ज्ञानेश्वर नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, मुक्तेश्वर कृष्णदयार्णव, श्रीधर या श्रेष्ठ कवींच्या कार्याचा थोडक्यांत परिचय करून देऊन त्यांच्या वाङ्मयांतील कला-गुणांचाहि श्री. देशपांडे यांनीं परामर्श घेतला आहे. प्रत्येक लेखासाठीं विशिष्ट मर्यादा आखून घेतल्यामुळें हें विवेचनाचें काम अधिक तपशीलवार करण्यानें त्यांना जमलें नाहीं हें स्पष्ट दिसत आहे. तथापि या कवींच्या अवतारकार्याचें मर्म त्यांनीं यथातथ्य रीतीनें आविष्कृत केलें आहे.

'शब्दसृष्टीचे ईश्वर' हें पुस्तकाचें शीर्षक वाचतांच निरनिराळ्या कवींच्या वाङ्मयांतील साहित्यगुणांचेंच परिपूर्ण दर्शन घडविणें हा लेखकाचा हेतु असावा असें वाटतें. पण केवळ साहित्यगुणांचें विवेचन करणें एवढाच हेतु श्री. देशपांडे यांनीं मनांत ठेविलेला आहे. या कवींच्या भोंवतालच्या सामाजिक परिस्थितीच्या अनुसंधानानें त्यांनीं त्यांचें आध्यात्मिक व सामाजिक कार्य स्पष्ट केलें आहे. आणि हें करीत असतांनाच त्यांच्या वाङ्मयांतील भाषासौंदर्यादि गुणांचीहि त्यांनीं थोडीफार चर्चा केली आहे.

वर उल्लेखिलेल्या विख्यात जुन्या कवींचें विवेचन जिज्ञासु वाचकांच्या दृष्टीनें उपयुक्त आहे. याच्याच जोडीला श्री. देशपांडे यांनीं जुन्या मराठी कवयित्रींचा एका स्वतंत्र प्रकरणांत चांगला परिचय करून दिला आहे. मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, चोखामेळ्याची बायको सोयराबाई या कवयित्रींच्या कार्याचें विवेचन या प्रकरणांत आलें आहे. या प्रकरणाच्या शेवटीं बहिणाबाई आणि समर्थ-शिष्या वेणाबाई यांचा त्यांनीं अगदीं ओझरता उल्लेख केला आहे. या दोन कवयित्रींच्या कार्याचें विवेचन प्रस्तुत

पुस्तकांत यावयास हवें होतें असें मला वाटतें. तसेंच ' धवळे ' लिहिणारी आद्य कवयित्री महदंबा हिच्या कार्याचाहि परामर्श घेणें जरूर होतें.

श्री. देशपांडे यांनीं केलेली एक चांगली कामगिरी म्हणजे प्रस्तुत पुस्तकाच्या ११ व्या प्रकरणांत त्यांनीं करून दिलेला उत्तमश्लोक या कवीचा परिचय. प्राकृत सप्तशतीकार उत्तमश्लोक हा एक उपेक्षित कवि आहे. कृष्णदयार्णवाच्या या शिष्याची माहिती फारच थोड्या वाचकांना असेल. या कवीची इतकी चांगली व तपशीलवार माहिती अन्यत्र आढळावयाची नाहीं. श्री. देशपांडे याबद्दल अभिनंदनास पात्र आहेत.

वामन पंडित, रघुनाथ पंडित, सामराज व मोरोपंत यांचें विवेचन प्रस्तुत पुस्तकांत अगदीं आलें नाहीं. तसेंच महानुभाव कवींपैकीं नरेंद्र, भास्करभट्ट बोरीकर व दामोदर पंडित याहि कवींची चर्चा लेखकानें टाळली आहे. पुस्तकाची जी मर्यादा मुळांत आखून घेतली असेल; त्या मर्यादेत या कवींची चर्चा करणें शक्य झालें नसावें.

पण ही उणीव असली तरी तिची भरपाई श्री. देशपांडे यांनीं अन्य प्रकारानें केली आहे. कांहीं हिंदी कवींचा त्यांनीं थोडक्यांत चांगला परिचय करून दिला आहे. भूषण कवि, सूरदास, तुलसीदास व कबीर या हिन्दी कवींचा प्रस्तुत पुस्तकांत अंतर्भाव झालेला आहे. हिंदी साहित्याशीं ज्यांचा प्रत्यक्ष परिचय नाहीं अशा मराठी वाचकांना हीं प्रकरणें फार उपयुक्त वाटतील.

कवींच्या भोंवतालची परिस्थिति समजावून घेऊन त्यांच्या काव्यांतील आशय व कलात्मक सौंदर्य थोडक्यांत प्रकट करण्याचा प्रयत्न श्री. देशपांडे यांनीं सर्वत्र केलेला दिसतो. मधून मधून कांहीं तात्त्विक विवेचनहि आलें आहे. तेंहि अभ्यासक्रमाच्या दृष्टीनें उपयुक्त आहे.

सर्वसामान्य जिज्ञासु वाचक डोळ्यांसमोर ठेवूनच श्री. देशपांडे यांनीं हें पुस्तक लिहिलेलें दिसतें. या अल्पश्रुत वाचकांची जिज्ञासा पूर्ण करण्याचें कार्य हें पुस्तक खास करूं शकेल. पुढें केव्हां तरी सवडीनें या पुस्तकांतील माहितींत व विवेचनांत भरपूर भर घालून तें श्री. देशपांडे बहुश्रुत वाचकांच्या दृष्टीनेंहि वाचनीय करतील अशी उमेद बाळगतों.

१२ सप्टेंबर, १९६० **रा. शं. वाळिंबे**

# माथा लववितांना–

बैलांचा बाजार आणि गोचरस्वामीचा मठ या दोहोंबद्दल आमचा गांव प्रसिद्ध असल्याचें मी लहानपणीं भूगोलाच्या पुस्तकांत वाचलें होतें. बैलांना व संन्याशांना एकाच दावणीनें बांधणाऱ्या या आधुनिक पाणिनीचा अभावित 'विनोद' त्या वेळच्या आमच्या बालबुद्धीला कळणें शक्य नव्हतें ! उलट, 'शुद्ध बैल आहांत तुम्ही, मठांत जाऊन पोट फुटेस्तोंवर चरायला पाहिजे तुम्हांला. अभ्यासाकडे कशाला लक्ष द्याल ?' हे त्या वेळच्या एका खाष्ट गुरुमाउलीचे शब्द कानांवर आदळूं लागले म्हणजे भूगोलांतली आमच्या गांवाविषयींची ती माहिती बिनचूक असल्याची आम्हां बालगोपाळांची खात्री होई !

त्या गोष्टीला आतां अडीच तीन तपें लोटलीं आहेत. आतां तें भूगोलांतलें वाक्य आठवलें म्हणजे त्यांतील अनपेक्षित विनोदाला हंसतां हंसतां एक नवाच, उदात्त आशय मनाला प्रतीत होऊं लागतो. त्या भूगोलकर्त्यानें बैलाच्या बाजाराच्या उल्लेखांतून आमच्या गांवच्या पंचक्रोशींतील ऐहिक समृद्धीचा जसा सूचक निर्देश केला होता तसा गोचरस्वामीच्या मठाचा उल्लेख करून अध्यात्माच्या पेठेचीहि गर्भित सूचना दिली नव्हती का ? नुसतें पोट भरण्यांत मनुष्याच्या जीविताचें सार्थक नाहीं, त्याच्या आत्म्याचीहि तृप्ति होणें आवश्यक आहे या जाणिवेचें बीज बालकांच्या मनोभूमींत रुजावें म्हणूनच कीं काय त्या लेखकानें मठाचा अन् बैलाच्या बाजाराचा जोडीनें उल्लेख केला होता !

चिन्मयानंद, नित्यानंद, गोचरस्वामी, नाना महाराज, आईनाथ महाराज, साधु महाराज, उत्तमश्लोक इत्यादि अनेक सत्पुरुषांच्या वास्तव्यानें आमच्या गांवचा परिसर पावन झाला आहे. साधुजनांच्या पदस्पर्शानें पुनीत झालेल्या या पुण्यभूमींत आयुष्याचीं बरींच वर्षें घालविण्याचें महद्भाग्य मला लाभलें आहे.

या सर्व पुण्यश्लोकांच्या जीवितकार्यांचा इतिहास लिहून पुढील पिढ्यांना त्यांची ओळख करून द्यावी असें नेहमीं मला वाटे. परंतु चरित्रलेखनासाठीं आवश्यक त्या ऐतिहासिक पुराव्यांच्या व सामुग्रीच्या अभावामुळें आजवर मनाशीं बाळगलेली ही इच्छा अतृप्तच राहिली आहे. प्रभुकृपेनें लौकरच हें कार्य तडीस जाईल असा माझा विश्वास आहे. तोंपर्यंत संतांच्या गुण-गायनाची मनीषा उपलब्ध चरित्रांच्या पुनरुच्चारानेंच तृप्त व्हावी असा ईश्वरी संकेत असावा. त्याच्याच प्रेरणेनें ज्ञानदेवादि संतांच्या जीवितकार्यांचें नि साहित्याचें यथामति चिंतन करण्याची मला बुद्धि झाली अशी माझी दृढ श्रद्धा आहे.

आजपर्यंत अनेक थोर थोर अधिकारी व्यक्तींनीं संतांच्या कार्याची व वाङ्मयाची समालोचना केली असल्याची मला जाणीव आहे. अशा वेळीं ज्ञानेश्वरांनीं दिलेला राजहंस आणि इतर प्राणी यांच्या पदक्षेपांचा मार्मिक दृष्टान्त माझ्या मनाला धीर देतो. माझ्या या अल्पस्वल्प कृतीनें सर्वसामान्य वाचकांच्या मनांत संतवाङ्मयाविषयीं जिज्ञासा जागृत करण्याचें कार्य केलें तरी मला आपले श्रम सार्थकीं लागल्याचें समाधान लाभेल.

मुंबईच्या ‘ विवेक ’ साप्ताहिकाचे संपादक श्री. ब. ना. ऊर्फ बाळासाहेब जोग यांच्या आग्रहपूर्वक सूचनेनें मी हे संतपरिचयपर व कवि भूषणावरील लेख लिहून त्यांच्या साप्ताहिकांतून क्रमशः प्रसिद्ध केले. याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें. डॉ. रा. शं. वाळिंबे यांना प्रस्तावना लिहिण्याची मी विनंति करतांच त्यांनीं ती तात्काळ मान्य करून व आपला अमूल्य वेळ खर्चून प्रस्तुत पुस्तकास प्रस्तावना लिहिली याबद्दल त्यांचेहि आभार मानावे तितके थोडेच होतील.

‘ राजगुरुनिवास ’, पाईप लेन,
वाकोला, सांताक्रुझ, मुंबई ५५.

बालशंकर देशपांडे
१५।९।६०

[१]

१०८०९

# महाराष्ट्रशारदेचा कंठमणि
# ज्ञा ने श्व र

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

मानवाला थक्क करून सोडणारीं अनंत आश्चर्यें पृथ्वीच्या पाठीवर असतील. पण सुमारें सातशें वर्षांपूर्वीं महाराष्ट्रांत जें नवल वर्तलें, जी नवलाई जन्माला आली, तिची सर विश्वांतल्या एकाहि विस्मयजनक गोष्टीला येणार नाहीं.

जगांतलीं सारीं आश्चर्यें भौतिक स्वरूपाचीं आहेत. त्यांतलीं कांहीं प्राकृतिक तर कांहीं मनुष्यनिर्मित. पण मी ज्या नवलाईविषयीं लिहिणार आहें, ती आधिदैविक स्वरूपाची आहे. ती नवलाई बाह्यात्कारी मनुष्य-देहधारी असली तरी तिच्या अंतर्विश्वाचा कोपरान् कोपरा अलौकिकतेच्या दीप्तीनें, असामान्यत्वाच्या तेजानें धवळून निघाला आहे.

ज्ञानेश्वर माउली हें त्या नवलाईचें नांव ! ओठावरली लव विरण्या-पूर्वींच मराठीच्या नगरींत ब्रह्मविद्येचा सुकाळ करून सोडण्याची प्रतिज्ञा उच्चारणारी, बाल्यसुलभ क्रीडावृत्तीचा पुरता निरास होण्यापूर्वींच गीता-भाष्याच्या निमित्तानें अपूर्व वाग्विलास करणारी, विशीचा उंबरठा ओलांडण्यापूर्वींच अमृतानुभवासारख्या अन् चांगदेवपासष्टीसारख्या वेदान्त-पर, प्रकांडपांडित्यपूर्ण ग्रंथांची निष्पत्ति करणारी विभूति ही विश्वांतल्या साऱ्या आश्चर्यांना, साऱ्या नवलांना चकित करून सोडणारी अभूतपूर्व नवलाईच नव्हे तर काय ?

संध्याकालीन मेघपंक्तीवर तरळणाऱ्या विविध रंगछटा पहातांना त्यांतली कुठली दृष्टिसंपुष्टांत साठवूं अन् कुठली नको अशा मधुर संभ्रमांत माणसानें सांपडावें तसें ज्ञानदेवांच्या प्रतिभेचा एकेक विलास निरखीत असतांना रसिक भ्रांतचित्त होत असतात ! गीतेंतल्या गहन प्रमेयांची हळुवारपणानें उकल करणाऱ्या या कविवराच्या निरूपणकौशल्यावर मुग्ध व्हावें कीं प्रतिपाद्य विषयाला उठाव आणण्यासाठीं नैकविध शास्त्राधार देणाऱ्या या वागीश्वराच्या व्युत्पन्न बुद्धिमत्तेची प्रशंसा करीत रहावें, उपमा-दृष्टान्तादि

अलंकारांनीं मराठीची शोभा खुलविणाऱ्या या रसिक कवींच्या सौंदर्यदृष्टीचें कौतुक करावें, कीं मायबोलीचें साहित्यभांडार समृद्ध करणाऱ्या या शब्द-सृष्टीच्या ईश्वराचें वाग्वैभव भयचकित वृत्तीनें पाहात रहावें, हें रसिकांना कांहीं केल्या उमजत नाहीं.

## मायबोलीचें माधुर्य

ज्ञानेश्वरांच्या कवित्वशक्तीचा, त्यांच्या विदग्ध रसवृत्तीचा एकेक विशेष वर्णन करून सांगायचा झाला तरी प्रत्येकावर एकेक ग्रंथ रचतां येईल इतकें अद्भुत सामर्थ्य त्यांत एकवटलें आहे. पण ही गोष्ट थोर थोर मेधावींच्या अधिकारांतली आहे. माझ्यासारख्या सामान्य बुद्धीच्या माणसाला ज्ञानेशांच्या साहित्यसृष्टींतील एकेका सौंदर्यस्थळाचा, त्यांच्या प्रतिभासामर्थ्यांच्या एकेका विषयाचा नुसता पुनरुच्चार करतां आला तरी मी स्वतःला धन्य समजेन.

अलौकिक प्रतिभेचें ईश्वरी देणें लाभलें असूनहि ज्ञानेश्वरांनीं केवळ स्वतःच्या तृप्तीसाठीं, आत्मविनोदनासाठीं काव्यनिर्मितीचा खटाटोप केला नाहीं, तर प्राकृत जनांना गीतार्थ आकलन व्हावा, या व्यापक, उदात्त हेतूनें प्रेरित होऊन त्यांनीं भावार्थदीपिका लिहिली. आणखी एक उच्च आकांक्षा त्यांनीं आपल्या काव्यनिर्मितीच्या मुळाशीं बाळगली होती. संस्कृत भाषेविषयींच्या अज्ञानामुळें गीतेसारख्या ग्रंथांतील उज्ज्वल विचार-सरणीला आंचवलेल्या प्राकृत जनांविषयीं त्यांना जसा कळवळा वाटत होता, तसा अहंमन्य पंडितांकडून होणारी मराठीची उपेक्षा पाहून विषादहि वाटत होता. आणि या विषादयुक्त जाणिवेंतूनच मराठींत ग्रंथकर्तृत्व करण्याची व तिला प्रतिष्ठा मिळवून देण्याची दुर्दम्य प्रेरणा ज्ञानेश्वरांच्या ठिकाणीं उत्पन्न झाली. आपल्या माधुर्यानें अमृतालाहि लाजवील आणि साहित्यांत संजीवन ओतील अशा तऱ्हेची मराठी भाषा गीतार्थ विशद करण्यासाठीं आपण योजणार आहोंत असें ते ठिकठिकाणीं आवेशानें प्रतिपादन करतात.

मायबोलीच्या सामर्थ्यसंपन्नतेची ज्ञानेश्वरांनीं घेतलेली कड पहाण्यासारखी आहे. मोठ्या अभिनिवेशानें, मोठ्या हिरीरीनें त्यांनीं तिच्या सामर्थ्याची ग्वाही दिली आहे. गीतेसारख्या ग्रंथांतलें उच्च कोटीचें तत्त्वज्ञान पेलायला

प्राकृत भाषा थिटी पडेल, असा मिथ्या ग्रह झालेल्या दुरभिमान्यांना त्यांनीं स्पष्ट सांगून टाकलें आहे कीं—

**यालागीं आम्हां प्राकृतां । देशीकारें वंधें गीता ।**
**म्हणणें हें अनुचिता । कारण नोहे ।।** १८-१६२०.
**आतां आयती गीता जगीं । मी सांगे म्हाटिया भंगीं ।**
**येथ के विस्मयालागीं । ठावो आहे ।।** १८-१७२९.

'मराठींत गीतार्थ विशद करून सांगणें ही गोष्ट कांहीं जणांना मोठी आश्चर्यकारक वाटेल. पण त्यांनीं याचें आश्चर्य वाटूं देऊं नये. देशी भाषेंत गीतार्थ सांगणें यांत अनुचित तें काय आहे?' असा त्यांच्या म्हणण्याचा आशय आहे. 'देशियेच्या सुखासनावर नवरसांना मिरविण्यास कसलाच संकोच वाटणार नाहीं' असें ते पुनः पुन्हा आग्रहानें प्रतिपादन करतात. या प्रतिपादनांत मराठीविषयींचा जिव्हाळा जसा व्यक्त झाला आहे, तसा स्वतःच्या शब्दप्रभुत्वाविषयींचा व प्रतिभेच्या कर्तबगारीसंबंधींचा दृढ विश्वासहि मार्मिकपणें सूचित झाला आहे. शब्दांचें सामर्थ्य, शब्दांची व्यापकता, शब्दांचें नादमाधुर्य, शैलीचा रसाळपणा या साऱ्यांचा मराठीच्या आश्रयानें आपण आविष्कार करणार आहोंत, असे आत्मविश्वासाचे उद्गार त्यांनीं अनेक ठिकाणीं काढले आहेत. शृंगाराच्याहि माथ्यावर पाय देईल अशा प्रभावशाली शांतरसाची निष्पत्ति आपणांला प्रामुख्यानें करावयाची आहे, असा त्यांचा निर्धार आहे.

मात्र स्वसामर्थ्याविषयीं ज्ञानेश्वर अशा प्रकारें निर्वाळा देत असले तरी त्यांनीं त्याला अहंभावाचा किंचितहि दर्प लागूं दिला नाहीं. उलट कमालीच्या शालीनतेनें त्यांनीं आपल्या ग्रंथकर्तृत्वाचें श्रेय गुरुस्थानीं असलेल्या निवृत्तिदेवांना व मायबापस्वरूप मानलेल्या श्रोतृवृंदाला अर्पण केलें आहे.

**शब्द कैसा घडिजे । प्रमेयीं कैसें पां चढिजे ।**
**अलंकारु म्हणजे । काय तें नेणें ।।** १८-१७६७

अशी अत्यंत लीनतेची भूमिका घेऊन ते आपल्या ग्रंथकर्तृत्वाच्या मुळाशीं ईश्वरी प्रेरणा, गुरुकृपा आणि रसिकांची सहानुभूति असल्याचें पुनः पुन्हा आवर्जून सांगतात. श्रीगुरुचरणांच्या स्मरणानें शब्दसृष्टि

आत्मसात् होऊन अवघें सारस्वत जिव्हेसी येईल व अमृताला मुकें ठेवणाऱ्या वक्तृत्वाचा लाभ आपणांला होईल अशी त्यांची नितान्त श्रद्धा आहे. गुरुकृपेच्या बळावरच आपला वाग्यज्ञ सिद्धीस नेतां येईल असा त्यांना भरंवसा वाटतो. श्रोत्यांचा गौरव करतांनाहि ज्ञानदेवांनीं विनयाचा अंगीकार केलेला दिसून येतो. तसा क्वचितच दुसऱ्या कवींच्या बाबतींत आढळून येतो.

**जैसा स्वभावो मायबापांचा। अपत्य बोले जरी बोबडी वाचा।**
**तरी अधिकचि तयाचा। संतोष आथी ॥** १-६४

श्रोत्यांच्या उदारमनस्क वृत्तीची या शब्दांत स्तुति करून ते पुढें म्हणतात, " यांत कांहीं उणें असल्यास तें पुरें करून व कांहीं अधिक असल्यास तें प्रसंगोचित करून घ्यावें अशी माझी तुम्हांस विनंति आहे....ज्याप्रमाणें कळसूत्री बाहुलीचें चलनवलन तीस हालविणाऱ्या सूत्रावर अवलंबून असतें त्याचप्रमाणें मी साधुसंतांचा अनुगृहीत, त्यांच्या कृपेचा आश्रित आहें. मी सर्वस्वीं त्यांनाच वाहिलेला असल्यामुळें त्यांनीं आपल्यास रुचेल त्याप्रमाणें मला मंडित करावें... "

## अलौकिक प्रतिभा

ज्ञानदेवांची लीनतेची ही बैठक अव्वलपासून अखेरपर्यंत कायम राहिली आहे. अध्यात्माचें विवरण करण्याचा, गीतार्थाचा अनुवाद करण्याचा प्रधान उद्देश दृष्टीसमोर असूनहि काव्याचें अधिष्ठानहि मोठ्या कौशल्यानें, मोठ्या कलात्मवृत्तीनें त्यांनीं सांभाळलें आहे. ज्ञानेश्वरांची भूमिका पंडिताची कीं कवीची, असा संभ्रम पडावा इतकी सखोल विद्वत्ता आणि उत्कट काव्यात्मता त्यांच्या गीताभाष्यांत आविष्कृत झाली आहे. ज्ञानदेवांच्या चरित्रांत त्यांनीं साहित्यशास्त्राचा अभ्यास केल्याचा पुरावा उपलब्ध नाहीं. पण ज्ञानेश्वरींत मात्र त्यांच्या साहित्यशास्त्रविषयक अभ्यासाच्या खुणा पदोपदीं उमटलेल्या पहावयास मिळतात. शब्दांच्या विविध शक्ति, रसनिष्पत्तीच्या प्रक्रियेंतले अष्टसात्त्विक भाव, शैलीचा रसाळपणा, नादमाधुर्य, रसप्रकर्षास आवश्यक असलेलें रसिकांचें तादात्म्य इत्यादींसारख्या पारिभाषिक संज्ञाचा

वापर ज्ञानेश्वरांनीं पूर्वसूरींच्या साहित्यशास्त्रविषयक विचारप्रणालींच्या अनुरोधानेंच केला आहे असें निःशंकपणें म्हणतां येईल. अर्थात् ज्ञानेश्वरांची भूमिका साहित्यशास्त्रकाराची नसून प्रतिभासंपन्न कवीची होती, हें सत्य लक्षांत घेतलें म्हणजे त्यांच्या विवेचनांत ठिकठिकाणीं विखुरलेल्या साहित्याच्या स्वरूपाविषयींच्या किंवा प्रयोजनासंबंधींच्या विचारांत त्रुटितपणा असावा, रसचर्चेच्या बाबतींत तपशिलाचा अभाव आढळून यावा हें अगदीं स्वाभाविक वाटतें. असें असलें तरी साहित्यशास्त्रसंबंधींच्या तत्त्वप्रणालि ज्ञानेश्वरांनीं प्रथम आपल्या मनांत पूर्णपणें मुरवून घेऊन मगच विवेचनाच्या ओघांत मधूनमधून त्यांची पखरण केली ही गोष्ट मान्य केलीच पाहिजे.

ज्ञानेश्वरींत जागजागीं प्रकट झालेल्या या साहित्यशास्त्रविषयक परिभाषेंतून कांहीं निश्चित स्वरूपाची, सुसूत्र अशी साहित्यतत्त्वविषयक विचारसरणी मांडून दाखवितां येणें शक्य आहे काय? होय, अगदीं शक्य आहे. दुर्दैवानें ज्ञानेश्वरीच्या अभ्यासकांचें या मुद्द्याकडे जावें तसें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. किंबहुना, कवि या नात्यानें ज्ञानेश्वरांच्या भूमिकेचा विचार करणें म्हणजे त्यांना गौणत्व देण्यासारखें आहे, या समजुतीनें त्यांनीं एक थोर प्रज्ञावंत म्हणूनच ज्ञानेश्वरांच्या व्यक्तित्वाचा विचार केला व गीतार्थ उलगडून दाखविणारा एक विवेचक ग्रंथ म्हणून त्यांच्या साहित्यकृतीचें मूल्यमापन केलें. ज्ञानेश्वरांच्या काव्यात्मतेकडे दुर्लक्ष करणें हा त्या थोर कविहृदयाच्या विभूतीला फार मोठा अन्याय आहे असें माझें स्पष्ट मत आहे. अलीकडील कांहीं सहृदय समीक्षकांनीं ज्ञानेश्वरांच्या या उपेक्षित प्रतिभासामर्थ्याचा अतिशय रसिकतेनें परामर्श घेऊन भावी पिढींतील अभ्यासू रसिकांना ज्ञानेश्वरीच्या अध्ययनाची एक नवी वाट उपलब्ध करून दिली, याबद्दल त्यांना धन्यवाद देणें आवश्यक आहे.

ज्ञानदेवांनीं आपल्या निरूपणांत साहित्यशास्त्रविषयक कांहीं तत्त्वांचा, प्रमेयांचा पुरस्कार तर केलाच, शिवाय जुन्या साहित्यशास्त्राच्याहि पुढें एक दोन-पावलें टाकण्याची कौतुकास्पद कामगिरी उत्कृष्टपणें बजावली, असा आधुनिक टीकाकारांचा दावा आहे. आणि ज्ञानेश्वरींतील शांतरसासंबंधींचें ज्ञानेश्वरांचें प्रतिपादन किंवा साहित्याच्या प्रयोजनासंबंधीं चर्चा

करतांना 'परतत्त्वस्पर्शा 'संबंधीं त्यांनीं धरलेला अग्राह पाहिला म्हणजे स्वयंप्रज्ञतेची प्रचीति पटल्यावांचून राहात नाहीं. त्यांच्या काव्यापासून मिळणारा उच्च प्रतीचा आनंद हेंच त्याचें अंतिम उद्दिष्ट असावें, असें सर्व साहित्यशास्त्रकार मानीत आहेत. पण कलात्मक सौंदर्य हें साधन असून परतत्त्वप्राप्ति हें साहित्याचें सर्वश्रेष्ठ साध्य होय, असा क्रांतिकारक सिद्धान्त प्रस्थापित करणाऱ्या ज्ञानेशांनीं प्राचीन साहित्यशास्त्रापेक्षां निश्चितच एक-दोन पावलें पुढें टाकलीं आहेत. काव्याच्या साहाय्यानें ब्रह्मविद्येचा सुकाळ करून सोडणें हेंच ध्येय ज्ञानेश्वरांना अभिप्रेत होतें.

**वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व ।**
**रसिकत्वीं परतत्त्व- । स्पर्शु जैसा ॥** १८-३४७

या उद्गारांत ज्ञानदेवांचें साहित्यविषयक उद्दिष्ट निःसंदिग्धपणें व्यक्त तर झालें आहेच, शिवाय साहित्यविषयक मूल्यांतील श्रेष्ठकनिष्ठभावहि मोठ्या मार्मिकपणें व तर्कशुद्ध पद्धतीनें सूचित झाला आहे. सौंदर्यतत्त्वाच्या अस्तित्वामुळें वाचेला कवित्वाचें रूप लाभतें, कवित्वाची समृद्धि रसप्रकर्षामुळें होते आणि परत्त्वविचाराची जोड मिळाली म्हणजे त्या रसप्रकर्षाचें साफल्य होतें व तें साहित्य थोर पदवीला पात्र होतें—अशा आशयाची ज्ञानेश्वरांनीं मांडलेली मूल्यपरंपरा किंवा विषयप्रतिपादनाच्या ओघांत त्यांनीं ठिकठिकाणीं साहित्यांतील तत्त्वांचा केलेला निर्देश पाहिला म्हणजे त्यांच्या साहित्यशास्त्रविषयक व्यासंगाबाबत शंका घ्यायला जागा उरत नाहीं.

## मनोज्ञ उपमा-दृष्टान्त

कवि म्हणून ज्ञानेश्वरांच्या भूमिकेचा विचार करतांना तर मति गुंग होऊन जाते. त्यांच्या ठिकाणीं अभिजात रसिकत्व असल्यामुळें त्यांची वाणी सहजच काव्यमय बनून बाहेर पडते आणि त्यांचे नित्य नवे श्वास प्रबंधरूप धारण करतात.

**श्रवणसुखाच्या मांडवीं । विश्व भोगी माधवी ।**
**तैसी सासिन्नली बरवी । वाचावल्ली ॥** १५-१४

असा उद्गार आपल्या रसाळ वक्तृत्वाचा गौरव करतांना त्यांनीं एके ठिकाणीं काढला तो यथार्थ वाटतो. रसानें ओथंबलेलें आपलें वक्तृत्व म्हणजे श्रोत्यांना दिवाळसण, सौंदर्यानें रसरसलेली वसंतशोभा इत्यादि उपमा-उत्प्रेक्षांच्या आश्रयानें त्यांनीं आपल्या विदग्ध रसवृत्तीचें वर्णन केलें आहे. रसपरिपोष आणि अलंकारयोजना या दोन्हींमुळें त्यांच्या या विलासाची रमणीयता वृद्धिंगत झाली आहे. प्रतिपाद्य विषय गहन असो अथवा सोपा असो, त्याचें विवरण करतांना ज्ञानेश्वरांच्या साऱ्या कोमल वृत्ति, सारी रसिकता मोहरून जाते. आपली कोमल व मोहक शोभा प्रकट करण्यासाठीं त्यांची काव्यात्मता जणूं एखाद्या निमित्ताचीच वाट पाहात असते. त्यांचें हृदय जात्याच कोमल, हळुवार व संवेदनाक्षम असल्यामुळें त्यांच्या काव्य-सृष्टींतहि सर्वत्र कोवळ्या, हळुवार शब्दांचीच योजना व्हावी यांत कोणतेंच नवल नाहीं. डॉ. वाळिंबे या मुद्द्याचें विवेचन करतांना म्हणतात, "या कवीचें सारेंच अत्यंत हळवें आणि कोमल. भावनेंतील आत्यंतिक मृदुलतेंतूनच रचनेंतील अद्वितीय मृदुलता निर्माण झाली, आणि या मृदुलतेमुळेंच त्यांच्या कलाविलासाला मृदुल दुकूलवस्त्रांचा मुलायमपणा प्राप्त झाला." ('ज्ञानेश्वरींतील विदग्ध रसवृत्ति', पृ. २३)

आपण कमालीचे कोमल शब्द वापरणार आहोंत असें रसिकांना आवर्जून सांगतांना ज्ञानेश्वर म्हणतात—

**तैसे साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ ।**
**शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥** १३-२७०

दुसऱ्या एका ठिकाणीं ते याच मुद्द्याच्या अनुषंगानें म्हणतात—

**मग पिकलिया सुखाचा परिमळ । कीं निवालिया अमृताचा कल्लोळ ।**
**तैसा कोवळा आणि रसाळ । बोल बोलिला ॥** ८-५७

ज्ञानेश्वरांच्या अंतःकरणाचा हळुवारपणा पाहून मन स्तिमित होतें, त्याप्रमाणें त्यांच्या कल्पकतेची उत्तुंग भरारी पाहून तें विस्मयचकित होतें. त्यांच्या कल्पनाविलासाचीं वेंचक उदाहरणें देऊन डॉ. वाळिंब्यांनीं आपल्या ग्रंथांत अत्यंत रसिकतेनें जें विवेचन केलें त्यांतल्याच कांहीं पांक्ति मी इथें उद्धृत करतों—

" ...मनाच्या सर्व वृत्तींमध्यें बुद्धि श्रेष्ठ आहे हें स्पष्ट करतांना ज्ञानेश्वरांच्या रसिकतेनें पुढील मोहक कलाविलास दाखविला आहे—

**आणि ऋतु बरवा शारदु । शारदीं पुढती चांदु ।**
**चंद्रीं जैसा संबंधु । पूर्णिमेचा ॥** १८-३४४
**कां वसंतीं बरवा आरामु । आरामींहि प्रियसंगमु ।**
**संगमीं आगमु । उपचारांचा ॥** १८-३४५
**तैसी सर्ववृत्तिवैभवीं । बुद्धिचि एकली बरवीं ॥** १८-३४८

सर्व ऋतूंत शरदृतु सुंदर, शरदृतूंतील चंद्र म्हणजे मोहक वातावरणाचा धुंदपणा कांहीं न्याराच, आणि जर तो पूर्णिमेचा पूर्णचंद्र असला तर सौंदर्याची परमावधिच झाली. वसंताचें आगमन झालें म्हणजे उद्यानाच्या शोभेला सौंदर्याचा साज चढतो, अशा उद्यानांत आपल्या आवडत्या माणसाच्या सहवासाचें भाग्य लाभणें हा स्वर्गसुखाचाच योग, आणि त्यांत प्रियजनाच्या वेल्हाळ लाडिकपणाची भर पडली म्हणजे सुखाला पारावार रहात नाहीं.

## परतत्त्वाचा स्पर्श

रस, रूप, गंधादि सर्वच संवेदना ज्ञानेश्वरांच्या ठिकाणीं इतक्या तीव्र होत्या कीं, त्यांच्या साहाय्यानें ज्या ज्या प्रतिमा, जीं जीं कल्पनाचित्रें ते आपल्या काव्यसृष्टींत योजतात तीं सारीं उत्कंठतेनें रसिकांच्या काव्यात्मतेस आवाहन करतात.

ज्ञानेश्वरांच्या वाक्चातुर्याचे आणखी कितीतरी विशेष निर्दिष्ट करतां येतील. अर्थघन शब्दांचें वैपुल्य, समर्पक दृष्टान्तांची रेलचेल इत्यादि गुणांमुळें त्यांच्या काव्यसौंदर्याची आकर्षकता परमावधीला पोहोंचली आहे.

असें असूनहि ज्ञानेश्वर केवळ काव्यनिर्मितीच्या मोहांत गुरफटून गेले नाहींत. रसिकतेला परतत्त्वाचा स्पर्श झाल्यावांचून तिची सार्थकता नाहीं ही जाणीव त्यांनीं सतत आपल्या हृदयाशीं बाळगली होती. अभिजात काव्यात्मतेमुळें मूळ विषयाचें अनुसंधान न राहून काव्याच्या प्रदेशांत स्वैर भरारी मारण्याचा त्यांच्या प्रतिभेला पुष्कळ वेळां अनावर मोह होत असला तरी

ते स्वतःला सावरण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. काव्य कितीहि मोहक असलें तरी श्रोत्यांनीं केवळ त्यावरच लुब्ध होऊन तत्त्वबोधाला पारखें होऊं नये, असा ते स्पष्ट इशारा देतात. शब्द हें बाह्य अवगुंठन असून अर्थरूपी ब्रह्म हा त्या शब्दांतील आशय किंवा गाभा आहे. हा गाभा प्राप्त झाला म्हणजेच सुखाची परमावधि होत असते, अशी काव्याकडे पहाण्याची त्यांची दृष्टि आहे.

भाष्यकार या नात्यानेंहि ज्ञानेश्वरांची योग्यता फार मोठी आहे, हें त्यांच्या प्रगल्भ विवेचनावरून सहज ध्यानांत येतें. वेद, उपनिषदें, गीता, भागवत, शांकरभाष्यें, योगवासिष्ठ इत्यादि अध्यात्मग्रंथांतील विचारसरणी त्यांनीं आत्मसात् केलेली दिसून येते. स्मृति, अष्टादश पुराणें, षड्दर्शनें, वेदान्त, बौद्धमत, पूर्व व उत्तर मीमांसा, दशोपनिषदें, सांख्यशास्त्र, नासदीय सूक्त या साऱ्यांच्या मंथनांतून त्यांनीं भावार्थदीपिकेचा देदीप्यमान् अमृतकलश वर आणला.

अमृतानुभव व चांगदेवपासष्टी या दोन ग्रंथांत त्यांच्या परिणतप्रज्ञ व्यक्तित्वाचा विलोभनीय आविष्कार झाला आहे. शिवशक्तीचें ऐक्य, शब्द-मंडण व शब्दखंडण, स्फूर्तिवाद इत्यादि विषयांचा ज्ञानदेवांनीं व्यासंगपूर्ण शैलीनें उपन्यास केला आहे. चांगदेवपासष्टींत त्यांनीं चर्चिलेले, परमा-त्म्याची अनिर्वचनीयता, नामरूपातीतता, अजातवाद, वगैरे विषयहि वेदान्ताच्या अभ्यासकांना उद्बोधक व प्रेरक वाटावेत इतके सरस आहेत.

ज्ञानेश्वरांच्या अभंग-वाङ्मयांत त्यांच्या कवित्वशक्तीचा निराळाच पैलू पहावयास मिळतो. भावार्थदीपिकेंतील तरल कल्पनाशक्तीचा विलास आणि अमृतानुभवादि वेदान्तपर ग्रंथांतील तत्त्वविवेचकता याहून वेगळ्याच गुणांनीं त्यांच्या अभंगांना शोभा आली आहे. ईश्वराविषयींचा भक्तिभाव आणि प्राणिमात्रांसंबंधींचा कळवळा या दोन गुणांनीं त्यांच्या अभंगांच्या ओळी निथळून गेल्या आहेत.

भक्तिरसांत न्हालेल्या व आत्मसाक्षात्कारानें सतेज झालेल्या ज्ञानेश्वरांच्या अभंगवाणीनेंहि रसिकांना व भक्तजनांना भुरळ घातली आहे. ‘ रूप पाहतां लोचनीं ’, ‘ देवाचिया द्वारीं उभा क्षणभरी ’, ‘ अवघाचि संसार सुखाचा

करीन ' वगैरे अभंग मुखोद्गत नाहींत असा वारकरी शोधूनहि सांपडावयाचा नाहीं.

ज्ञानदेवांच्या अभंगांतली प्रासादिकता पाहूनच महाराष्ट्रांतील कांहीं विद्वानांना अभंगकर्ते ज्ञानेश्वर हे भावार्थदीपिका रचणाऱ्या ज्ञानेश्वरांहून भिन्न असावेत अशी शंका आली. पण त्यानंतर कै. भिंगारकर बुवा, कै. पांगारकर, कै. रामभाऊ रानडे, आचार्य सोनोपंत दांडेकर वगैरे विद्वानांनीं या प्रश्नाची संशोधनपूर्वक चिकित्सा करून ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानेश्वर व अभंगकर्ते ज्ञानेश्वर दोन नसून एकच आहेत असा निर्वाळा दिला. आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ त्यांनी दिलेले आधार पाहिले म्हणजे त्यांचेंच मत विश्वसनीय वाटूं लागतें.

तत्त्वज्ञ, योगी आणि साहित्यिक म्हणून ज्ञानदेवांची योग्यता त्यांच्या भावार्थदीपिका, अमृतानुभवादि ग्रंथांनीं सिद्ध केली, तशी एक धर्मसुधारक आदर्श संत म्हणून त्यांच्या अभंगवाङ्मयानें जगाला त्यांची ओळख पटवून दिली.

## तत्त्वज्ञ, संत, कवि

विद्वत्तेचें अवडंबर न माजवितां व अंधभक्तीला थारा न देतां ज्ञानेश्वरांच्या समकालीन संतांनीं व त्यांच्यानंतर प्रसिद्धीस आलेल्या भगवद्भक्तांनीं भागवतधर्ममंदिराच्या उभारणीचें जें भव्य कार्य आरंभलें होतें त्याचा पाया ज्ञानेश्वरांनींच घातला यांत शंका नाहीं. भक्तिभावाचा गौरव करणाऱ्या व नामसंकीर्तनासारख्या सहजसुलभ साधनाचा पुरस्कार करणाऱ्या ज्ञानेश्वरप्रणीत संप्रदायाला पुढें हजारों वारकरी येऊन मिळाले, धार्मिक जीवनांत समता व बंधुभाव आणण्याचा सर्वांनीं दृढनिश्चय केला, जननिंदेचे आघात सोसूनहि विश्वकल्याणाचें ध्येय उराशीं बाळगण्याची सतमहंतांना प्रेरणा झाली, विश्वाला आनंदाचें आवार घालण्याची, अवघा संसार सुखाचा करून सोडण्याची लालसा त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाली, या गोष्टीचें सर्व श्रेय ज्ञानदेवांच्या जीवितकार्यालाच द्यावयास हवें. हटवादी पुरोहितांच्या कर्मठपणाचा बीमोड करायला आणि बहुदेवतात्मक प्रतिमापूजक व

जादुमंत्रावर आधारलेल्या अशास्त्रीय धर्माच्या चौकटींतून शूद्रादिकांची मुक्तता करायला पुढील पिढींतील संतमंडळींना ज्ञानेश्वरांच्या चरित्रापासूनच स्फूर्ति मिळाली.

अलौकिक ग्रंथरचनेचें व धर्मसुधारणेचें कार्य करून ज्ञानदेवांनीं एकविसाव्या वर्षीं इहलोकींची यात्रा आटोपली. त्यांच्या निर्याणसमयींचें दृश्य कोणाहि सहृदय व्यक्तीला गहिंवर आणून तिच्या डोळ्यांत अश्रु उभे करील, असेंच कारुण्यपूर्ण आहे. नामदेवांनीं सुमारें शंभर अभंगांत या करुण प्रसंगाचें अतिशय सुरस वर्णन करून ठेवलें आहे.

तीर्थाटनाहून परत आल्यावर ज्ञानदेवांनीं आळंदीस इंद्रायणीच्या तीरावर समाधि घेण्याचा आपला मनोदय आतेष्टांना कळविला तेव्हां सर्वांना मोठें दुःख झालें. साऱ्यांचीं अंतःकरणें भडभडून आलीं. निवृत्तिनाथ, सोपानदेव आणि मुक्ताबाई या भावंडांना तर ज्ञानदेवांच्या चिरवियोगाच्या कल्पनेनें पराकाष्ठेचें दुःख झालें. भयशोकादि विकारांनीं विचलित न होण्याइतकी स्थितप्रज्ञता तिघांच्याहि अंगीं पूर्णपणें बाणली असूनहि भावाच्या चिरवियोगाची कल्पना त्यांना असह्य झाली आणि सामान्य संसारी जनांप्रमाणें ते शोक करूं लागले. वयानें आपणांहून लहान असलेल्या ज्ञानेशानें आपल्या आधीं जीवनग्रंथ आटोपावा याचें निवृत्तिनाथांना अत्यंत वाईट वाटलें.

ज्ञानेश्वरांच्या समाधीचा क्षण जवळ येऊन ठेपला. सारी संतमंडळी इंद्रायणीच्या वाळवंटांत गोळा झाली. सर्वत्र पताका फडकूं लागल्या. मंगल वाद्यें निनादूं लागलीं. समाधिस्थानावर तुळशी व बेल अंथरण्यांत येऊन त्यावर दुर्वा, दर्भ व फुलें पसरलीं. समाधींत प्रवेश करण्यापूर्वीं ज्ञानदेवांनीं सर्वांना कडकडून आलिंगन दिलें. गुरुस्थानीं असलेल्या आपल्या ज्येष्ठ बंधूला मिठी मारून ते म्हणाले—

**पाळिलें, पोसिलें चालविला लळा। वा माझ्या कृपाळा निवृत्तिराया ॥**

निवृत्तिनाथांचाहि जीव कासावीस झाला. “ अमर्यादा कधीं केली नाहीं येणें ” असा आपल्या धाकट्या भावाविषयींचा कौतुकाचा उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडला.

**फेडिलीं डोळ्यांचीं अत्यंत पारणीं । आतां ऐसे कोणी सखे नाहीं ॥**

ही त्यांच्या मुखावाटे बाहेर पडलेली आर्त वाणी ऐकून सर्वांचीं हृदयें कासावीस झालीं. नामदेव शोकविव्हल होऊन म्हणूं लागले—

**नामा म्हणे देवा पेटला हुताशन । करा समाधान निवृत्तीचें ।**
**ज्ञानदेवावीण व्याकुळ हे प्राण । तूं जगज्जीवन देवा होसी ॥**

सर्व संतांनीं ज्ञानदेवांना अभिवादन केलें. निवृत्तिनाथांनीं त्यांचे दोन्ही हात धरून त्यांना समाधिस्थानापाशीं नेलें. ज्ञानेश्वर आसनावर जाऊन बसले, पुढ्यांत ज्ञानदेवी ठेवली आणि तिला त्रिवार नमस्कार करून त्यांनीं डोळे मिटून घेतले. त्यांची जीवनज्योत अनंतांत विलीन झाली ! !

* * *

[ २ ]

# नामाचा महिमा गाणारे
# ना म दे व

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

अठराव्या शतकांत राघो भरारीनें अटकेपार भगवा झेंडा रोवून महाराष्ट्राच्या पराक्रमाची ग्वाही दिली. त्यापूर्वी वर्षे पांचशें आधीं नामदेवांनीं उत्तरेकडे भागवत धर्माची पताका फडकविण्याची महान् कामगिरी यशस्वी रीत्या पार पाडली होती. राजकीय दृष्ट्या राघोबांनीं गाजविलेला दिग्विजय महाराष्ट्रीयांना जसा प्रेरक वाटेल तसाच धार्मिक दृष्ट्या नामदेवांनीं केलेला हा विक्रमहि त्यांना स्फूर्तिप्रद वाटेल यांत शंका नाहीं. सुमारें वीस वर्षे पंजाबांत राहून भागवत धर्माच्या प्रसाराचें अपूर्व कार्य नामदेवांनीं मोठ्या निष्ठेनें अन् चिकाटीनें पार पाडलें. महाराष्ट्रापासून दूर असलेल्या प्रांतांत सुमारें दीड तप वास्तव्य करून, तिथल्या सामाजिक जीवनाशीं समरस होऊन, तेथील भाषा आत्मसात् करून जनतेच्या हृदयांत भागवत-धर्माचें बीजारोपण करणाऱ्या नामदेवांचें व्यक्तिमत्त्व खरोखरच मोठें अलौकिक म्हटलें पाहिजे.

उत्कट भगवद्भक्तीच्या बळावर मनुष्यमात्राच्या अंतर्यामांत प्रवेश करून, त्याला आपलेंसें करून मानवताधर्माची दीक्षा देणारे संत नामदेव काय, किंवा वारकरी संप्रदायाचे इतर पाईक काय, त्यांनीं केलेल्या कार्याला सबंध जगाच्या इतिहासांत तोड नाहीं.

पृथ्वीच्या पाठीवरील इतर देशांतल्या साधुसंतांनीं ज्या ज्या वेळीं नवे संप्रदाय स्थापन केले किंवा जुन्या धर्माला नवें रूप देण्याचा प्रयत्न केला त्या त्या वेळीं असंख्य लोकांचे बळी घेतले गेले, प्रेषितांनीं किंवा धर्मोपदेशकांनीं लावलेल्या वृक्षाच्या मुळाशीं सहस्रावधि लोकांचें रक्त शिंपलें गेलें, पण ज्ञानदेव-नामदेवादि महाविभूतींनीं लावलेल्या धर्मवल्लरीचा विस्तार गगनाला जाऊन भिडला, तो केवळ प्रेमाश्रूंच्या सिंचनानें. हा फरक लक्षांत घेतला म्हणजे भागवतधर्मीयांच्या सहिष्णुतेचें नि व्यापक धर्मनिष्ठेचें कौतुक वाटल्याविना रहात नाहीं.

## वैष्णव संप्रदायाचा नेता

नामसंकीर्तनभक्तीनें महाराष्ट्राला भूवैकुंठ बनवून सोडणाऱ्या संतमंडळींत नामदेवांचा वांटा फार मोठा आहे. ज्ञानदेवादि संतमंडळींनीं तीर्थयात्रेच्या निमित्तानें वैष्णव संप्रदायाच्या प्रचाराची जी प्रचंड मोहीम काढली होती तिचें नेतृत्व नामदेवांनीं स्वतःकडे घेतलें होतें. या यात्रेच्या निमित्तानें नामदेवांनीं महाराष्ट्र व गुजराथ येथील तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या व नंतर उत्तर हिंदुस्थानांतील गोकुळ, वृंदावन, मथुरा, काशी, प्रयाग वगैरे स्थळांकडे ते वळले. त्यानंतर नामदेवांनीं सुमारें अठरा वर्षे पंजाबांत वास्तव्य करून तिथें अत्यंत चिकाटीनें भागवत धर्माचा प्रचार केला.

ज्ञानदेव-नामदेवादि वगैरे संतश्रेष्ठींनीं महाराष्ट्रभर व महाराष्ट्राबाहेर प्रसृत केलेल्या संतसंप्रदायाच्या चळवळीचें उज्ज्वल स्वरूप चिंतनीय आहे.

"नामभक्ति हें ईश्वरप्राप्तीचें सोपें साधन संतांनीं सांगितलें. भागवत संप्रदायाच्या स्थापनेनंतर महाराष्ट्रांत पुरोहित वर्गाला पूर्वीचें महत्त्व आणि स्थान पुन्हा कधींच प्राप्त झालें नाहीं. संतांनीं ईश्वरसाधनेंतील पुरोहिताची मध्यस्थी नाहींशी केली..." हें श्री. बा. रं. सुंठणकर यांचें विवेचन लक्षांत घेतलें म्हणजे संतांच्या कामागिरीचें महत्त्व पटूं लागतें. संतांनीं पुरोहिताची मध्यस्थी नाहींशी केली असली तरी त्या ठिकाणीं त्यांनीं गुरुकृपेचें माध्यम निर्माण केलें व त्यामुळें व्यक्तिस्वातंत्र्याचा किंवा मतस्वातंत्र्याचा संभाव्य धोका आपोआपच टळला, हा संतचळवळीचा एक स्पृहणीय विशेष म्हणावा लागेल.

## पारमार्थिक जीवनाची नांदी

प्रापंचिक दुःस्थितीमुळें नामदेवांच्या पारमार्थिक वृत्तीनें उचल खाल्ली व देहगेहांत विटून जाऊन त्यांनीं देवाची कास धरली असें म्हटलें जातें. असें असलें तरी त्यांचा भक्तिभाव लटका नव्हता, वैतागाच्या भरांत उत्पन्न झालेल्या व क्षणानंतर ओसरणाऱ्या भक्तीसारखा तकलादू नव्हता. आत्म-बोधाच्या उत्कट तळमळींतून तो निर्माण झाला असल्यामुळें विशुद्ध होता, अविचल होता.

स्वतःच्या अलौकिक भक्तिभावाच्या जाणिवेंत नामदेवांना प्रथम अहंकाराची बाधा झाली होती म्हणतात. पण नंतर ज्ञानेश्वरांच्या भेटीच्या प्रसंगीं त्यांचा हा अभिमान मुक्ताबाई व गोरोबा यांनीं उतरविला, अशी आख्यायिका आहे.

**लहानशी मुक्ताई जैसी सणकांडी । केले देशोधडी महान संत ॥**

अशा शब्दांत नामदेवांनीं वर्णिलेली मुक्ताबाई सणकांडीसारखी चिमुरडी खरी, पण " विश्व झालिया वन्ही । संतमुखें व्हावें पाणी " असा ज्ञानेश्वरांनाहि अधिकारवाणीनें उपदेश करण्याइतकी जिची प्रज्ञा प्रगल्भ झाली होती ती नामदेवांचा समाचार घ्यायला थोडीच कचरणार होती? गोरोबाकडून मुक्ताबाईनें त्यांना कांहीं वेदान्त विषयांतील अनुभवाचे प्रश्न विचारले व त्यांत तें कच्चें मडकें असल्याचा निःसंदिग्ध निर्वाळा दिला. नामदेव चिडले, संतापले. मुक्ताबाई, गोरोबादि संतमंडळींच्या सभेंत आपला अपमान झाला या कल्पनेनें ते तिथून उठले व तडक पंढरीस आले. तिथें विठ्ठलाला ते काकुळतीनें म्हणाले—

**ज्ञानदेवें मज पाठविलें कोरें । जुनाट म्हातारा जाळों आला ॥**
**मुक्ताबाईनें तेथें माजविली कळी । ही संतमंडळी कपटी तुझी ॥**

नामदेवांच्या तोंडून असे वैतागाचे उद्गार बाहेर पडले असले तरी त्याच क्षणीं आपल्या अहंतेचा त्यांना पश्चात्ताप होऊन ते कासावीस झाले होते. आपली भक्ति ज्ञानविहीन व अनुभवशून्य असल्याचा त्यांना प्रत्यय आला होता आणि ही जाणीव त्यांच्या पारमार्थिक जीवनाची नांदी ठरली. इथूनच त्यांच्या वैराग्यपूर्ण जीवननाट्याला प्रारंभ झाला. ज्ञानेश्वरांच्या आज्ञेवरून ते मराठवाड्यांतील औंढ्या नागनाथास गेले व विसोबा खेचरांना गुरुस्थानीं मानून ईश्वरचिंतन करूं लागले. ज्ञानदेवांप्रमाणें नामदेवांनाहि कवित्वशक्तीचें उपजत देणें लाभलें असल्यामुळें त्यांनीं आपल्या भक्तिभावावर काव्याचा मनोहर साज चढविला. बुद्धीला स्तिमित करणारी ज्ञानदेवांच्या कल्पकतेची उत्तुंग भरारी नामदेवांच्या काव्यांत आढळत नसली तरी भावनोत्कटतेच्या व प्रासादिकतेच्या बाबतींत त्यांचें कवित्व ज्ञानदेवांच्या अभंगांहून यत्किंचितहि कमी प्रतीचें नाहीं. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, उत्कट

भक्तिभावानें व कमालीच्या जिव्हाळ्यानें ओथंबलेल्या नामदेवांच्या अभंगांत त्याच नांवानें ओळखल्या जाणाऱ्या आणखी दोघांतिघां कवींचे अभंग मिसळले गेले ! विष्णुदास नामा या नांवानें प्रसिद्धि पावलेल्या कवीची किंवा त्याच नांवाच्या अन्य कवींची रचना व नामदेवांची रचना यांत महदंतर आहे हें चिकित्सकांना तत्काळ उमगतां येतें. विष्णुदास नामाच्या काव्यांत कूटरचना आढळून येते तशी नामदेवांच्या अभंगांत शोधूनहि ती सांपडत नाही. नामदेवमहाराजांच्या अभंगांत इथून तिथून भगवद्भक्तीचा उत्कट उमाळाच दृष्टोत्पत्तीस येतो.

नामदेवांच्या अभंगवाङ्मयांतून प्रकट झालेलें त्यांचें पारमार्थिक चरित्र अभ्यसनीय आहे. त्यांच्या उपजत आर्त भक्तीला जेव्हां विशुद्ध ज्ञानाची व आत्मानुभवाची जोड मिळाली तेव्हां तिला विशेष उज्ज्वलता प्राप्त झाली. त्यांच्या डोळस आत्मानुभवाधिष्ठित भक्तीचा थाट कांहीं निराळाच आहे. कधीं लडिवाळपणानें तर कधीं प्रेमानें, कधीं हट्टानें तर कधीं रागानें ते देवाची आळवणी करतात. अंतर्मुख होऊन आत्मनिरीक्षण करणाऱ्या त्यांच्या निरहंकारी वृत्तीची तुकाराम महाराजांच्या वृत्तीशीं तुलना करतांना प्रा. शं. गो. तुळपुळे म्हणतात, “ तुकारामाइतकें नसलें तरी नामदेवांत आत्मपरीक्षण आहेच. आपली उत्कट भक्ति फळास येत नाहीं हें पाहून साशंक होऊन ते म्हणतात, ‘ देवा, अमृताहून गोड असें तुझें नाम माझें मन कां घेत नाहीं ? हरिदास हरिनामाची कीर्ति गर्जून सांगतात खरें पण तें नाम माझ्या वाचेस कां येत नाहीं ? भावेंवीण मी भक्ति तरी कशी करणार ?' माझ्या गुणदोषांविषयीं म्हणशील ‘ तर मी तो आहें राशी अपराधांची. ’ अंगुष्ठापासून मस्तकापर्यंत मी अखंड दुश्चितच आचरीत आलों आहें. आयुष्य सरेल पण माझ्या वासना सरणार नाहींत. आमचा विकल्प आम्हांस नाडीत आहे हेंच खरें ! आशा, मनीषा, तृष्णा यांसारखे पाठीलागे भोग देवाचा योगच होऊं देत नाहींत. विषयासक्ताच्या हातून कधीं ध्यान झालें आहे काय ? देवा, वरवर मी भक्तिप्रेमभाव दाखवीत असलों तरी, माझ्या अंतरीं घराचारच आहे. मी लटिका, माझा भाव लटिका, भक्ति लटिकी, ज्ञान, ध्यान, भजनपूजन सारें कांहीं लटिकेंच ! असा हा अंतर्बाह्य लटिका

नामा आणि वर देवाची लटिकी माया; मग अशांचें भजन काय पहावें !...जग मला विष्णुदास म्हणतें तें ऐकून अंगीं प्रेमभाव नसल्यानें माझी मला लाज वाटते. जोंवर अंगीं पुलकरोमांच उठले नाहींत आणि नेत्र सजल झाले नाहींत तोंवर हरिभक्तीचें सुख कळलें असें मी तरी कसें म्हणूं ? " ( पांच संतकवि, पृ. १५८ )

## नामदेवजीकी मुखबानी

उत्कट जिव्हाळ्यानें ओथंबलेले नामदेवाचे सारेच अभंग भाविकांना हृदयस्पर्शी वाटतील. त्यांचे उपदेशपर अभंगहि असेच सुरस आहेत. इहपरलोकीं कल्याण साधूं इच्छिणाऱ्यानें या जगांत सावधगिरीनें वागणें कसें आवश्यक आहे, अहंभाव टाकून देऊन, शुद्धाचरण ठेवून ईश्वरास अनन्य-भावानें शरण गेल्यास आत्महित कसें साधेल, दांभिक भक्तांना हरिभक्ति-सुखाची गोडी कळणें कसें अशक्य आहे, इत्यादि विषयांसंबंधीं मोठ्या अधिकारवाणीनें त्यांनीं आपले विचार मांडले आहेत. पंजाबांत वास्तव्य केल्यावर गुरुमुखी भाषेवर प्रभुत्व मिळवून त्याहि भाषेंत नामदेवांनीं अशीच रसाळ भावनोत्कट काव्यरचना केली आहे. " भक्त नामदेवजीकी मुखबानी " या नांवानें तिकडील भागांत त्यांची रचना ओळखली जाते. शिखांनीं आपल्या ' ग्रंथसाहेब ' या पवित्र धर्मग्रंथांत नामदेवांच्या पंजाबी गाथेचा समावेश केला यांतच या भक्तश्रेष्ठाच्या काव्याची थोरवी अनुस्यूत आहे.

चिकित्सक वाचकांना नामदेवांच्या काव्याची मौलिकता जाणवत असली तरी त्यांच्याविषयीं अज्ञान बाळगणाऱ्या भोळ्याभाबड्या भाविकांकडून मात्र त्या संतश्रेष्ठाला फारच मोठा अन्याय होत आहे यांत शंका नाहीं. नामदेवांच्या अभंगवाङ्मयाचें चिकित्सापूर्वक संशोधन कधीं काळीं होणार असल्यास त्यांच्या बाबतींतल्या या अन्यायाचें आपोआपच परिमार्जन होईल. पण तोंपर्यंत या भक्तराजाच्या नांवावर भलभलत्या कवींच्या रचना खपून जाव्यात व त्याच्या अस्सल कवित्वाची बूज राखली जाऊं नये, ही जाणीव मनाला अस्वस्थ करून सोडते.

नामदेवांच्या अभंगांच्या बाबतींत जसा आजवर अन्याय होत आला आहे, तसा किंबहुना त्याहूनहि भयंकर स्वरूपाचा अन्याय त्यांच्या

पूर्वचारित्र्याबाबत झाला आहे. नामदेव हे ऐन तारुण्यांत वाटमारी करून प्रवाशांना लुबाडणारे क्रूर दरोडेखोर होते, अशी त्यांच्याविषयींची विपर्यस्त समजूत बऱ्याच जणांच्या हृदयांत घर करून बसली आहे. पण अलीकडील कांहीं अभ्यासू इतिहाससंशोधकांनीं नामदेवांविषयींच्या या समजुतीला इतिहासांत कुठेंच आधार मिळत नसल्याचें जाहीर केलें आहे.

खुद्द नामदेवांनीं आत्मवृत्त लिहिलें असून त्यांनींहि या अधःपतनाचा उच्चार केलेला आढळून येत नाहीं. नामसादृश्य असलेल्या दुसऱ्याच एखाद्या दरोडेखोराचें चरित्र नामदेवांना चिकटविलें असावें, असा कांहीं आधुनिक इतिहासकारांचा तर्क आहे; तोच वास्तवतेला धरून असावा असें मला वाटतें.

## धर्मप्रसाराचें महान् कार्य

नामदेवांच्या विशुद्ध चारित्र्याची ग्वाही देणारे ऐतिहासिक पुरावे पुढें-मागें इतिहास-संशोधकांना उपलब्ध होतीलहि, पण आजमितीला त्यांच्या जीवनाबद्दल जी कांहीं विश्वसनीय माहिती अभ्यासकांना मिळाली आहे ती पुढील सर्व पिढ्यांना प्रेरक ठरल्यावांचून राहणार नाहीं.

नामदेवांचे भक्तिपर उपदेशपर व आत्मचरित्रपर अभंग, तसेंच ज्ञानदेवादि चारहि भावंडांच्या जीवनकार्याचा परिचय करून देणारे अभंग जसे मराठी वाङ्मयाला चिरंतन भूषणभूत होऊन राहतील तशीच त्यांची पंजाबांतील आध्यात्मिक चळवळहि धर्मप्रसाराच्या इतिहासांत निरंतर उल्लेखिली जाईल. इस्लामच्या आक्रमणानें त्रस्त झालेल्या, भयभीत झालेल्या लोकांना दिलासा देऊन, डळमळीत झालेल्या त्यांच्या जीवननिष्ठा सावरण्याचा नामदेवांनीं परोपरीनें प्रयत्न केला. त्यांच्या कार्याबद्दल पंजाबी जनतेला वाटणारी कृतज्ञता त्या प्रांतांतील ‘ गुरुद्वारा बाबा नामदेवजी ’ या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या स्मारक-मंदिरावरून सहज व्यक्त होते.

अशा या महान् साधुपुरुषाच्या स्मृतिसमाधीसमोर मी विनम्रभावानें आपला माथा लववितों.

* * *

[ ३ ]

# मराठी भाषेचे 'नाथ'
# श्री एकनाथ

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

कवित्वांतून आणि कृतींतून सारख्याच प्रभावीपणानें भागवत धर्माचा पुरस्कार करणाऱ्या एकनाथ महाराजांचें जीवनकार्य इतर संत-चरित्रांत उठून दिसावें इतकें वैशिष्ट्यपूर्ण आहे. फलकावरल्या चित्राला उठाव मिळावा म्हणून चित्रकार विरोधी रंगाच्या पार्श्वभूमीची कौशल्यानें योजना करीत असतो. एकनाथ महाराजांचें व्यक्तिमत्त्व ठळकपणें दिसावें म्हणून नियतीनें जणूं विरोधी परिस्थितीची पार्श्वभूमि मुद्दाम निर्माण करून ठेवली होती. ज्ञानेश्वरांच्या काळांत उत्कर्षाच्या शिखरावर जाऊन पोहोंच-लेलें देवगिरीच्या यादवांचें राज्य पुढें लवकरच लयाला जाऊन इतर राज्येंहि नामशेष होऊं लागलीं होतीं व यवनांच्या सत्तेखालीं एक एक प्रांत येऊं लागला होता. परधर्मीयांच्या आक्रमणानें महाराष्ट्राला मोठाच धक्का बसला. ज्ञानेश्वरांच्या प्रभावळींतील नामदेव प्रभृति संत कालवश झाल्यानंतर सर्व-सामान्य लोकांच्या अंतःकरणांत धर्माभिमानाची ज्योत प्रज्वलित करील असा एकहि महान् भगवद्भक्त उदयाला आला नाहीं. याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला.

ज्ञानेश्वरांनंतर सुमारें दोनअडीच शतकें महाराष्ट्र अशा दिङ्मूढावस्थेंत वावरत होता. त्यानंतर मात्र या स्थितींत पालट होऊं लागला. विजयानगरचें राज्य विराम पावलें व दक्षिणेंत निरनिराळ्या मुसलमानी सत्ता उदयास येऊं लागल्या. त्यांच्या उत्कर्षास प्रामुख्यानें मराठे सरदारांचें साहाय्यच कारणी-भूत झालें ! परधर्मीयांच्या सत्तेच्या संरक्षणासाठीं कां होईना पण शौर्य गाजविण्याची संधि मिळाल्यानंतर मराठ्यांना स्वसामर्थ्याचा प्रत्यय येऊन चुकला. त्यांच्यांत मानमरातबाची व सत्तेची ईर्षा उत्पन्न झाली. या राजकीय स्थित्यंतराचा परिणाम साहजिकच मराठी साहित्यावरहि घडून आल्याशिवाय राहिला नाहीं. प्रा. सरदार लिहितात, " राजकीय वाता-वरणांत परिवर्तन घडून येत असतांनाच साहित्याच्या प्रांतांतहि स्वतंत्र

प्रज्ञेची व अभिजात कल्पकतेची चाहूल आपणांस ऐकूं येते. धर्मग्लानीच्या काळांतील औदासीन्य नाहींसें होऊन आपला धर्म, भाषा वाङ्मय, संस्कृति यांबद्दल लोकांना आत्मीयता वाटूं लागल्याचें दिसून येतें."

## निवृत्ति-प्रवृत्तीची सांगड

सोळाव्या शतकांत घडून आलेल्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचे आद्य प्रवर्तक श्रीएकनाथ महाराज हेच होते. ज्ञानेश्वरांचें खंडित झालेलें कार्य पुन्हां नेटानें सुरू करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून नाथांनीं पैठण-सारख्या सनातन्यांच्या बालेकिल्ल्यांत भागवत धर्माची पताका फडक-विण्याची जी कामगिरी बजावली ती वारकरी संप्रदायाच्या इतिहासांत अभूतपूर्व म्हटली पाहिजे. ज्ञानेश्वरांप्रमाणें एकनाथांनींहि कर्मठांचा विरोध पत्करून स्त्री-शूद्रांचा कैवार घेतला, संस्कृत भाषेच्या कपाटांत दडवून ठेव-लेली विचारसंपदा प्राकृत जनांसाठीं खुली करून दिली आणि मराठीवर काव्याचा सुंदर साज चढविला.

प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालण्याचा सर्वच संतांनीं आपापल्या परीनें प्रयत्न केला. ज्ञानेश्वर आणि रामदास यांनीं स्वतःचा असा संसार उभारला नसला तरी गृहस्थाश्रमाची महती मान्य केली. नामदेव आणि तुकोबाराय यांनीं प्रपंच केला, पण त्या बाबतींत दोघांचाहि थोडाफार हिरमोडच झाला. पण एकनाथांनीं प्रपंच आणि परमार्थ, प्रवृत्ति आणि निवृत्ति, प्रेय आणि श्रेय यांची प्रत्यक्ष आचरणांत अशी कांहीं सांगड घालून दाखविली कीं, त्यांच्यामागून येणाऱ्या साऱ्या प्रापंचिकांना त्यांचा आदर्श प्रेरक वाटावा. अर्थात् नाथांच्या या यशस्वितेचें मर्म त्यांच्या लोकोत्तर स्वभाववैशिष्ट्यांत जसें दडलें आहे तसें त्यांच्या कर्तव्यदक्ष, सुशील पत्नीच्या—गिरिजाबाईच्या—व्यक्तिमत्त्वांतहि सांठलें आहे.

एकनाथांच्या वाङ्मयाकडे वळण्यापूर्वीं त्यांच्या स्वभावाचे कांहीं ठळक विशेष ध्यानांत घेणें आवश्यक आहे. एकनाथांच्या वृत्तीवर बंडखोरीपेक्षां भूतदयेचाच विशेष पगडा बसल्याचें दिसून येतें. यामुळें तुकारामांच्या किंवा रामदासांच्या काव्यांत अभिनिवेशाची जी एक प्रखर धार दिसून येते ती

एकनाथांच्या वाङ्मयांत कुठेंहि आढळत नाहीं. समन्वयाची, तडजोडीची भूमिकाच त्यांच्या साहित्यांत सर्वत्र दृष्टीस पडते.

## लोकोद्धार हेंच उद्दिष्ट

या समन्वयी वृत्तीमुळेंच जन्मसिद्ध भेदभावावर टीका करतांना त्यांनीं हरिभक्तिविन्मुख उच्चवर्णीयांना दूषण दिलें तरी त्यांच्या अभिजात उच्च संस्कारांविषयीं आदरबुद्धिहि प्रकट केली. ‘ जो सद्भावो संतचरणीं । तोचि भावो ब्राह्मणीं ॥ ’ या उद्गारांत त्यांचा समतोल दृष्टिकोनच व्यक्त होतो. यावनी आक्रमणाच्या धामधुमीच्या काळांत भागवत धर्माची डळमळूं पहाणारी इमारत सावरून धरण्यास एकनाथांची संयत व सौम्य वाणी अतिशय उपयोगी पडली. लोकव्यवहाराची विस्कटलेली घडी पुन्हा नीट घालण्याची एकनाथांवर जबाबदारी येऊन पडली होती, तशी मराठी भाषेला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याची अवघड कामगिरीहि त्यांना पार पाडावयाची होती. ज्ञानेश्वरांनीं आपल्या प्रभावी वाणीनें मराठीचा मोठेपणा सिद्ध केला होता खरा, पण एकनाथांच्या काळांत पुन्हा गीर्वाणभाषाभिमान्यांकडून ती उपेक्षिली जाऊं लागली. राजकीय व व्यावहारिक क्षेत्रांत फारसी भाषेचें वर्चस्व वाढल्यामुळें मराठीच्या दुर्दशेला पारावारच राहिला नाहीं. मायबोलीवर ओढवलेलें हें संकट पाहून एकनाथांसारख्या साधुपुरुषांचें हृदय पिळवटून गेल्याशिवाय कसें राहील? संयम आणि शांति त्यांच्या रोमरोमांत भिनली असूनहि त्यांना कांहींशा त्वेषानें, ‘ संस्कृत वाणी देवें केली । तरी प्राकृत काय चोरापासोनि झाली ? ” असा रोखठोक सवाल संस्कृतभाषाभिमान्यांना उद्देशून टाकावा लागला. मराठींत स्वतः पाऊण लाख कविता रचून त्यांनीं तिच्याविषयींचा अभिमान सार्थ करून दाखविला व तिचा लौकिक वाढविला. अध्यात्मपर वाङ्मयाप्रमाणेंच कथात्मक वाङ्मयाकडेहि त्यांनीं लक्ष पुरवून दोन्ही प्रकारची रचना केली. ‘ स्वात्मसुख ’, ‘ आनंदलहरी ’, ‘ चिरंजीवपद ’, ‘ गीतासार ’, ‘ हस्तामलक ’, ‘ शुकाष्टक ’ इत्यादि अध्यात्मपर ग्रंथ रचून त्यांनीं पांडित्याला आवाहन केलें, तर ‘ चतुःश्लोकी भागवत ’, ‘ रुक्मिणीस्वयंवर ’, ‘ भावार्थ

रामायण', 'तुळशीमाहात्म्य', 'रुक्मांगदकथा' वगैरे पौराणिक आख्यानोपाख्यानांवर काव्याची वेशभूषा चढवून रसवत्तेला आवाहन केलें. केवळ भक्तीवर किंवा अध्यात्मावर भर देऊन निर्माण झालेल्या नाथपूर्व वाङ्मयाचा विचार केला तर एकनाथांच्या साहित्याची विविधता नि सर्वंकषता विशेष जाणवल्यावांचून रहात नाहीं.

अशा प्रकारचें साहित्य निर्माण करीत असतांना त्यांनीं लोकोद्धाराचें उद्दिष्ट कधींहि दृष्टीपुढून दूर होऊं दिलें नाहीं. इतकेंच नव्हे तर समाजाच्या अगदीं खालच्या थरापर्यंत आपले विचार जाऊन पोहोचावेत या हेतूनें लोकांच्या परिचयाचीं रूपकें योजून गौळणी, भारुडें वगैरेसारख्या कृति रचल्या. ही त्यांची समाजोन्मुखता विशेष स्पृहणीय म्हटली पाहिजे. लोककल्याणाच्या तळमळीनेंच नाथांनीं ज्ञानेश्वरीच्या प्रतीचें परिश्रमपूर्वक संशोधन करून अभ्यासकांची चांगली सोय करून ठेवली आहे. नाथांच्या ठिकाणीं ज्ञानलालसेचा अंकुर अगदीं बालवयांतच रुजला होता. अध्यात्म-विद्या संपादन करण्याच्या तळमळीनें एकनाथ वयाच्या बाराव्या वर्षीच गृहत्याग करून देवगिरीस आले व जनार्दनस्वामींचें शिष्यत्व पत्करून त्यांच्या मार्गदर्शनाखालीं शास्त्राध्ययन करूं लागले. जनार्दनस्वामींसारख्या व्युत्पन्न सत्पुरुषाच्या सहवासांत सुमारें अर्धें तप घालविल्यानंतर त्यांची वाणी सुसंस्कृत, प्रगल्भ बनावी व प्रतिभा पल्लवित व्हावी यांत कांहींच नवल नाहीं. शिवाय, गुरुबरोबर तीर्थयात्रेच्या निमित्तानें बराच प्रवास घडल्यामुळें त्यांना समाजजीवन अगदीं जवळून न्याहाळायला मिळालें. भारुडासारख्या वगैरे लोकगीतांतून त्यांना सामाजिक आशय व्यक्त करतां आला त्याच्या मुळाशीं निरीक्षणानें अनुभवसंपन्न बनलेलें त्यांचें व्यक्तिमत्त्वच होतें.

## सर्व गुणांचा समुच्चय

गुरुशिष्यांनीं तीर्थयात्रा आरंभली तेव्हां नाशिक क्षेत्रीं आल्यावर नाथांनीं गुर्वाज्ञेवरून चतुःश्लोकी भागवतावर ओवीबद्ध टीका लिहावयास प्रारंभ करून आपल्या काव्यमंदिराचा पाया घातला. त्यानंतर लवकरच त्यांनीं भागवताच्या एकादशस्कंधावर टीका रचण्यास सुरुवात केली. त्यांच्या

काव्यकीर्तीचा परिमल सर्वत्र दरवळूं लागला. पण काशीच्या सनातनी पंडितांनीं मात्र या सुगंधाला नाकें मुरडलीं. पण पुढें लौकरच या पंडितांना कृतकर्मांचा पश्चात्ताप होऊन त्यांनीं एकनाथी भागवताची मोठ्या समारंभानें काशीनगरींत पालखींतून मिरवणूक काढली.

भागवताची रचना चालू असतांनाच नाथांनीं, ‘ हस्तामलक ’, शुकाष्टक ’, ‘ स्वात्मसुख ’, ‘ आनंदलहरी ’, ‘ गीतासार ’, ‘ चिरंजीव-पद ’, वगैरे आध्यात्मिक स्फुट प्रकरणें रचलीं. या सर्वांची मिळून ओवीसंख्या चार हजारांपर्यंत सहज जाईल. वरील सर्व प्रकरणांत नाथांनीं साधकांना उद्देशून मोठा बहुमोल उपदेश केला आहे. ‘ संपूर्ण अद्वैता-वस्थेची आनंदरूप स्थिति ही त्रैगुण्य, विधिनिषेध यांच्या पलीकडे गेलेली असते; मरणाचें स्मरण ठेवून, देहसुखाविषयीं उदासीन राहून अनुतापयुक्त वैराग्य अंगीं बाणवून जो जीवनाची वाटचाल करतो त्यालाच अंतीं चिरंजीव-पद प्राप्त होतें ’ असा या उपदेशाचा सारांश आहे.

वरील आध्यात्मिक प्रकरणांत प्रकट झालेली एकनाथांची तत्त्वविवेचकता व अध्यात्मप्रवणता जितकी उद्बोधक आहे तितकेंच पौराणिक आख्यानें व संतचरित्रें वर्णितांना त्यांच्या काव्यात्मतेला चढणारें स्फुरणहि विलोभनीय आहे. रसनिष्पत्तीला आवश्यक असलेल्या भावनोत्कटतेबरोबरच कुशाग्र विनोदबुद्धिहि नाथांच्या अंगीं प्रकर्षानें वास करीत होती. ‘ कृष्णदान ’ ‘ कदर्यू-आख्यान ’ वगैरे काव्यांत किंवा भारुडांत त्यांच्या विनोदबुद्धीला विशेष बहर आलेला पहावयास मिळतो. ‘ रुक्मिणी स्वयंवरां’तहि त्यांच्या अभिजात विनोदबुद्धीचा ठिकठिकाणीं प्रत्यय येतो. विवाहप्रसंगीं रुक्मिणीचें बिरडें फेडण्याची पाळी कृष्णावर आली तेव्हां तिथें उपस्थित असलेले मेहुणे मिस्किलपणें हंसून म्हणूं लागले, “ हा जगजेठी। जाणे विरड्याची हातवटी। अभ्यास केला यमुनेतटीं। दाटोदाटीं गौळणींसी ॥” असा मार्मिक अवखळ विनोद नाथांवांचून अन्य कोणत्याहि संतकवीनें साधला नाहीं. प्रपंचसुखाचा मनमुराद अनुभव घेतलेल्या एकनाथांनाच संसारी जनांच्या सुखसंवेदना चाळवणारीं, त्यांना सूक्ष्म आनंद देणारीं असलीं विनोदस्थळें हेरता आलीं.

'रुक्मिणीस्वयंवरां'त हास्यरसाप्रमाणें इतर आणखी साहित्यगुण कसे ओतप्रोत भरले आहेत हें विशद करतांना प्रा. शं. गो. तुळपुळे आपल्या ग्रंथांत म्हणतात, "या काव्यांत अर्थ, स्वार्थ, परमार्थ, हीं सारीं एकरूप झालेलीं असून, 'आधींच कृष्णकथा सखोल । त्यावरी तुझे रसाळ बोल । जाणसी प्रेमाची बोल । येताति डोल सुखाचे ॥ ' या कविवचनाचा प्रत्यय पदोपदीं येत आहे. या कथेची गोडी 'नित्य नूतन' आहे यांत कांहींच शंका नाहीं. विस्तारानें लहान असलें तरी नाथांचें हें काव्य कीर्तीनें फार मोठें आहे. अध्यात्म आणि कवित्व, ज्ञान आणि भक्ति, कल्पना आणि भावना, प्रपंच आणि परमार्थ हीं सारीं या कृष्णकथेंत एकरूप होऊन गेलीं आहेत. नाथांच्या परिणतप्रज्ञ वाणीचा हा परमोत्कर्ष आहे."

## भारुडांतील भव्यता

नाथांचीं कृष्णभक्तिविषयक पदेंहि जिव्हाळ्यानें ओथंबलीं आहेत. या पदांतहि त्यांची आध्यात्मिकता व विनोदबुद्धि जागजागीं प्रकट झाली आहे. पण त्यांच्या या काव्यप्रतिभेला खराखुरा बहर आलेला पहावयास मिळतो तो त्यांच्या भारुडांत. कै. ह. भ. प. पांगारकर त्यांच्या भारुडांविषयीं लिहितात : "भारूड म्हणजे बहुरूढ, लोकप्रिय असें गीत. इंग्रजींत ज्याला 'Folk Lore' म्हणतात असलीं गाणीं. भारुडांना कोणी गारूडहि म्हणतात. गारूड म्हणजे चमत्कृतिजनक, अद्‌भुत काव्य. भारुडांत अद्‌भुतपणा असतो; समाजांतील चालीरीतींवर टीका असते व बोधहि असतो. बोधाचा कडवे-पणा नसतो, तर खेळीमेळीनें वागतांना मनोरंजनाबरोबर बोध केलेला असतो. भारुडांत इतके गुण असल्यामुळें तीं बहुजनसमाजांत सहज रूढ होतात, लोकांत पसरतात...हीं भारुडें म्हणजे महाराष्ट्रशारदेचा एक अजबखानाच आहे. ज्या प्रदेशांत वेरूळचीं लेणीं निर्माण झालीं त्या प्रदेशांत अद्‌भुत अशीं हीं नाथांचीं भारुडें निर्माण झालीं आहेत. पहिलीं सृष्टींतील आहेत, दुसरीं वाङ्मयसृष्टींतील आहेत...दोन्ही आपल्या भव्यपणानें व अद्‌भुत सौंदर्यानें मोहून टाकणारीं आहेत. तीं पहातांच 'अहो आश्चर्यम्' असेच उद्गार प्रेक्षकांच्या तोंडून सहजगत्या निघतात."

लोकांचें मनोरंजन करून त्यांना थोडीबहुत शिकवण देणारा जो एक बहुरूप्यांचा मोठा वर्ग महाराष्ट्रांत नांदत आला आहे त्यांच्या आचारा-विचारांशीं समरस होऊन त्यांच्याच भाषेंत नाथांनीं हीं भारुडें लिहिलीं आहेत. गोंधळी, भराडी, वाघ्ये, भुत्ये, वासुदेव, बाळसंतोष, जोशी, जागल्ये, कोल्हाटी, डोंबारी, फकीर, गारुडी, पांगूळ वगैरे अनेक ज्ञातींच्या आचारविचाराचें नि भाषावैशिष्ट्यांचें सूक्ष्मावलोकन करून नाथांनीं लोकशिक्षणाकडे त्याचा चातुर्यानें उपयोग केलेला पाहून त्यांच्या समाजा-भिमुख स्वभावाचें सानंद कौतुक वाटल्याविना रहात नाहीं. प्रा. शं. गो. तुळपुळे नाथांच्या भारुडांविषयीं व त्यांत प्रतिबिंबित झालेल्या लोकाचारां-संबंधीं विवेचन करतांना म्हणतात, " आपणां सुशिक्षितांना समाजाचा हा थर विशेष परिचयाचा नसला तरी खेड्यापाड्यांतून तो अजूनहि मूळ धरून आहे. या लोकांची वाणी, त्यांचीं गाणीं, त्यांचे वेष, वाद्यें, विचार, आचार यांत एक तऱ्हेचा खेडवळपणा असतो हें खरें, पण त्यांतहि कांहीं काव्य आढळतें; व ह्याच दृष्टीनें नाथांनीं हें लोकवाङ्मय लोकशिक्षणाच्या कामीं योजलें. समाजाचा हा तळचा वर्ग, त्याच्या आवडीनिवडी, त्याचे रागलोभ, त्याचीं सुखदुःखें हीं सारीं नाथांनीं नीटपणें न्याहाळलीं असून त्यांच्याशीं ते पूर्णपणें समरस झाले आहेत. एकनाथी भारुडांच्या अपूर्व यशाचें मर्म यांत आहे. "

निरनिराळीं रूपकें योजून मनांतला आशय व्यक्त करण्याची नाथांची हातोटी कांहीं और आहे. भाषाप्रभुत्व व कल्पनावैभव हीं त्यांच्या कवि-त्वांतलीं वैशिष्ट्यें रसिकांना मोहून टाकतातच, पण त्यांच्या रूपकांतली विविधता, वैचित्र्य नि विस्तार पाहून मन आश्चर्यानें थक्क होतें. उपमा जशी ज्ञानदेवांनीं द्यावी, तसें रूपक एकनाथांनींच योजावें.

## काळाचें अनुसंधान

एकनाथांपूर्वी व नंतर अनेक संतकवींच्या व पंतकवींच्या काव्यप्रतिभेला पौराणिक आख्यानांनीं प्रेरणा दिल्याचें आढळून येतें. कांहींनीं भक्तिभावानें, कांहींनीं कल्पनाविलासाच्या हेतूनें, तर कांहींनीं पांडित्यप्रदर्शनाच्या आकांक्षेनें

या आख्यानांचा आश्रय केलेला दिसून येतो. पण ईश्वरोपासना आणि वाग्विलास या दोन हेतूंबरोबरच, काळाचें अनुसंधान राखून तत्कालीन समाजस्थितीशीं सुसंवादी होईल अशा प्रकारची काव्यरचना करण्याचें ध्येय एकनाथांनीं सतत दृष्टीसमोर ठेवावें यांतच त्यांच्या ऐहिकतेविषयींच्या जिव्हाळ्याचें प्रत्यंतर मिळतें !

पुराणांतल्या कथानकांकडे एकनाथ ऐहिक आणि पारमार्थिक अशा दोन्ही दृष्टिकोनांतून कसे पहात, याविषयीं प्रा. तुळपुळे यांनीं मोठ्या मार्मिकपणें आपल्या ग्रंथांत स्पष्टीकरण केलें आहे. एकनाथांच्या भावार्थ रामायणाचा परिचय करून देतांना ते म्हणतात, "...रामकथेला एकदां परमार्थाची तर एकदां प्रपंचाची मुरड घालण्यांत एकनाथांचा हात कोणीहि धरूं शकणार नाहीं हेंच खरें. परंतु एवढेंच करून थांबते तर ते नाथ कसले ? या चतुरस्र पुरुषानें तत्कालीन समाजस्थितीचें नीट अवलोकन केलें होतें. काय घडत आहे आणि काय घडावें याची जाणीव त्यांस होती. साहजिकच कित्येकदां नाथ रामायणकालांतून स्वकालांत आले आहेत. गाळीव आनंदाची जणूं मूसच, सोलीव सुखाचें सुखच, असें तें श्रीमुख त्यांना अतिप्रिय होतें यांत शंकाच नाहीं. परंतु कित्येकदां तें न्याहाळीत असतांना त्यांना आसपासहि पहावें लागलें आहे. स्पष्टपणेंच बोलावयाचें तर त्यांच्या रामायणांत थोडें राजकारणहि आहे."

**विघ्न राहूं न शके जयापुढें । तो गणेश होवोनि बापुडें ।**
**गाढवांचे कळप गाढे । चहूंकडे वळीतसे ।।**

वगैरे ओव्यांत एकनाथांनीं रावणानें आरंभलेल्या देवांच्या क्रूर छळाचें नि विटंबनेचें जें मर्मभेदी वर्णन केलें आहे त्यांत त्यांनीं मराठ्यांचा तेजोभंग करणाऱ्या यवनांच्या पाशवी अत्याचारांचीच ध्वन्यर्थानें सूचना दिली आहे. तीनशें वर्षांच्या जुलमी राज्ययंत्रणेखालीं महाराष्ट्र भरडून निघाला होता, त्याच्या आशाआकांक्षा पिचल्या होत्या, उमेद खचली होती, त्याचा धर्म, नीति, संस्कृति हीं सारीं उन्मत्त राज्यकर्त्यांकडून पायदळीं तुडविलीं जात होतीं. हिंदु समाजांतील सर्वच थरांचा अधःपात झाला होता. याला 'वर्णानाम् गुरुः' म्हणविणारा ब्राह्मणवर्गहि अपवाद राहिला नव्हता. "न

मागतां देती आशीर्वचन । करिती नीचांचें सेवन । हातां यावया उपाध्ये-पण । दारीं संमार्जन यजमानांच्या ।। ” अशा पोटभरू वृत्तीनें ब्राह्मण लाजिरवाणें जिणें जगूं पहात होते. एकनाथ हा सारा प्रकार पहात होते. त्यांच्या मनाला अनंत यातना होत होत्या, अंतःकरण पिळवटून निघत होतें.

**रायें रक्षावें गोब्राह्मण । निर्भय प्रजांसी संरक्षण ।**
**करावें दुष्टांचें निर्दाळण । परिपालन साधूंचें ।।**
**जेथें नित्य धर्माचरण । यशकीर्ति कृतकल्याण ।**
**त्रैलोक्यीं विजय होय आपण । सत्य जाण लंकेशा ।।**

किंवा—

**जिकडे नित्य पापाचें आचरण । अकीर्ति, अपेश अकल्याण ।**
**अंति निंद्यत्वें पावे मरण । सत्य जाण लंकेशा ।।**

हे उद्गार एकनाथांनीं रावणाच्या पुत्राच्या तोंडीं घातले असले तरी वस्तुतः त्यांनीं त्याचें निमित्त पुढें करून सामाजिक दुःखांनाच वाचा फोडली नाहीं का ? तसेंच—

**राजका उन्माद कामासक्तीं । तोहि काम अधर्मरतीं ।।**
**त्याचीं राष्ट्रें पुरें नासती । राज्यसंपत्तीसमवेत ।।**

वगैरेसारखें सीतेच्या तोंडचें भाषण पाहिलें म्हणजे एकनाथ रावणाऐवजीं जणूं अत्याचारी यावनी सत्तेलाच सूचकपणें इशारा देत आहेत असें वाटूं लागतें.

एकनाथांच्या जीवनकार्याचा व वाङ्मयाचा केवळ पारमार्थिक दृष्टिकोनां-तून विचार करणारे कांहीं भाविक ग्रंथकार सोडले तर अनेकांनीं त्या थोर सत्पुरुषाच्या चरित्राचा साकल्यानें अभ्यास करून त्याच्या सामाजिक मनाचा कानोसा घेण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे.

कै. न्या. रानडे, कै. महाराष्ट्रसारस्वतकार भावे, प्रा. फाटक, प्रा. गं. बा. सरदार, प्रा. तुळपुळे वगैरे चिकित्सक साहित्यिकांना एकनाथांच्या वाङ्मयांतल्या समाजिकतेचा साक्षात्कार होऊन त्यांनीं आपापल्या ग्रंथांतून त्याविषयीं साधार विवेचन केलें हें महाराष्ट्रावर त्यांचें मोठेंच ऋण आहे.

* * *

[ ४ ]

## मराठी वेदांचे उद्गाते
# श्री तुकोबाराय

* * * * * * * * * * * * * * * * * * * * *

'ज्ञानदेवांनीं भागवतधर्ममंदिराचा पाया रचला आणि तुकारामांनीं त्यावर कळस चढविला' अशा अर्थाचा संत बहिणाबाईचा एक अभंग प्रसिद्ध आहे. आपल्या देदीप्यमान् समुज्ज्वल विभूतिमत्त्वानें व उच्चतर विचारसरणीनें साऱ्या जगाचें लक्ष वेधून घेणाऱ्या तुकोबारायांच्या जीवनाला बहिणाबाईनीं दिलेली कळसाची उपमा जितकी समर्पक तितकीच मार्मिक आहे यांत शंका नाहीं. तुकोबांचें जीवितकार्य खरोखरच एखाद्या भव्य मंदिरावरील कळसासारखें दीप्तिमान्, तेजःपुंज आहे. दगडाविटांच्या पार्थिव देवालयावरले सुवर्णाचे कळस हजारपांचशें वर्षांनंतर कलतात, काळवंडतात; पण अध्यात्माच्या पायावर वारकरी पंथीयांनीं उभारलेल्या भागवतधर्ममंदिराचा हा कळस शतकानुशतकें असामान्य तेजानें तळपत राहील, यांत बिलकुल संदेह नाहीं.

## आश्चर्यकारक कवित्वशक्ति

तुकोबांच्या काव्याचा जों जों विचार करावा तों तों त्याचे असाधारण विशेष चित्तावर ठसून अनिर्वचनीय आनंदानें वृत्ति उचंबळून येतात. गेलीं तीनशें वर्षें महाराष्ट्राचा लक्ष्यवेध करणाऱ्या या देहूकर कुणब्याच्या कवित्वांत असें कोणतें आगळें सामर्थ्य दडलें आहे ? साऱ्या महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणावर मोहिनी घालणाऱ्या तुकयाच्या अभंगवाणींत अशी कोणती जादू भरली आहे ? सानांपासून थोरांपर्यंत नि खेडवळांपासून सुशिक्षितांपर्यंत साऱ्यांनाच वेड लावणाऱ्या, त्यांना दिलासा देणाऱ्या या तथाकथित शूद्र कवीच्या वाणींत असा कोणता अनन्यसाधारण काव्यगुण वास करीत आहे ?

तमाम भाविकांना व रसिकांना आकृष्ट करणारी तुकोबांची कवित्वशक्ति आश्चर्यकारक तर खरीच, पण ती ज्या परिस्थितींत जोपासली गेली नि विकसित

झाली ती विचारांत घेतली म्हणजे विशेषच विस्मय वाटूं लागतो. एकनाथ, दासोपंत, मुक्तेश्वर, वामन पंडित, रघुनाथ पंडित इत्यादि कवींच्या प्रतिभेवर जसे बाळपणापासून विद्येचे संस्कार झाले होते तसे तुकारामांच्या प्रतिभेवर झाले नव्हते. एखाद्या गुरूच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाचा लाभहि त्यांना घडला नव्हता. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत यांसारख्या चारदोन ग्रंथांचीं पारायणें आणि पुराणप्रवचनादि श्रवण करणें एवढेंच काय तें तुकारामांच्या काव्याचें भांडवल होतें. पण एवढ्या भांडवलावर काव्याची पेठ थाटून बसण्याइतका निश्चिंतपणा तुकोबांना कुठें मिळाला होता? नेणतेपणींच प्रपंचाची व व्यापारउदीमाची जबाबदारी त्यांच्या शिरावर येऊन पडली. त्यांतहि दोन बायकांच्या नांदणुकीमुळें घरांत दररोज कटकटी निर्माण होऊं लागल्या. त्यांतच दुष्काळाची दारुण आपत्ति ओढवून कुटुंबीयांवर अन्नान्न करण्याची पाळी आली. अन्नाच्या अभावीं त्यांची पहिली पत्नी व पहिलावहिला मुलगा मृत्युमुखीं पडल्याचा भीषण प्रसंग त्यांना पहावा लागला; साहजिकच यामुळें चित्त विषण्ण होऊन संसारांतून तुकोबांचें लक्ष उडालें. व्यापाराकडेहि त्यांचें दुर्लक्ष होऊं लागलें. संसारतापानें पोळलेल्या मनाला शांति लाभावी म्हणून त्यांनीं भगवद्भक्तीची कास धरली.

## परिस्थितीवर मात

मनाच्या अशा उद्विग्न, विचलित अवस्थेंत तुकोबारायांना काव्याची प्रेरणा व्हावी हें नवलच नाहीं का? पण ज्याला अभिजात काव्यशक्तीचें देणें लाभलेलें असतें त्याची प्रतिभा विद्येच्या संस्कारांवांचून किंवा परिस्थितीची अनुकूलता नसतांहि पल्लवित झाल्याविना रहात नाहीं हेंच खरें. खऱ्या काव्याला शास्त्राध्ययनापेक्षां मनाची संवेदनक्षमता, भावनांची उत्कटता, आत्मप्रकटीकरणाची तळमळ, जीवनाचें सूक्ष्म निरीक्षण यांचीच विशेष आवश्यकता असते. तुकोबारायांच्या ठिकाणीं या सर्व गुणविशेषांचा मधुर संगम झाला होता. काव्यनिर्मितीचे सारे गुण त्यांच्यांत प्रकर्षानें एकवटले होते. त्यांच्यावर कोसळलेले दुःखाचे प्रसंग नि त्यामुळें प्रपंचाविषयीं त्यांना आलेला उबग एका परीनें त्यांच्या काव्यनिर्मितीला पोषकच ठरला.

ग्रीष्माच्या उन्हांत तापलेल्या आम्रफळांप्रमाणें प्रापंचिक तापाचे तडाखे खाल्लेलें त्यांचें काव्य रसाळ, मधुर नि गोमटें निपजावें यांत कोणतेंच नवल नाहीं.

**वाईल मेली मुक्त झाली । देवें माया सोडविली ॥**
**पोर मेलें बरें झालें । देवें मायेविरहित केलें ।**

किंवा—

**बरें झालें देवा निघालें दिवाळें । बरी या दुष्काळें पीडा केली ॥**
**अनुतापें तुझें राहिलें चिंतन । झाला हा वमन संवसार ॥**
**बरें झालें देवा वाईल कर्कशा । बरी हे दुर्दशा जनांमध्यें ॥**
**बरें झालें जगीं पावलों अपमान । बरें गेलें धन गुरेंढोरें ॥**

यांसारखे प्रचीतीचे उद्गार म्हणजे तुकोबांच्या अंतर्मुख, आत्मपर, विरक्त काव्यात्मतेची जाणीव देणारी उच्च रवांतली ललकारी होती ! संसारांत रमूं पाहणाऱ्या ओढाळ मनाला ईश्वरचिंतनांत गुंतवितांना त्यांना ज्या मानसिक संघर्षाला तोंड द्यावें लागलें होतें, जें अंतर्द्वंद्व त्यांना क्षणाक्षणाला अस्वस्थ करून सोडीत होतें, त्यांतूनच त्यांच्या काव्याची उपज होत होती. संसाराबद्दलची आसक्ति, तिच्यावर हळूंहळूं विजय मिळवितां आल्यानें स्वसामर्थ्याविषयीं प्रत्ययास येणारा विश्वास यांतून तुकोबांचें काव्य साकारत होतें. प्रपंच्याविषयींच्या ज्या अनासक्तीनें त्यांना काव्याची प्रेरणा दिली, ज्या औदासीन्यांतून, विरक्तींतून त्यांची काव्यप्रतिभा अंकुरली, तो त्यांचा क्षणिक वैताग होता; त्यांनीं केलेला भक्तीचा नि भक्तिपर काव्यरचनेचा आश्रय म्हणजे ती एक पळवाट होती, अशा प्रकारचा एक विपर्यस्त आरोप महाराष्ट्रांतील एका विद्वान् व्यक्तीनें कांहीं वर्षांपूर्वीं केलेला मला या संदर्भात आठवतो. हे विद्वान् गृहस्थ तुकोबांच्या वैराग्याची मीमांसा करतांना एके ठिकाणीं म्हणतात, " The battle of life proved to Tukaram too full of perils and risks, it wore to him a forbidding look—a look of horror. Tukaram could not stand the fire, he fled from the field. He was not a militant spirit. His was the heroism of quiet retirement. "

प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धनांसारख्या अभ्यासकांनीं तुकारामांबद्दल अशीं गैरलागू विपरीत विधानें करावीं याचें मला जेवढें आश्चर्य वाटतें तेवढेंच दुःखहि होतें ! कै. पु. मं. लाड यांनीं तुकारामांवरील एका लेखांत उपरोक्त विधानाचा परामर्श घेऊन त्यांतील वैय्यर्थ्य स्पष्ट दाखवून दिलें आहे. ते म्हणतात, " त्यांच्या ( कै. वा. ब. पटवर्धन यांच्या ) मतें तुकारामाचें वैराग्य हा संसाराच्या रणांगणांतून पाय मागें घेणाऱ्या भ्याडाचा पळपुटेपणा होय. त्यांना असें वाटतें कीं, आपत्तीच्या भारानें तुकाराम वाकला, त्याची दृष्टि विकृत झाली व त्याच्या हतबल आत्म्याला समग्र जीवनाचें दर्शन होऊं शकलें नाहीं. तुकारामाच्या वैराग्याची ही मीमांसा सर्वथैव चुकीची आहे....खरें पाहतां तुकारामाच्या वृत्तींत हळूहळू पालट होत चालला होता. ज्यांना आपण आधुनिक भाषेंत जीवनाचीं मूल्यें म्हणतों त्यांच्याप्रत तो संसाराच्या अंधकारांतून चांचपडत चालला होता. आर्यांच्या भाषेंत यालाच सारासारविवेक म्हणत असत.....संसारांतील सार आणि असार शोधून काढण्यांत तुकारामाच्या वृत्ति आतां गुंतल्या.... "

## तुकारामांचें वैशिष्टय

प्रा. पटवर्धनांना वाटले तसे तुकोबाराय खरोखरच भित्रे असते, पळपुटे असते, तर भवसागरांतल्या वादळांमुळें गलितधैर्य झालेल्या असंख्य संसारी जीवांना त्यांची अभंगवाणी धीर देऊं शकली नसती, प्रपंचांतील त्रिविध तापांनीं पोळलेल्या बद्धांना शाश्वत सुखाचा व शांतीचा मार्ग दाखवूं शकली नसती. एक सामान्य संसारी माणूस म्हणून जीवन जगतां जगतां महान् साक्षात्कारी संताच्या पदवीला जाऊन ते पोहोंचले ते काय दुबळेपणामुळें ? जीवनसंग्रामांत टिकाव धरायला आवश्यक त्या झुंझार वृत्तीचा त्यांच्या ठिकाणीं अभाव होता म्हणून ? छेः, छेः ! जो तुकोबांच्या जीवनाचा, त्यांच्या जीवितकार्याचा अन् कवित्वाचा निर्मळ मनानें, समतोल बुद्धीनें अभ्यास करील, मनन करील, तो तरी त्यांच्याविषयीं अशीं भलतींसलतीं विधानें करण्याचें दुःसाहस करणार नाहीं.

उलट ज्ञानदेवांपासून तों आजपर्यंत महाराष्ट्रभूमींत निर्माण झालेल्या संतकवींच्या परंपरेंत तुकारामांएवढा लोकप्रिय, जीवनदर्शी, द्रष्टा नि झुंझार कवि दुसरा कोणी झालाच नाहीं, असेंच त्याचें मन त्याला ग्वाही देईल. गेलीं तीन शतकें तुकोबांच्या अभंगांनीं महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणांची जेवढी पकड घेतली, तेवढी अन्य कोणत्याहि कवीनें घेतली नाहीं. ज्ञानदेवांच्या रचनेंत कल्पनेची उत्तुंग भरारी खरी, पण त्यामुळेंच सामान्य संसारी जन त्यांच्या अलौकिक प्रतिभाविलासाकडे भयचकित दृष्टीनें पहात राहिले. शिवाय ज्ञानेश्वरांनीं स्वतःचा असा संसार उभारला नसल्यामुळें प्रापंचिकांना ते थोडेफार दूरचे, वरच्या पातळीवरचे वाटत. एकनाथांनीं स्वतःच्या संसाराचा मांड मांडला होता, पण प्रपंच नि परमार्थ यांची कुशलतेनें सांगड घालणाऱ्या नाथांचें चातुर्य स्वतःच्या ठिकाणीं नसल्याची जाणीव होऊन सामान्य जनता त्यांच्यापासूनहि थोडीफार दूरच राहिली. पण तुकोबांचा जीवनक्रम मात्र साऱ्याच प्रापंचिकांना चिरपरिचयाचा, अगदीं जवळचा वाटला. तुकाराम हा आपणांसारखाच दारिद्र्यांत पिचलेला, प्रापंचिक व्याधींनीं जर्जर झालेला, आपणांसारखाच रागावणारा, वैतागणारा, आपणां-सारखाच मोहांत गुरफटलेला व त्यांतून सुटका व्हावी म्हणून धडपडत असलेला, आपल्यांतलाच एक आहे, अशी सर्वांची भावना झाली. तुकोबां-विषयीं साऱ्यांना वाटणारी ही जवळीक, ही आपुलकी अन्य कोणत्याहि संत-कवीच्या वांट्याला आली नाहीं, ही विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

## समाजस्थितीचा अभ्यास

अर्थात् त्यांना ही अपरंपार लोकप्रियता लाभली ती केवळ त्यांचे नि जनतेचे सुखदुःखभोग सारख्याच स्वरूपाचे होते म्हणून नव्हे, तर पार्थिवतेचे पाश तटातट तोडून, ऐहिकतेचीं बंधनें झुगारून देऊन सान्तांतून अनंताकडे झेप घेऊं पाहणाऱ्या आपल्या समानधर्म्याची आकांक्षा तिला प्रेरक वाटली म्हणून; शूद्र जातींत जन्म घेऊन ब्राह्मणांनाहि वंद्य वाटावा असा विशुद्ध चारित्र्याचा आदर्श तुकोबांनीं घालून दिला म्हणून; लोकांचीं सुखदुःखें, आशाआकांक्षा त्यांच्याच बोलींतून व्यक्त करणाऱ्या जनतेचें प्रतिनिधित्व करणाऱ्या त्यांच्या कवित्वाविषयीं आसीम आदरभाव वाटला म्हणून !

तुकोबांच्या व्यक्तित्वाच्या व वाङ्मयाच्या माहात्म्याची मीमांसा करतांना प्रा. ग. बा. सरदार म्हणतात, " तुकाराम जातीनें शूद्र व व्यवसायानें वैश्य होते. त्यांनीं आपल्या अभंगांत या गोष्टीचा अनेकदां उल्लेख केला आहे. ' शूद्रवंशीं जन्मलों । म्हणोनि दंभें मोकलिलों ॥ ' इत्यादि वचनांवरून ही गोष्ट उघड होते. महाराष्ट्रांत शहरें अगोदर थोडीं, आणि त्या मानानें व्यापारहि बेताचाच. यामुळें येथील सर्वसाधारण वैश्यांची स्थिति शूद्राहून फार भिन्न नव्हती. तेव्हां महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाची संस्कृति शेतकऱ्यांची व कारुनारूंचीच होती, असें म्हणावयास हरकत नाहीं. या वर्गाच्या भावना आणि आकांक्षा तुकारामांच्या वाङ्मयांत आत्मीयतेनें प्रकट झाल्या आहेत, हेंच त्यांच्या व्यक्तित्वाचें वैशिष्ट्य आहे. त्यांचा अलौकिक जीवनक्रम शूद्रातिशूद्राच्या दृष्टीनें अभिमानास्पद व स्फूर्तिदायक आहे. ' उद्धरेदात्मनात्मानम् ' या गीताप्रणीत सिद्धान्ताचें ते मूर्तिमंत उदाहरण आहेत. एका यःकश्चित् कुणब्यानें कुठल्याहि बाह्य शक्तीची मदत नसतां केवळ आपल्या तपःसामर्थ्यानें एवढी हिंमत, कीर्ति मिळवावी, ही घटनाच सामाजिक दृष्ट्या मोठी अर्थपूर्ण आहे. लक्षावधि शूद्रांच्या आशाआकांक्षा या साध्यासुध्या घटनेंत बीजरूपानें सामावल्या आहेत. . . "

तुकोबांच्या आत्मनिवेदनपर व उपदेशपर अशा दोन्ही प्रकारच्या अभंगांवरून त्यांच्या अंतरंगाची आपणांस चांगलीच ओळख पटते. व्यवहारांत क्वचित् प्रसंगीं ते फसले असले किंवा त्यांच्या सौजन्याचा गैरफायदा घेऊन त्यांना कुणीं ठकवलें असलें तरी कांहीं जणांनीं त्यांना जितकें भोळसट व व्यवहारशून्य ठरविलें तितके ते तसे नव्हते, ही गोष्ट त्यांच्या एकदर चरित्रावरून व विचारसरणीवरून स्पष्ट होते. ते मनानें जितके प्रेमळ तितकेच फटकळहि होते. अंतर्मुख होऊन ते स्वतःचीं न्यूनें जशीं प्रांजळपणें पाहूं शकत, त्याचप्रमाणें सभोंवारच्या सामाजिक जीवनाचेंहि ते अतिशय सूक्ष्मावलोकन करीत. स्वतःच्या अगतिकतेबद्दल त्यांना जशी खंत वाटे, तशीच सामान्य जनांची दुरवस्था पाहूनहि त्यांचें हृदय तिळतिळ तुटे. ' बुडतां हे जन न देखवे डोळां ' अशी त्यांच्या अंतःकरणाचीं स्थिति झाली होती. त्यांच्या अभंगवाङ्मयाचा बराच मोठा भाग लोकसंग्रहाच्या तळमळीनें व्यापलेला दिसून येतो.

...३

## इंद्रायणीचा चमत्कार

अशा प्रकारें व्यापक जीवननिष्ठेमुळें व सामाजिकतेमुळें तुकोबांच्या अभंगांना कमालीची लोकप्रियता लाभली असली तरी कांहीं मौलिक साहित्यगुणहि त्यांच्या कवित्वाच्या लोकप्रियतेला व चिरंतनत्वाला कारणीभूत झाले आहेत, हें विसरून चालणार नाहीं. सहजस्फूर्त प्रासादिक रचना, चपखल शब्दांची योजना, समर्पक उपमा-दृष्टान्तादि अलंकारांचा वापर, सामाजिक जीवनाचें सूक्ष्म निरीक्षण, मर्मभेदी उपहास आणि विशाल अनुभूति इत्यादि वाङ्मयीन गुणांनीं तुकोबांचें कवित्व ओतप्रोत भरलें आहे. त्यांच्या वाणींतून स्रवणारा प्रत्येक शब्द, प्रत्येक बोल अनुभवाच्या मुशींतून तावून सुलाखून बाहेर पडल्याची आपणांस प्रचीति येते. म्हणूनच ते आपल्या हृदयाचा ठाव घेतात. समाजव्यवहाराचें तुकोबांचें निरीक्षण इतकें व्यापक नि अचूक आहे कीं, मानवी जीवनांतील असा एकहि विषय, एकहि अनुभव नसेल कीं, ज्याला त्यांच्या प्रतिभेनें स्पर्श केला नाहीं. दैनंदिन लौकिक व्यवहारांतील कोणतीहि गोष्ट घ्या, तिच्यावर तुकोबांनीं आपल्या काव्यमय, वक्तृत्वपूर्ण शैलीनें भाष्य केलें नाहीं किंवा तिचा दाखला दिला नाहीं असें कधीं झालें नाहीं. प्रसाद, मार्मिक दृष्टान्त आणि मोजक्या पण समर्पक शब्दांतून महान् आशय व्यक्त करण्याची हातोटी, हीं त्यांच्या कवित्वाचीं ठळक वैशिष्ट्यें म्हणून सांगतां येतील. केवळ प्रतिभाविलासाच्या हव्यासानें लिहिलेली अशी एकहि ओळ त्यांच्या सबंध काव्यसंभारांत शोधून सांपडणार नाहीं. ‘ अंतरींचें धावें स्वभावें बाहेरी ’ असेंच त्यांच्या एकंदर काव्यरचनेचें स्वरूप आहे. म्हणूनच त्यांच्या अभंगांतील अनेक चरण सुभाषितांप्रमाणें आबाल-वृद्धांना मुखोद्गत झाले आहेत.

इंद्रायणीनें तुकोबांचे अभंग तारल्याची कथा आधुनिक विज्ञानयुगाला मंजूर असणें शक्य नाहीं, पण एका भोळ्याभाबड्या, अशिक्षित कुणब्याच्या प्रतिभेला स्फुरलेलें काव्य लोकगंगेनें शतकानुशतकें जिवाभावानें हृदयाशीं जपून ठेवावें, हा चमत्कारहि कांहीं लहानसहान नव्हे !

* * *

[ ५ ]

# राजकारणी संत
# समर्थ रामदास

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

'जेव्हां जेव्हां धर्माला ग्लानि येते, राष्ट्र विकलांग होतें, तेव्हां तेव्हां त्याच्या अभ्युत्थानासाठीं मी अवतार घेतों ' असें श्रीकृष्णांनीं अर्जुनाला भारतीय युद्धाच्या वेळीं आश्वासन दिलें होतें. समर्थ रामदास ज्या काळांत जन्माला आले त्या वेळची सामाजिक परिस्थिति व समर्थांनीं केलेलें कार्य याचा साकल्यानें विचार केला म्हणजे भगवंतांच्या आश्वासनाची प्रचीति येते.

रामदासांच्या काळांत मुसलमानांच्या अरेरावी वृत्तीला ऊत आला होता. सत्तामदानें धुंद होऊन देशभर नंगा नाच घालायला त्यांनीं सुरुवात केली होती. हिंदूंचीं देवळें व तीर्थक्षेत्रें उद्ध्वस्त करण्याचा त्यांनीं चंग बांधला होता. जें हिंदूंना प्रिय नि पवित्र त्यावर पाशवी हल्ला चढवून तें नष्ट भ्रष्ट करण्यांत येत होतें. गाईंची सर्रास कत्तल होत होती. स्त्रियांच्या अब्रूचे धिंडवडे निघत होते.

## तत्कालीन समाजस्थिति

परकीय आक्रमणानें हिंदुसमाज जसा जर्जर झाला होता, तसा अंतर्गत यादवीनें, स्वार्थांधतेनें नि अज्ञानानें तो अध:पतित झाला होता. तीर्थाटनाच्या निमित्तानें समर्थांनीं आसेतुहिमाचल सारा देश पायाखालीं घातला आणि हिंदु समाजाच्या दुरवस्थेचें हें चित्र अगदीं जवळून पाहिलें. तें पाहतांना त्यांचें कविहृदय पिळवटून निघालें. पण दारुण प्रसंगानें गांगरून जाणाऱ्या नि धाय मोकलून शोक करीत बसणाऱ्या दुबळ्या कवींपैकीं ते नव्हते. भावनोत्कटतेइतकाच प्रखर विवेकहि त्यांच्या ठिकाणीं जागृत होता. एक तपाच्या सूर्योपासनेनें त्यांच्या प्रज्ञेला स्थिरता प्राप्त झाली होती. त्यांची प्रगल्भ, व्युत्पन्न मति सामाजिक दु:स्थितीचें निदान करून तिच्यावर उपाययोजना करण्याइतकी कुशाग्र बनली होती. विटलेला, नासलेला प्रपंच आधीं

सुधारा व मग परमार्थाची कास धरा, असा जनतेला उपदेश करीत ते महाराष्ट्रांत संचार करूं लागले. समाजजागृतीसाठीं त्यांनीं जागजागीं मठ स्थापन केले व शिष्यसंप्रदाय निर्माण केला. तत्कालीन परिस्थितीस अनुसरून त्यांनीं लोकांपुढें प्रभु रामचंद्र व हनुमान यांच्या सेवेचा उदात्त आदर्श ठेवला. खेडोपाडीं मारुतिरायांच्या स्थापनेबरोबरच आखाड्यांचीहि स्थापना करण्याचा त्यांनीं आदेश दिला व तरुणांच्या मनावर बलोपासनेचें महत्त्व बिंबवलें.

समर्थांना उपजत लाभलेलें अमोघ अस्खलित वक्तृत्व जसें उपयोगी पडलें तशी त्यांची दणकट, प्रेरक कवित्वशक्तिहि त्यांना साहाय्यभूत झाली. साहित्यसृष्टींत रूढ झालेल्या परंपरागत फूटपट्ट्यांनीं काव्याचें मोजमाप करणारे मोजणी-कारकून रामदासांच्या कवित्वानें बुजले. ' रामदासांच्या रचनेला काव्य म्हणतां येईल काय ? ' असा पोरकट प्रश्न गंभीर चेहरा करून ते विचारूं लागले. जातिवंत कवि प्रचलित संकेतांचा मागोवा न घेतां स्वतंत्र प्रज्ञेनें काव्याचे नवे नवे दंडक निर्माण करीत असतो, स्वतःच्या प्रतिभेला नि प्रज्ञेला साजून दिसेल असा काव्याचा स्वतंत्र घाट बनवीत असतो, ही कल्पनाहि या भाबड्या आक्षेपकांच्या मनाला शिवली नाहीं ! कांचेच्या गोलकांत बंदिस्त केलेल्या विद्युत्‌शलाकेपेक्षां आकाशांत तळपणाऱ्या स्वच्छंद सादामिनीसारखी असल्या जातिवंत कवींची प्रतिभा विहार करीत असते, हें सत्य या खुळ्या टीकाकारांना उमगलें नाहीं. टीकाकारांच्या असल्या आक्षेपांची अगाऊ कल्पना आली असल्यामुळेंच कीं काय, समर्थांनीं स्वतःच काव्याचीं कांहीं लक्षणें सांगून टाकलीं आहेत : ' वाक्यं रसात्मकं काव्यम् ' ही पूर्वसूरींची काव्याची व्याख्या त्यांना अमान्य होती अशांतला भाग नाहीं. ' कवित्व असावें कीर्तिवाढ । कवित्व असावें रम्य गोड । ' यासारख्या किंवा, ' मृदु मंजुळ कोमल । भव्य अद्भुत विशाल । गौल्य माधुर्य रसाळ । भक्तिरसें ।। ' इत्यादि पंक्तींवरून त्यांची रसतत्त्वावरील श्रद्धा प्रत्ययास आल्याविना रहात नाहीं. साहित्यशास्त्रकारांचा रसाविषयींचा आग्रह मान्य करूनहि त्यांनीं आणखी कांहीं काव्यलक्षणें दासबोधांत ग्रथित केलीं, यांतच त्यांच्या प्रतिभेचा अभिजातपणा दिसून येतो. ते म्हणतात :

**जेणें ज्ञान हें प्रबळे । जेणें वृत्ति हे मावळे ।**
**जेणें भक्तिमार्ग कळे । या नांव कवित्व ॥**
**जेणें देहबुद्धि तुटे । जेणें भवसिंधु आटे ।**
**जेणें भगवंत प्रकटे । या नांव कवित्व ॥**

समर्थांच्या काव्यात्मतेविषयींच्या मुद्दयाचें विवेचन करतांना कै. ज. स. करंदीकर एका लेखांत म्हणतात, "समर्थांची यानंतरची सर्व कविता उपदेशपर आणि हेतुपुरस्सर लिहिलेली आहे. हेतुपुरस्सर जें लिखाण तें काव्यच्च नव्हे, सहजोद्‍गार हेंच काव्याचें खरें स्वरूप होय, असें मानण्यांत येतें व तें बऱ्याच अंशीं खरेंहि आहे. तथापि प्रसंगानुरूप उपदेशपर कविता असें जिला आपण म्हणतों ती कविता त्या कवीच्या तोंडचे सहजोद्‍गार नव्हेत असें कां मानावें ? एखाद्या अल्पबुद्धीच्या माणसाला जें दीर्घ प्रयत्नानेंहि साधत नाहीं तें प्रतिभासंपन्न माणसाला सहजस्फूर्तीनें सुचलें तर आपण त्यावर कृत्रिमतेचा छाप कां मारावा ? समर्थांचें यानंतरचें काव्य हेतुपूर्वक उपदेश करण्यासाठींच असलें तरी ते त्यांच्या प्रतिभासंपन्नतेंतून निघालेले सहजोद्‍गारच आहेत... "

## समर्थांचे काव्यगुण

रसिकांच्या रसवृत्तींना आवाहन करणाऱ्या, भावनोत्कटतेनें ओथंबलेल्या ज्या रचनेला आपण 'काव्य' ही संज्ञा बहाल करतों तसल्या प्रकारची रचना समर्थांच्या काव्यसंभारांतहि थोडयाफार प्रमाणांत आढळून येते. उदाहरणार्थ :

**गिरीचे मस्तकीं गंगा । तेथूनि चालली बळें ।**
**धबाबा लोटल्या धारा । धबाबा तोय आदळे ॥**
**गर्जतो मेघ तो सिंधु । ध्वनिकल्लोळ ऊठिला ।**
**कड्यासी आदळे धारा । वात आवर्त होतसे ॥**

महाबळेश्वराच्या परिसरांतील एका धबधब्याचें समर्थांनीं केलेलें हें भव्योदात्त वर्णन रसिकांना आल्हाद देणार नाहीं काय ? समर्थांनीं रचलेलीं करुणाष्टकें किंवा 'आनंदवनभुवना'सारखीं कांहीं स्फुट काव्यें यांतहि रसात्मकतेला आवाहन झाल्याचें स्पष्ट दिसून येतें. पण एकंदरीनें पहातां त्यांच्या

प्रतिभेला भावपूर्ण, हळुवार काव्यापेक्षां रोखठोक, सडेतोड विचारसरणीच अधिक मानवत असल्याचा प्रत्यय येतो. 'उत्कट भव्य तितुकें घ्यावें। मिळमिळीत अवघेंचि टाकावें ॥' अशी त्यांच्या बुद्धीची धारणा होती. आणि या धारणेला सुसंगत अशीच काव्यनिर्मिति त्यांच्या हातून झाली आहे. अध्यात्माबरोबरच जीवनांतील विविध प्रश्नांचा, बारीकसारीक विषयांचा परामर्श घेणारी समर्थांची विशाल काव्यात्मकता पाहून मन सानंदाश्चर्यानें थक्क होतें. मनाचे श्लोक, करुणाष्टकें, रामायण (सुंदरकांड व युद्धकांड), पंचीकरणें, एकवीससमासी, चतुःसमासी, सप्तसमासी, दासप्रबोध, अक्षरमालिका, चतुर्थयोग, पंचमान, श्लोकबद्ध रामगीता, संकल्प इत्यादि वीसपंचवीस स्फुट स्वरूपाच्या कृतींतून समर्थांच्या व्यवहार-कुशल, अनुभवसंपन्न व्यक्तित्वाची ओळख पटते.

## दोन्हि पंथ एकच

समर्थांनीं वारकरी पंथाहून वेगळा असा रामदासी संप्रदायाचा सवतासुभा कां स्थापन केला, अशी मधून मधून एक शंका उपस्थित केली जात असते. वस्तुतः वारकरी पंथ काय किंवा रामदासी संप्रदाय काय या दोहोंच्या स्वरूपाची नीट ओळख नसलेल्यांकडूनच अशा प्रकारची शंका घेतली जाते. कै. ह. भ. प. पांगारकरांनीं या मुद्द्याविषयीं लिहितांना आपल्या ग्रंथांत म्हटलें आहे, "दोन्ही संप्रदायांनीं उपनिषदें, गीता व भागवत यांतील ज्ञानभक्तीचा उपदेश लोकांस केला असल्यामुळें त्यांत पूर्ण एकात्मता आहे. दोन्ही संप्रदाय पूर्ण वैदिक आहेत... धर्माच्या नांवावर खपणाऱ्या ढोंगधत्तुऱ्यांचा, दांभिकपणाचा, धर्महीनतेचा दोन्ही संप्रदायांनीं तिखट शब्दांनीं निषेध केला आहे, आणि धर्म व नीतिन्याय यांचा उपदेश केला आहे. लोकसंग्रहार्थ झटण्याचा दोन्ही संप्रदायांचा बाणा आहे. प्रपंच करून परमार्थ साधा, अशी दोन्ही संप्रदायांची शिकवण आहे. ईश्वरप्राप्तीच्या साधनांत नामसंकीर्तन हें परम श्रेष्ठ साधम आहे, असा दोन्ही संप्रदायांचा आचार व उपदेश आहे. हरिहरांची एकरूपता दोन्ही संप्रदायांत आहे....."

पण ही एकरूपता न जाणवल्यामुळें दोन्ही संप्रदायांच्या अनुयायांनीं व शिष्यांनीं परस्परांवर चिखलफेक करण्याचा अश्लाघ्य खटाटोप आरंभला आहे. वारकरी संप्रदाय नेभळट, पंगु लोकांचा असून राष्ट्रकार्यास तो निरुपयोगी होय, असा एकान्तिक प्रचार रामदासी संप्रदायाचे अंधभक्त करूं लागले, तर वारकरी पंथाविषयीं दुरभिमान बाळगणारे कांहीं टीकाकार रामदासी संप्रदाय म्हणजे ब्राह्मण्याचीच तेवढी चिंता वाहणारा, समाजांतील इतर वर्णीयांची उपेक्षा करणारा अतएव प्रतिगामी स्वरूपाचा संप्रदाय आहे, असें उघड उघड प्रतिपादन करूं लागले.

वरील दोन्ही प्रकारचे आक्षेप निखालस खोटे आहेत, हें अभ्यासकांच्या सहज ध्यानांत येईल. रामदासांनीं पुरस्कृत केलेला महाराष्ट्रधर्म हें तत्त्वतः भागवतधर्माचेंच उत्क्रान्त स्वरूप आहे, हें जाणत्या वाचकांच्या लक्षांत येण्यास मुळींच विलंब लागणार नाहीं. ज्ञानेश्वर-तुकारामादिकांचा भागवतधर्म व रामदासांचा महाराष्ट्रधर्म यांचीं कार्यक्षेत्रें भिन्न असलीं तरी तेवढ्यावरून त्यांच्या एकरूपतेला बाध येणें शक्य नाहीं. दोहोंतील विचारप्रवाह परस्पर-पूरक असल्याचीच प्रचिति येते.

तुकारामानें ज्या शूद्रवर्गाचें प्रतिनिधित्व पत्करलें होतें, त्याचा प्रत्यक्ष राजकारणाशीं फारच कमी संबंध पोहोंचत असे. रात्रंदिवस काबाडकष्ट करूनहि पोटापुरता घास न मिळणाऱ्या दरिद्री जनतेंत राजकीय आकांक्षा निर्माण होणें शक्य नाहीं, हें कटु सत्य ध्यानांत घेऊन तुकारामांनीं तिला प्रथम स्वतःचें अज्ञान व दौर्बल्य यांच्याविरुद्ध झगडण्यास प्रवृत्त केलें. रामदासांनीं उच्चवर्णीयांचें—ब्राह्मण-क्षत्रियांचें—प्रतिनिधित्व पत्करून त्यांच्यांत जागृति उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. धार्मिक व राजकीय क्षेत्रांवर एके काळीं सत्ता गाजविणाऱ्या पण स्वाभिमानशून्यतेमुळें पुढें या वर्चस्वास मुकलेल्या द्वैवर्णिकांना सावध केल्यास पुन्हा राष्ट्राचा उत्कर्ष घडवून आणतां येईल, असा समर्थांना विश्वास वाटला.

आदर्श ब्राह्मण्याचा किंवा क्षात्रधर्माचा समर्थांनीं पुरस्कार केला, एवढ्या-वरून त्यांना वैदिक धर्माची परंपरा राखणारा एक प्रतिगामी संत म्हणून दूषण देणें योग्य होणार नाहीं.

**भेटो कोणी एक नर। धेड महार चांभार।**
**त्याचें राखावें अंतर। या नांव भजन॥**

असा निःसंदिग्ध उद्घोष करणारे रामदास संकुचित विचारसरणीचे असूं शकतील असा ग्रह करून घेणें म्हणजे वस्तुस्थितीचा बुद्ध्या विपर्यास करण्यासारखें आहे.

## समर्थांचें राजकारण

आणखी एका बाबतींत समर्थांविषयीं असाच विपरीत ग्रह कांहीं लोकांनीं करून घेतलेला दिसतो. समर्थांना 'राजकारणी' हें विशेषण यथार्थपणें लागू पडत नाहीं, कारण त्यांनीं दासबोधांत व इतरत्र ज्या ज्या अर्थानें राजकारण हा शब्द योजला तो प्रचलित अर्थाहून फार भिन्न आहे, त्यांना अभिप्रेत असलेला राजकारणाचा अर्थ 'चातुर्य' असा आहे, असें या विद्वानांचें म्हणणें आहे. त्यांचें हें विधान कसें निराधार नि सत्यापलाप करणारें आहे हें आजपर्यंत अनेक विवेचकांनीं सप्रमाण दाखवून दिलें आहे. राजकारण म्हणजे राजकीय उलाढाली या अभिप्रायानेंच समर्थांनीं आपल्या काव्यांत त्या शब्दाचा अनेक ठिकाणीं उपयोग केला असल्याचें स्पष्ट केलें आहे.

**देव मस्तकीं धरावा। अवघा हलकल्लोळ करावा।**
**मुलुख बडवावा कां बुडवावा। धर्मसंस्थापनेसाठीं॥**

किंवा—

**म्लेच्छ दुर्जन उदंड। बहुतां दिवसांचें माजलें बंड।**
**याकारणें अखंड। सावध असावें॥**

या ओळींत समर्थांच्या राजकारणविषयक विचारप्रणालीची झांक स्पष्ट दिसून येत नाहीं काय?

**बुडाला औरंग्या पापी। म्लेंच्छ संहार जाहला।**
**मोडिलीं मांडिलीं क्षेत्रें। आनंदवनभुवनीं॥**
**रामवरदायिनी माता। गर्द घेऊनि उठली।**
**मर्दिले पूर्वींचे पापी। आनंदवनभुवनीं॥**

हे विचार समर्थांच्या राजकारणविषयक औदासीन्याचे समजावयाचे कीं जागरूकतेचे ? अन् यावरून त्यांच्या राजकीय वैचारिकतेचा निर्वाळा पटत असेल तर मग त्यांनीं राजकारण हा शब्द राजकीय उलाढालीच्या अर्थानें वापरला असला पाहिजे, असें कां म्हणतां येणार नाहीं ?

समर्थांच्या जीवनांत राजकारणाला केवढें महत्त्वाचें स्थान होतें हें त्यांच्या चरित्राचें अवलोकन केलें असतां सहज कळून येतें. राजकीय स्वातंत्र्यावांचून देशाला अभ्युदय अथवा निःश्रेयस यांपैकीं कसलीच प्राप्ति होऊं शकणार नाहीं, असें त्यांचें ठाम मत होतें. समाजाला स्वातंत्र्योन्मुख करण्यासाठीं ते वरचेवर महाराष्ट्रांत संचार करीत. त्याच वेळीं शिवबाच्या पराक्रमाची प्रभा हळूहळू महाराष्ट्राच्या क्षितिजावर फांकूं लागली होती. समर्थांना आपल्या महान् कार्याला हा शुभशकुन वाटला. शिवरायांच्या रूपानें क्षात्रतेज नि समर्थांच्या रूपानें ब्राह्मतेज पृथ्वीतलावर प्रकट झालें असल्याचा जनतेला साक्षात्कार घडूं लागला.

शिवबांच्या जीवितांतील प्रत्येक घटनेकडे समर्थ मोठ्या कुतूहलानें, आत्मीयतेनं पाहूं लागले; स्वातंत्र्यसंपादनाच्या कार्यांत त्यांना प्रोत्साहन देऊं लागले.

**या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।**
**महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुम्हां कारणें ॥**
**कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले ।**
**कित्येकांसि आश्रय जाहले । शिवकल्याण राजा ॥**

अशासारखीं प्रशंसापर पत्रें पाठवून ते शिवबांचा उत्साह वृद्धिंगत करूं लागले !

**बहुता दिवसांचें हें बंड । म्लेंच्छ माजले उदंड ।**
**यांचे करूनि दुखंड । राज्य करावें ।**

असा शिवबांना स्पष्ट शब्दांत आदेश देणाऱ्या रामदासांना राजकारण या शब्दाचा रूढार्थाहून निराळाच अर्थ अभिप्रेत असणें शक्य तरी आहे का ? त्यांनीं शिवबांना अनुलक्षून राजधर्म, क्षात्रधर्म हीं वीस-वीस ओव्यांचीं जीं प्रकरणें लिहिलीं आहेत तीं वाचल्यावर तर त्यांच्या राजकीय निष्ठेविषयीं शंका घ्यायला मुळींच जागा रहात नाहीं. ते एका प्रकरणांत म्हणतात—

अमर्याद फितवेखोर । यांचा करावा संहार ।
शोधिला पाहिजे विचार । यथातथ्य ॥
जयास जिवाचें वाटे भय । त्यानें क्षात्रधर्म करूं नये ।
कांहीं तरी करूनी उपाये । पोट भरावें ।
मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें ।
फिरोन येतां भोगावें । महद्भाग्य ॥
देवद्रोही तितुके कुत्ते । मारूनि घालावे परते ।
देवदास पावती फत्ते । यदर्थीं संशय नाहीं ॥

समर्थांना राजकारणाबद्दल नुसतें कुतूहलच वाटत नव्हतें तर त्यांना राजनीतीचे सिद्धान्तहि अवगत होते, हें त्यांच्या दासबोधावरून सहज ध्यानांत येतें. कै. ह. भ. प. पांगारकर म्हणतात, "समर्थांनीं राजकारणशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ लिहिला नाहीं, तथापि त्यांनीं ह्या शास्त्रांतील अनेक सिद्धान्त स्पष्टपणें व निर्भीडपणें सांगितले आहेत... कोणी राजकारणशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ लिहील तर त्यास महाराष्ट्रीय राजकारणाचीं स्वतंत्र सूत्रें समर्थांच्या ग्रंथांत सांपडतील..."

## राजकारणी संत

तात्पर्य, समर्थांना अभिप्रेत असलेला राजकारणाचा अर्थ कांहीं विद्वान् समजतात त्याप्रमाणें केवळ 'चातुर्या'पुरताच मर्यादित नसून तो अधिक व्यापक अर्थानें त्यांनीं गृहीत धरला होता यांत मुळींच शंका नाहीं. "राजा आणि प्रजा यांचे संबंध, लोकसमाजाची स्थिति सुधारण्यासाटीं कराव्या लागणाऱ्या चळवळी, लोकांचे पुढारी व त्यांच्या कर्तव्यांचे नियम, चातुर्वर्ण्य व्यवस्था व तिच्या रक्षणाचे उपाय, लोकसंग्रह ह्या सर्व गोष्टींचा समावेश समर्थांच्या राजकारणांत होतो," हें कै. पांगारकरांचें मत कोणाहि विचारवंतास सहज मान्य होण्यासारखें आहे.

पण समर्थांच्या जीवितकार्याचें मूल्यमापन केवळ त्यांच्या राजकारणविषयक विचारांवरून करतां येणार नाहीं. त्यांना देण्यांत आलेल्या 'राजकारणी संत' या विशेषणांतील पहिला शब्द जितका महत्त्वाचा आहे तितकाच

दुसराहि आहे. किंबहुना, सार्‍या मानवी व्यवहारांना अध्यात्माची बैठक देणार्‍या भारतीय संस्कृतीच्या दृष्टिकोनांतून रामदासांच्या जीवनकार्यांचा विचार करतांना त्यांच्या साधुत्वावर नि अध्यात्मप्रधान व्यक्तित्वावर अधिक भर देणें इष्ट होणार आहे. अध्यात्माच्या पायावरच रामदासांच्या जीवन-कार्यांची उभारणी झालेली असल्यामुळें राजकारणाचा विचार करतांनाहि ते परमार्थ दृष्टीआड होऊं देत नाहींत हें ध्यानांत घेणें आवश्यक आहे.

**मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ॥**

या ओवींत, किंवा--

**सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें ।**
**परंतु आधीं भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥**

या ओवींत त्यांचा राजकारणविषयक दृष्टिकोन स्पष्टपणें प्रतिबिंबित झाला आहे.

राजनीतिकुशल व साक्षात्कारी संत म्हणून समर्थांनीं जसा लौकिक मिळविला त्याप्रमाणेंच व्यवहारचतुर पुरुष म्हणूनहि त्यांनीं आपली अनन्य-साधारण योग्यता सिद्ध केली. अगदीं सामान्य माणसाच्या दैनंदिन आयुष्य-क्रमांत उपयोगी पडेल असा कितीतरी विषयांच्या बाबतींत त्यांनीं अधिकारवाणीनें उपदेश केला आहे. त्यांचा दासबोध हा ग्रंथ सामान्यतः अध्यात्मपर ग्रंथ असला तरी प्रपंचव्यवहाराचेंहि त्यांनीं अनेक समासांतून मोठ्या मार्मिकपणें विवेचन केलें आहे. प्रयत्न, प्रबोध, प्रचीति, श्रद्धा, विवेक, वैराग्य, सत्त्व, तम, रज आदि गुण, साधक, बुद्ध, मुमुक्षु, सद्‌गुरु, उत्तम पुरुष, मूर्ख इत्यादींचीं लक्षणें, इत्यादि अनेक विषयांवर त्यांनी केलेलें भाष्य पाहिलें म्हणजे दासबोध हा आध्यात्मिक ग्रंथाप्रमाणेंच प्रापंचिकांचा व्यवहारकोशहि आहे, असें म्हणावेंसें वाटतें. दासबोधाला महाराष्ट्र-धर्माचा प्रमाणग्रंथ म्हणतात तेंहि युक्तच आहे. दांत-तोंड घासण्यापासून तों गगनाला गवसणी घालण्यापर्यंत अनेक लहानमोठ्या विषयांना स्पर्श करणारी समर्थांची प्रतिभा तत्कालीन समाजाला प्रेरक नि संजीवक ठरली तशी ती भविष्यकालीन पिढ्यांनाहि स्फूर्तिदायक ठरेल, हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

* * *

[ ६ ]

# शब्दसृष्टीचे ईश्वर
# महाकवि मुक्तेश्वर

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

मुक्तेश्वरांचा जन्मकाल व मृत्युकाल, नांव व उपनाम इत्यादींविषयीं विद्वानांनीं काढलेलीं अनुमानें वादग्रस्त असलीं तरी त्यांच्या असाधारण प्रतिभासामर्थ्याविषयीं मात्र सर्वांनीं एकमुखानें निर्वाळा दिला आहे. सुप्रसिद्ध संतकवि एकनाथ महाराज यांच्या मुलीचा हा मुलगा. एकनाथांच्या समाधि-कालानंतर सुमारें दहा वर्षांनीं म्हणजे इ. स. १६०९ च्या सुमारास यांचा जन्म पैठणक्षेत्रीं झाला असून सुमारें पन्नास वर्षांचें आयुर्मान त्यांना लाभलें असावें, असें अलीकडे उपलब्ध झालेल्या पुराव्यांवरून निश्चितपणें म्हणतां येतें.

मुक्तेश्वरांनीं आपल्या मातामहाप्रमाणेंच रामायण-महाभारतादि पुराणांचा व अध्यात्मपर ग्रंथांचा चोखंदळपणें व्यासंग केला होता. मात्र एकनाथांच्या किंवा त्यांच्यापूर्वीं होऊन गेलेल्या विद्वान् कवींच्या काव्यापेक्षां मुक्तेश्वरांच्या काव्यावर पांडित्याची नि प्रगल्भपणाची छाप विशेष घवघवीतपणें उमटलेली दिसून येते.

तथापि रघुनाथ पंडित, वामन पंडित किंवा मोरोपंत या पंडित कवींच्या काव्याहून मुक्तेश्वरांच्या कवितेची धाटणी अगदीं निराळी आहे, यांत शंका नाहीं. रघुनाथ-वामनादि पंडित कवींचें भाषाप्रभुत्व व शब्दसौष्ठव या कवीच्या कवित्वांत तर प्रत्ययास येतेंच, पण याहिपेक्षां अर्थगौरवाच्या व रसवत्तेच्या दृष्टीनें याचा प्रतिभाविलास अधिक चित्ताकर्षक वाटतो; आणि या सर्वांहून याच्या काव्यशक्तीचा विशेष आकर्षक वाटणारा गुण म्हटला म्हणजे तिच्या ठिकाणीं वास करीत असलेली समाजाभिमुखता. प्रखर बुद्धिमत्ता व उत्कट भावुकता या दोन गुणांबरोबरच भूतदयेचा वारसाहि एकनाथांनीं आपल्या नातवाला दिला होता, याची साक्ष मुक्तेश्वरांची कविता वाचीत असतांना अनेक वेळां पटते.

## लोकोत्तर प्रतिभा

मुक्तेश्वरांच्या सामाजिक दृष्टिकोनाविषयीं ऊहापोह करण्यापूर्वी त्यांच्या काव्यत्मतेसंबंधीं, रसवत्तेसंबंधीं थोडें विवेचन करणें आवश्यक वाटतें. लोकोत्तर प्रतिभेचा कवि म्हणून मुक्तेश्वरांची आजपर्यंत अनेक रसिक विद्वानांनीं मुक्तकंठानें स्तुति केली आहे. महाभारताला मराठी काव्याची वेषभूषा चढविणाऱ्या खुद्द मोरोपंतांनाहि मुक्तेश्वरांच्या अभिजात कवित्व-शक्तीचें सानंदाश्चर्य वाटून त्यांनीं लीनतेनें उद्‌गार काढले आहेत कीं, " मुक्तेश्वरकृत भारत आवडतें विठ्ठलास कीं पर्व । सर्व श्रवणें हरितें अशा कवीच्या, अशेषही गर्व ॥ "

सर्व संतकाव्याचें परिशीलन करणाऱ्या आधुनिक अभ्यासकांपैकीं कै. ह. भ. प. पांगारकरांनीं मुक्तेश्वरांची मोरोपंतांशीं तुलना करून त्यांत मुक्तेश्वरांना श्रेष्ठ ठरवितांना म्हटलें आहे, " त्याच्या ( मुक्तेश्वरांच्या ) भारताचीं जीं पांचच पर्वें उपलब्ध झालीं आहेत, त्यांवरून पाहतां कवि. त्वाच्या दृष्टीनें मुक्तेश्वराची बरोबरी कोणताहि कवि करूं शकणार नाहीं असें मला वाटतें. मुक्तेश्वराच्या वाणींत लोकोत्तर प्रसाद, दिव्य ओजस्विता व सृष्टिसौंदर्यवर्णनाची अनुपम शोभा दृष्टीस पडतात......"

महाराष्ट्रसारस्वतकार कै. भावे लिहितात, " ज्यानें एकदां मुक्तेश्वरी आदिपर्वांतील आख्यानाचा स्वाद चाखला आहे तो त्यांतील रसानें वेडा होऊन पुनः पुन्हा तेथेंच भ्रमत राहतो... " कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, कै. वा. ब. पटवर्धन, म. भा. भू. कै. आजगांवकर वगैरे अनेक समी-क्षकांनीं याच अभिप्रायाचे प्रशंसोद्गार काढून मुक्तेश्वरांच्या श्रेष्ठतेची ग्वाही दिली आहे.

## महाभारताचीं पांच पर्वें

महाभारतांतील आदि, सभा, वन, विराट आणि सौप्तिक या पांच पर्वांचा ओवीबद्ध अनुवाद, कौतूहलरामायण, शुकरंभासंवाद, शतमुखरावण-वध, एकनाथचरित्र, गजेंद्रमोक्ष, हनुमंताख्यान इत्यादि स्फुट प्रकरणें वगैरे मिळून १७-१८ हजार ओव्यांची रचना मुक्तेश्वरांनीं केली आहे. काव्य-

रचनेला प्रवृत्त होण्यापूर्वी त्यांनीं पुराणें, वेदान्तपर ग्रंथ, निरनिराळीं शास्त्र यांचा चांगला अभ्यास केला असावा, असें त्यांच्या काव्यावरून दिसून येतें. न्याय, तर्क, मीमांसा यासंबंधींचे उल्लेख त्यांच्या प्रत्युत्पन्न मतीची पदोपदीं साक्ष देतात. तसेंच भिन्न भिन्न रसांचा परिपोष करून रसिकांच्या चित्तवृत्ति उल्हसित करणारी त्यांची रसवत्ताहि अपूर्वच म्हटली पाहिजे. शृंगार, वीर, अद्‌भुत, करुण इत्यादि रसांचा परिपोष करताना मुक्तेश्वरांची काव्यप्रतिभा वर्ण्यविषयाशीं पूर्णपणें तन्मय पावल्याचें दिसून येतें. विशेषतः शृंगार, वीर व अद्‌भुत या रसांचा परिपोष करतांना त्यांच्या काव्यात्म वृत्तीला विशेष स्फुरण चढत असल्याचा प्रत्यय येतो. उदाहरणार्थ—

**जैसी सुवर्णचंपककळी । कीं ओतिली मन्मथपुतळी ।**
**अत्यंत तारुण्यभरें लवली । परी विनत सुकुमार ॥**
**करिशावकशुंडादंड । तैसे सरळ भुजदंड ।**
**कंकणें रुणझुणती प्रचंड । मदनातें चेतवावया ॥**

या शर्मिष्ठेच्या रूपसंपदेच्या वर्णनांतील शृंगाराची चमक किंवा–

**तुज वेगळी करूं काय ? । कवणातें मी मोकलूं धाय ।**
**नाहीं बाप अथवा माय । ईश्वर तोहि दिसेना ॥**
**पडे, उठे, मागुती पडे । दिशा अवलोकुनी चहूंकडे ।**
**' नळा ! नळा ! ' म्हणुनी रडे । आक्रांतली काननीं ॥**

ही विरहव्याकुळ दमयंतीच्या उद्गारांतील शोकार्तता मुक्तेश्वरांच्या रसवृत्तीची चांगलीच कल्पना आणून देतात.

## वीररसाचा परिपोष

वीरवृत्तीचा परिपोष करतांना तर मुक्तेश्वरांच्या प्रतिभेला कमालीचें अवसान चढतें. रामायण-महाभारतांतील युद्धप्रसंगांचें व आख्यानोपाख्यानांतील संघर्षांचें वर्णन करतांना ते मोठ्या आवेशपूर्ण, ओजस्वी शब्दांत वीररसाला उठाव आणण्याचा प्रयत्न करतात.

**बळें मातले, हाणितां वृक्षपृष्ठीं । कपीमस्तकीं ओपिती वज्रमुष्टी ।**
**फळें पीकलीं ज्यापरी होत चेंदा । सडे सांडणी मांडणी रक्तमेदा ॥**

**उडी घालिती, फोडिती कुंभ रागें। पदें लोटिती, दाटिती दंत मागें ।।**
**महावंत वारूनियां चंडभारें। शिरें पांचही भंगिती एकधारें ।।**

हें रामायणांतील युद्धकांडांतील वर्णन किंवा,

**मुष्टिघात ओपितां वळें। डोलों लागलीं पर्वतमौळें।**
**थरथरोनी पृथ्वीतळें। महाकंप दाविजे ।।**
**करोनी किंकाट गर्जना। कंठीं रोवूं धांवे दशना।**
**भीमें हाणोनी चडकणा। दंतपंक्ती पाडिल्या ।।**

हें हिडिंबासुर व भीम यांच्यांतील द्वंद्वयुद्धाचें वर्णन वाचीत असतांना वाचकांच्या वीरवृत्ति उद्दीपित होणार नाहींत का ?

रसोत्कर्षास आवश्यक त्या भावनोत्कटतेइतकीच मुक्तेश्वरांची कल्पनाशक्तिहि त्यांच्या काव्याचा लौकिक वाढविण्यास कारणीभूत झाली आहे.

**त्रैलोक्यलावण्य नगरी। शृंगारश्री पर्वत भ्रमरी।**
**साहित्य वाणलिंगाचे शिखरीं। विशाल नदी नर्मदा ।।**
**त्या कारुण्य वसंतवातें। मूढ मानस शुष्क लतें।**
**स्फूर्तीचे पल्लव फुटले तेथें। कवित्व फळे फळभारें ।।**

यांसारख्या पंक्तींतील कल्पकतेची भरारी रसिकांना मंत्रमुग्ध करण्याइतकी उत्तुंग नाहीं असें कोण म्हणेल ?

मुक्तेश्वरांच्या कवित्वांतील वर निर्दिष्ट केलेल्या ठळक गुणांप्रमाणेंच आणखी कांहीं गुणविशेष ध्यानांत घेणें आवश्यक आहे. संभाषणचातुर्य, सृष्टिसौंदर्यवर्णनाची हातोटी, श्लेष-उपमा-रूपकादि अलंकारांची समर्पक योजना वगैरे कितीतरी गुणांनीं मुक्तेश्वरी काव्याची शोभा वृद्धिंगत झाली आहे. मुक्तेश्वरांच्या प्रतिभेचे हे असाधारण विशेष लक्षांत घेऊन कै. बा. अ. भिडे यांनीं कालिदास, जगन्नाथ, भर्तृहरि प्रभृति कविश्रेष्ठांबरोबर त्यांची तुलना केली आहे, ती अगदीं यथार्थ आहे.

## काव्यांतील सामाजिकता

मुक्तेश्वरी काव्याविषयीं विचार करतांना विशेष कौतुक कोणत्या गोष्टीचें वाटत असेल तर त्या काव्यांतील सामाजिकतेचें. रामायण-महाभारतांतील

कथाप्रसंगांचा अनुवाद करतांना मुक्तेश्वरांची प्रतिभा केवळ वाग्विलासाचा सोस बाळगीत नाहीं, केवळ भाषाप्रभुत्वाचा दिमाख मिरवण्यांत ती आनंद मानीत नाहीं, श्रोत्यांपुढें कल्पनाभांडार खुलें करून त्यांचे डोळे दिपवून टाकण्याची स्पृहाहि त्यांच्या मनाला शिवत नाहीं तर काव्य-निष्पत्तीच्या आनंदाबरोबरच लोकांना सत्प्रवृत्त बनवून त्यावर नीतीचे, उदात्त विचारांचे संस्कार करून त्यांच्यांतील विकारांचें, हीन अभिरुचींचें उन्नयन करावें असा महान् उद्देश ते आपल्यासमोर ठेवतात. त्यांनीं केलेल्या उत्तान शृंगारिक वर्णनांवरून कांहीं टीकाकारांनीं निर्दयपणें त्यांच्यावर प्रहार केले आहेत. मुक्तेश्वरांच्या शृंगारप्रवण वृत्तीचा निषेध करण्याच्या भरांत त्यांच्या काव्यांतील लोकजागृतीच्या गुणाकडे त्याचें लक्षहि गेलेलें दिसत नाहीं. कै. वा. अ. भिडे, कै. पांगारकर वगैरेंसारख्या कांहीं विद्वानांनीं मात्र मुक्तेश्वरांच्या या गुणांची दखल घेतलेली दिसून येते. कै. भिडे म्हणतात :

. . . “ मुक्तेश्वर जरी साधुसंतमालिकेंत मोडत नाहींत, तरी त्यांच्या ग्रंथांकडे नीट लक्ष दिलें असतां असें दिसून येतें कीं त्यांचा आत्मा राष्ट्र-हिताकरितां तळमळत होता. स्वधर्मीयांना सुस्थिति यावी, आपल्या समाजांतील व्यंगें दूर होऊन तो उन्नत व्हावा, दुष्टांचें दंडन व साधूंचें पालन करणारी राजनीति असावी, आपल्या बांधवांनीं मर्दानी पेशा कायम ठेवून दिग्विजयाचा झेंडा नाचवावा, अज्ञानाचा निरास होऊन बहुजन समाजाला जागृति यावी व त्यास आपल्या निकृष्ट अवस्थेचा उलगडा पडावा, ‘ टिळा टोपी ’ करणाऱ्या दांभिक भोंदूंच्या कसबांतून आपला समाज सुटावा, सदाचार नीतीचा विजय व्हावा, अधर्माचे देव्हारे कमी व्हावेत, इत्यादि महाविभूतींच्या अंतःकरणांत निरंतर चळवळणारे विचार मुक्तेश्वराच्या अंतःकरणांतहि खळबळत होते. ”

तात्पर्य मुक्तेश्वरांची कामगिरी तुकाराम-रामदासादि कवींच्या कामगिरी-इतकी विशाल प्रमाणावर नसली तरी, त्याच स्वरूपाची होती असें निःसंदेह-पणें म्हणतां येतें.

* * *

७

# मर्दांचा पोवाडा गाणारा शूर कवि
# भूषण

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

'शूर मर्दांचा पोवाडा शूर मर्दानं ऐकावा' असें एका शाहिरानें म्हटलें आहे. मोठा मार्मिक नि अर्थपूर्ण अभिप्राय या काव्यपंक्तींत व्यक्त झाला आहे. भक्तिरसानें ओथंबलेली कविता लिहायला नामदेव-तुकोबारायासारख्यांची भगवद्भक्तींत डुंबलेली साक्षात्कारी प्रतिभाच हवी. सौंदर्यानुभूतींनीं निथळणारें काव्य रचायला ज्ञानदेवांची विदग्ध रसवत्ताच हवी. वीररसाचा साक्षात्कार घडवायला ओजोगुणाचा स्पर्श झालेली भूषणासारख्या शाहिराची तेजस्वी वाणीच हवी.

वर्ण्यविषयासंबंधीं आपुलकीची, जिव्हाळ्याची भावना असल्याशिवाय त्याला हात घालूं पाहणें यासारखी हास्यास्पद गोष्ट या जगांत दुसरी कोणतीच नसेल. ज्याला गायनकलेंतलें कांहीं एक गम्य नाहीं अशा अरसिकाला गायकाची तानबाजी म्हणजे शुद्ध घसेफोड न वाटली तरच नवल. ज्याला नृत्यकलेचा परिचय नाहीं त्याला नर्तकीचे अंगविक्षेप नि पदन्यास म्हणजे आळोखेपिळोखे आणि पाय आपटणें असल्याचा भास न झाला तरच नवल.

## चंपक आणि शिवाजी

छत्रपति शिवाजी महाराजांसारख्या युगपुरुषाच्या भव्योदात्त जीवन-कार्याचें मूल्यमापन करायला, त्यांच्या पराक्रमाचें यथार्थ वर्णन करायला, तसेंच ज्वलन्त प्रतिभासामर्थ्य अंगीं असणें आवश्यक आहे. हें सामर्थ्य नसलेल्या, खुज्या-खुरट्या व्यक्तींनीं शिवरायांच्या विभूतिमत्त्वाची समीक्षा करतांना स्वतःला कसें हास्यास्पद करून घेतलें हें आपण पहातच आहोंत ! टिचभर फूटपट्ट्या घेऊन शिवबांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची मोजायला सरसाव-लेले हे महात्मे शिवधनुष्याला दोरी चढवण्यांत अपेशी ठरलेल्या गर्वोद्धत रावणासारखे या खटाटोपांत फजित पावले आहेत.

म्हणूनच छत्रपतींच्या जीवितकार्याचें तादात्म्यानें नि रसिकतेनें वर्णन करणाऱ्या कवींत परमानंदाच्या 'शिवभारता'ची किंवा कवि भूषणाच्या 'शिवाबावनी'ची ओळख असणें, त्या महाकाव्यांचें परिशीलन करणें आजच्या घटकेला अत्यंत आवश्यक आहे.

इतर बऱ्याच कवींप्रमाणें भूषणाच्या जन्मकालाविषयीं इतिहासकारांत एकमत नाहीं. शिवाजी महाराजांची कारकीर्द प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहून भूषणानें तिच्यावर काव्य रचलें असें म्हणणारा जसा एक वर्ग अस्तित्वांत आहे, तसा महाराजांच्या मृत्यूनंतर थोड्याच वर्षांनीं भूषणाचा जन्म झाला, असेंहि मानणारा एक वर्ग आहे.

भूषणाचा जन्मकाल वादग्रस्त असला तरी त्याच्या काव्याची थोरवी सर्वांनीं एकमुखानें मान्य केली आहे. वीरपूजनांत रमणाऱ्या त्याच्या प्रतिभेचा विशेष सर्वांच्या आकर्षणाचा नि आदराचा विषय बनला आहे.

भूषणाला शिवाजी महाराजांविषयीं केवढी निष्ठा वाटत होती हें सूचित करणारी एक मनोरंजक आख्यायिका उपलब्ध आहे. भूषणाचा वडील भाऊ हा औरंगजेब बादशहाच्या पदरीं त्याचा दरबारी गवई म्हणून राहिला होता. शृंगारिक कवनें रचून तो बादशहाचें मनोरंजन करीत असे. एकदां तो आपल्याबरोबर भूषणाला औरंगजेबाच्या दरबारांत घेऊन गेला आणि त्यानें बादशहाला त्याची ओळख करून दिली, तेव्हां बादशहा भूषणाला म्हणाला, " तुमचे बंधु इष्कानें भरलेली शायरी जेव्हां जेव्हां आम्हांला ऐकवितात तेव्हां तेव्हां आम्हांला आमच्या अंतःपुराकडे धाव घ्यावीशी वाटते. तुम्ही पराक्रमाचीं वर्णनें करणारे कवि म्हणून स्वतःला समजतां, तर आमच्यावर असें काव्य रचा कीं, जें ऐकतांना आमचा एक हात मिशीवर आणि दुसरा तलवारीकडे जाईल. "

भूषणानें बादशहाचें आव्हान स्वीकारलें अन् तिथल्या तिथें एक दोहा रचला. दोह्याचा पहिला चरण ऐकतांच औरंगजेब अत्यंत संतुष्ट झाला. त्या चरणाचा आशय असा होता : "औरंगजेब बादशहा हा भ्रमर असून तो हाताखालच्या मांडलिकरूपी पुष्पांकडून करभाराचा मकरंद जमा करतो." हा चरण ऐकल्यावर बादशहा उत्सुकतेनें म्हणाला, " तें खरं, पण यांत

शिवाजीचाहि उल्लेख यायला हवा. " तेव्हां भूषणानें क्षणाचाहि विलंब न लावतां दुसरा चरण रचला. त्याचा अर्थ असा होता : " इतर मांडलिक हे जाई, जुई, मोगरा इत्यादि फुलांसारखे असतील, त्यांच्याजवळून करभाराचा मकरंद घेणें बादशहाला शक्य असेल. पण आमचे छत्रपति शिवाजी महाराज म्हणजे चंपकफुलासारखे आहेत. त्यांच्याकडून करभार मिळण्याची सुतराम् शक्यता नाहीं ! "

भूषणानें ध्वन्वर्थानें केलेली शिवाजी महाराजांच्या सामर्थ्यांची स्तुति अर्थातच औरंगजेबाला रुचली नाहीं. त्याचे ओठ क्रोधानें थरथरूं लागले, भूषणाकडे तुच्छतेचा एक दृष्टिक्षेप टाकून त्यानें मिशीला पीळ भरला आणि रागाच्या भरांत तलवार उपसली. भूषणानें स्वीकारलेलें आव्हान खरें करून दाखविलें !

## शौर्याचा शाहीर

भूषणाची शिवप्रभूंविषयीं निष्ठा दर्शविणारी ही आख्यायिका ऐतिहासिक सत्याला कितपत धरून आहे हें सांगतां येत नाहीं. पण त्याला महाराजांबद्दल वाटणारा नितान्त आदरभाव त्याच्या काव्यांतील शब्दाशब्दागणिक प्रकट झालेला पहावयास मिळत असतांना वरील आख्यायिकेची सत्यासत्यता पडताळून पहाण्याचा खटाटोप कशाला ?

शिवाजी महाराज भूषणकवीला नुसते नृपतिच वाटत नव्हते, तर त्यांच्या ठिकाणीं विष्णूचा अंश असल्याची त्याची दृढ श्रद्धा होती. तो म्हणतो:

**इन्द्रको अनुज तै उपेन्द्र अवतार याते,**
**तेरे बाहुबल लै सलाह साधियतु है ।**

तसेंच दुसऱ्या एका छंदांत तो म्हणतो—

**कंस के कुटिल बल बंसन विधिसिबे कौ**
**भयो यदुराय वसुदेव कौ कुमार है ।**
**पृथ्वी पुरूहूत, साहि के सपूत शिवराज,**
**म्लेच्छन मारिवे कौ तेरो अवतार है ।**

शिवबांच्या शौर्याचीं वर्णनें करतांना भूषणाच्या प्रतिभेला विलक्षण स्फुरण चढतें.

**घन की घटा न, गजघटनि सनाह साज,**
**भूषण भनत, आयो सेन शिवराज को।**

वगैरेंसारख्या काव्यपंक्ति वाचीत असतांना या विधानांतील सत्याची ग्वाही पटल्यावांचून रहात नाहीं. शिवाजीच्या नुसत्या नामोच्चारानें शत्रुपक्षाकडील लोकांच्या छातींत कशी धडकी भरत असे, त्यांच्या सर्वांगाचा कसा थरकांप उडत असे, याचें वर्णन करतांना भूषणाला जें अवसान चढतें, त्याच्या वाणींत जो उत्साह संचारतो, तो पहाण्यासारखा आहे. शिवबांचें सैन्य मोगल-सेनेवर तुटून पडतें त्या वेळीं तिची कशी अवस्था होत असेल ? तो प्रसंग शब्दांत निबद्ध करतांना कवि भूषण म्हणतो–

**क्यों न उतपात होंहि बैरिन के झुण्डन में।**
**कारे धन उमड़ि अंगारे बरसत है।**

'शत्रुसैन्यावर मावळे शिपाई चाल करून जात तेव्हां त्यांच्यावर जणूं कांहीं तप्त निखाऱ्यांचा वर्षावच होत आहे कीं काय असा भास होई!' ही भूषणानें केलेली मराठ्यांच्या शौर्याची प्रशंसा अयथार्थ आहे, असें कोण म्हणेल ? औरंगजेबाच्या दुष्ट स्वभावाचें व त्यानें केलेल्या हिंदूंच्या छळाचें भूषणानें केलेलें वर्णनहि असेंच वास्तव व परिणामकारक उतरलें आहे. प्रत्यक्ष जन्मदात्या पित्याला बंदिवासांत टाकणाऱ्या, भावांचा वध करविणाऱ्या आणि कित्येक आप्तेष्टांना स्वार्थासाटीं बळी देणाऱ्या या क्रूरकर्म्यालाहि मशीद बांधण्यासारखें धर्मकार्य करण्याची प्रेरणा व्हावी, या चमत्कारावर उपहासगर्भ भाष्य करतांना कवि भूषण म्हणतो–

**सौं सौं चुहे खाय कै बिलाई बैठी तप के।**

घरांतले सारे उंदीर मारून फस्त केल्यावर भरल्या पोटीं तपश्चर्येला बसलेल्या मांजरीशीं स्वार्थलंपट औरंगजेबाचें कल्पिलेलें साम्य त्याच्या मार्मिकपणाचें निदर्शक आहे यांत शंका नाहीं.

महाराजांच्या कार्याचा गौरव करण्यांत भूषण कसा यशस्वी झाला आहे यासंबंधीं विवेचन करतांना श्री. दशरथ ओझा आपल्या ग्रंथांत म्हणतात, "औरंगजेब की पारिवारिक संहारसंबंधी निन्दा के अतिरिक्त सामाजिक

निन्दा भी कविने की है। पक्का सुन्नी होने से औरंगजेब ने हिन्दुओं को असह्य कष्ट दिये। 'चोटी राखी हिन्दुन की' इस पंक्तिसे ही स्पष्ट है कि शिवाजी ने बलात् धर्म परिवर्तन को किस प्रकार रोका था। इसके अतिरिक्त मंदिर गिराने और उनके स्थानपर मस्जिद बनवाने का भी वर्णन हमें मिल जाता है। यह वर्णन रस की दृष्टि से उद्दीपन विभाव के अन्तर्गत आता है। इस प्रकार के वर्णनों को सुनकर श्रोताओं में तुरन्त यह भावना जाग्रत हो उठती है कि यदि अत्याचारी व्यक्ति सामने आ जाय तो उसे कच्चा खा जाएं। ..... "

## देशभक्त कवि

प्रतिपाद्य विषयाचा आविष्कार करण्यांत भूषणाची प्रतिभा किती निपुण होती आणि त्या विषयाचें हुबेहुब चित्रण करतांना रसिकांच्या हृदयांत इष्ट ती रसनिष्पत्ति घडवून आणणारी त्याची वाणी किती प्रभावी होती, हें वरील उताऱ्यावरून सहज ध्यानांत येईल.

वीररसाप्रमाणें त्या रसाला उठाव आणणाऱ्या बीभत्स, रौद्र, अद्भुत इत्यादि रसांचा परिपोषहि भूषणानें मोठ्या कौशल्यानें केला आहे. दृष्टान्त आणि अलंकारयोजनेंतील त्याची चतुराई प्रशंसनीय आहे.

**इंद्रजिमि जंभ पर वाडव सुअंब पर**
**रावण सदंभ पर रघुकुल राज है।**
**त्यों म्लेंच्छवंस पर सेर सिवराज है।**

इत्यादि पंक्तींवरून त्याचें दृष्टान्तयोजनेंतील कसब जसें प्रत्ययास येतें, तसेंच पौराणिक संदर्भाविषयींचें त्याचें ज्ञानहि उत्तम प्रकारें व्यक्त होतें. 'शिवराजभूषण' हा त्याचा अलंकारासंबंधींचा ग्रंथ त्याच्या साहित्यशास्त्रविषयक व्यासंगाची कल्पना आणून देण्यास पुरेसा आहे. 'भूषण उल्लास', 'दूषण उल्लस', 'भूषण हजारा' इत्यादि रचना त्याच्या ग्रंथकर्तृत्वाची साक्ष पटवितात. पण त्याला साहित्याच्या क्षेत्रांत अक्षय्य कीर्ति प्राप्त करून देणारे खरे दोनच ग्रंथ म्हटले पाहिजेत. एक 'शिवबावनी' व दुसरा 'छत्रसालदशक'. ज्या दोन वीरपुरुषांच्या आश्रयानें भूषणाच्या ओजोगुणाचें संगोपन

नि संवर्धन झालें होतें, त्यांच्या पराक्रमाचें दर्शन घडविणारीं हीं दोन महाकाव्यें केवळ ब्रज भाषेचींच नव्हेत, तर साऱ्या विश्वाच्या साहित्याचीं भूषणें म्हणून निरंतर ओळखलीं जातील. शिवाजी महाराजांप्रमाणें राजा छत्रसालाच्या शौर्याचें, साहसाचें नि स्वाभिमानाचें वर्णन करतांनाहि भूषणाची काव्यप्रतिभा क्षणोक्षणीं उचंबळून येत असल्याचा आपणांला प्रत्यय येतो. उदाहरणार्थ,

**सांगन सों पेलि-पेलि । खग्गन सों खेदि खेदि ।**
**समद सा जीता जो । समर लौं बखाना है ।**
**भूषण बुन्देल मनि चंपत सपूत धन्य,**
**जाके धाकी बचा एक मरद मियां ना है ।**

छत्रसालाच्या सामर्थ्यशाली व्यक्तिमत्त्वाचें वर्णन करतांना भूषणाची भावनोत्कटता किती शिगेला जाऊन पोहोंचत असे, हें या उदाहरणावरून सहज ध्यानांत येईल.

वीरपूजनाचा सतत ध्यास घेणाऱ्या, सारी हयात पराक्रमाचीं वर्णनें करण्यांत घालविणाऱ्या या कविश्रेष्ठाच्या काव्यतपस्येचें महत्त्वमापन करतांना श्री. दशरथ ओझा आपल्या प्रबंधाच्या अखेरीस म्हणतात: "...उस समय जब अन्य कवि नायिका के नखशिख वर्णन की ओर ही दृष्टि लगाए बैठे थे और देश की दुर्दशा 'और उसके कारणोंसे आँखें मूंदे बैठे थे तब भूषण ने अपनी ओजपूर्ण, विवरणात्मक आदि विभिन्न शैलियों में देश में उत्साह की लहर दौडाई । वे स्वयं देशोत्थान के लिए कटिबद्ध थे..."

भूषणाच्या थोरवीचा निर्वाळा यापेक्षां कोणत्या समर्पक शब्दांनीं देतां येण्यासारखा आहे?

* * *

[ ८ ]

# विश्वाला मार्गदर्शन करणारे अंधकवि सूरदास

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

सूरदासांच्या अंधत्वाविषयीं बऱ्याच किंवदंती प्रचलित आहेत. कांहीं विद्वानांच्या मतें हे जन्मापासून अंध होते, तर कांहीं जणांनीं यांना वयाचीं कांहीं वर्षें उलटून गेल्यानंतर अंधत्व प्राप्त झालें असावें, असें मत व्यक्त केलें आहे. सूरदासांनीं स्वतःच्याच हातांनीं आपले डोळे फोडून घेऊन आपलें सारें लक्ष भगवच्चरणीं केंद्रित केलें, असाहि एक विचित्र प्रवाद ऐकूं येतो. निश्चित पुरावा उपलब्ध होईपर्यंत यांतलें कोणतें तरी एखादें मत गृहीत धरणें भाग आहे. बाकी सर्वसामान्य डोळस मनुष्यांहून सूरदासांना जी अपूर्व दिव्यदृष्टि लाभली होती, जें द्रष्टेपण त्यांना मिळालें होतें, त्याविषयीं सर्व विद्वानांचें एकमत आहे यांत शंका नाहीं. जन्मांध असूनहि किंवा फार थोडे दिवस दृष्टिसुख अनुभवलें असूनहि या संतकवीनें आपल्या अभिजात प्रतिभेच्या साहाय्यानें लौकिक व्यवहाराचीं नि दृश्यांचीं अशीं कांहीं सजीव चित्रें रेखाटलीं आहेत कीं, तीं पहात असतांना त्याच्या अनन्यसाधारण काव्यशक्तीचा पदोपदीं साक्षात्कार झाल्याविना रहात नाहीं.

सूरदासांच्या जीवनाविषयीं फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. त्यांचा जन्म संवत १५४० मध्यें व मृत्यु सवंत १६२० च्या सुमारास झाला असावा असें म्हटलें जातें. दिल्लीजवळील सीही या नांवाचें एक लहानसें खेडेगांव ही त्यांची जन्मभूमि असावी, असाहि उल्लेख सापडतो.

## वल्लभाचार्यांचा शिष्य

‘ चौरासी वैष्णवों की वार्ता ’ या ग्रंथांत सूरदासांच्या जीवनांतील कांहीं महत्त्वपूर्ण घटनांचा निर्देश केलेला आढळून येतो. त्यांवरून असें दिसून येतें कीं, सूरदास प्रथम आग्रा व मथुरा या ठिकाणीं साधूच्या वेषांत रहात असत व लोकांना भगवद्भक्तीचा उपदेश करून योग्य व्यक्तींना ते आपले

शिष्यहि बनवीत. पुढें कांहीं दिवसांनीं ‘ गऊ घाटा ’ वर त्यांची व भक्त-शिरोमणि वल्लभाचार्य या सत्पुरुषांची भेट झाली. त्या भेटींत सूरदासांनीं वल्लभाचार्यांना एक स्वकृत पद गाऊन दाखविलें. सूरदासांची प्रासादिक नि मधुर काव्यरचना पाहून त्यांना अतिशय आनंद झाला. त्यांनीं त्याच क्षणीं त्या कविश्रेष्ठाला भागवतांतील कथांवर काव्याचा साज चढविण्याचा आदेश दिला. इतकेंच नव्हे तर, सूरदासांचें असामान्य भाषाप्रभुत्व व लोकोत्तर भक्तिभाव पाहून वल्लभाचार्यांनीं त्यांस शिष्यत्वाची दीक्षा दिली.

सूरदासांना एकंदर सहा भाऊ होते. ते सर्व जण त्यांच्यापेक्षां मोठे होते. हे सहाहि भाऊ मोंगलांबरोबर युद्ध करतां करतां मरण पावले ! सूरदासांना साहजिकच या घटनेमुळें अतोनात दुःख झालें. ते विमनस्क स्थितींत भ्रमण करूं लागले. कालांतरानें ईश्वरोपासनेकडे सारें लक्ष वळवून त्यांनीं शोक आवरला. सामान्य जनांप्रमाणें यापुढें मोह-शोकादि विकारांना थारा न देतां अहोरात्र कृष्णचिंतनांत मग्न व्हावयाचें, असा त्यांनीं आपल्या मनाशीं निश्चय केला. त्यानंतर खरोखरच आपल्या मनाला विचलित होऊं न देतां त्यांनीं शेवटपर्यंत कृष्णभक्तीचें व्रत निष्ठेनें चालविलें.

सूरदासांचा जन्म ब्राह्मणकुळांत झाला किंवा काय याविषयींहि विद्वानांत एकमत नाहीं. कांहींनीं त्यांचा जन्म चन्दबरदाई या वंशांत झाला असावा असा तर्क व्यक्त केला आहे, तर गोस्वामी विठ्ठलनाथ, गोस्वामी यदुनाथ, श्रीनाथ भट्ट, कवि प्राणनाथ इत्यादि समकालीन व्यक्तींनीं सूरदासांचा जन्म ब्राह्मणकुळांत झाला असल्याचा स्पष्ट उल्लेख केला आहे.

‘ चौरासी वैष्णवों की वार्ता ’ या ग्रंथांत या मुद्द्यासंबंधीं कुठेंहि उल्लेख केलेला आढळून येत नाहीं. एवढेंच नव्हे तर, सूरदासांच्या चरित्रांतील सुरुवातीच्या कोणत्याच घटनांचा त्यांत उल्लेख केलेला दिसून येत नाहीं. सूरदासांनीं वल्लभाचार्यांचें शिष्यत्व पत्करलें या प्रसंगानंतरच्या घटनांचा मात्र प्रस्तुत ग्रंथांत निर्देश केला आहे. नाहीं म्हणायला हरिरायकृत ‘ भावप्रकाश ’ व मियां सिंहरचित ‘ भक्तविनोद ’ या दोन ग्रंथांत सूरदासांच्या प्रारंभिक जीवनांतल्या कांहीं घटनांची नोंद केली गेलेली पहावयास मिळते. पण या दोन्ही ग्रंथांत निर्दिष्ट केलेल्या घटनांत बरीच

तफावत असल्यामुळें ते कितपत विश्वसनीय मानावेत, हाहि एक प्रश्नच आहे. मात्र उपर्युक्त दोन्ही ग्रंथांत सूरदास जन्मानें ब्राह्मण असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे.

## उत्तम आणि विपुल साहित्य

वल्लभाचार्यांचें शिष्यत्व पत्करल्यानंतर सूरदासांवर श्रीनाथजींच्या मंदिरांत कथाकीर्तनें करण्याची कामगिरी सोपविण्यांत आली. कथानिरूपणाच्या निमित्तानें सूरदासांनीं हजारों पदें रचलीं. त्यांची प्रेमळ व प्रासादिक वाणी, श्रुतिमधुर कवित्व आणि निरागस भक्तिभाव यांचा श्रोत्यांवर प्रभाव पडायला वेळ लागला नाहीं. हां हां म्हणतां त्यांची कीर्ति सर्वत्र पसरली. दूरदूरचे लोक त्यांची अमृतमधुर वाणी श्रवण करण्यासाठीं श्रीनाथजींच्या मंदिराकडे धाव घेऊं लागले.

गुणांप्रमाणेंच विस्ताराच्या बाबतींतहि सूरदासांचें ग्रंथकर्तृत्व डोळ्यांत भरण्यासारखें आहे. सूरसागर, सूरपचीसी, सूररामायण, राधा-रसकेलि-कौतूहल, सूरसारावली, भंवरगीत, सूरसाठी, साहित्यलहरी, विनय, दृष्टि-कूट, बाललीला, गोपालगारी, बिसातनलीला, सूरशतक, सूरसंगीत-सार, सूरसागर रतन, मयूर-ध्वज राजा की कथा इत्यादि ग्रंथ आजपर्यंत प्रकाशित झाले असून त्यांच्या अप्रकाशित ग्रंथांची संख्याहि अशीच मोठी आहे. दशमस्कन्ध भाषा, नागलीला, व्याहलो, मानलीला, हरिवंश-टीका, एकादशी-महात्म्य, रामजन्म, सेवाफल वगैरे मिळून चौदापंधरापर्यंत त्यांची संख्या सहज भरूं शकेल. परंतु सूरसागरमध्यें वरील बहुतेक प्रसिद्ध-अप्रसिद्ध ग्रंथांतील रचना समाविष्ट झाली असल्यामुळें ह्या निराळ्या रचना मानण्याचें प्रयोजन नाहीं. सूरदासांच्या पदांतील विषयांच्या अनुषंगानें त्या त्या रचना स्वतंत्रपणें प्रसिद्ध केल्या गेल्या, एवढाच याचा मथितार्थ घेणें इष्ट आहे. तेव्हां सूरसागर, सूरसारावली, साहित्यलहरी, नलदमयन्ती व व्याहलो हे त्यांचे पांचच खरे ग्रंथ होत. त्यांपैकीं ‘ नलदमयन्ती ’ काव्यावर सूफी विचारसरणींचा प्रभाव पडल्याचें दिसून येतें. प्रस्तुत ग्रंथ सूरदास नांवाच्या दुसऱ्याच कुणी-तरी कायस्थ ब्राह्मण कवीनें रचला असावा, असेंहि एक मत प्रदर्शित केलें

जातें. त्याचप्रमाणें ' व्याहलो ' हा ग्रंथ सूरदासरचित मानला जात असला तरी तो अद्याप कुणाच्याहि पहाण्यांत आला नसल्यामुळें त्यांच्या उरलेल्या तीन रचनांविषयींचें विवेचन करतां येणें शक्य आहे.

सूरसागर या ग्रंथांत श्रीमद्‌भागवताचा अनुवाद करतांना सूरदासांनीं मूळ कथांचा रसाळपणा कायम ठेवून स्वतःच्या प्रतिभावैभवाचाहि जागजागीं प्रत्यक्ष आणून दिला आहे. विशेषतः दशमस्कंधावर टीका लिहितांना त्यांच्या काव्यशक्तीचा संपूर्ण विकास झाल्याचें मनोज्ञ प्रत्यंतर मिळतें. या बाबतींत तुलसीदासांबरोबर तुलना करतांना श्री. दशरथ ओझा सूरदासांवरील प्रबंधांत म्हणतात, " ...जिस प्रकार तुलसी ने रामचरित मानस में अयोध्याकाण्ड को खूब मनोयोग से रचा है, उसी प्रकार सूरसागर में सूर ने दशमस्कन्ध को ग्रथित किया है।..."

सूरसागरांत प्रामुख्यानें कृष्णलीला वर्णिली असली तरी त्या विषयाला सूरदासांनीं विशिष्ट मर्यादा घातलेली स्पष्ट दिसून येते. या संदर्भांत श्री. दशरथ ओझा म्हणतात, " ...अनेक पुराणों, काव्यों और नाटकों में कृष्णलीला का वर्णन है, पर देखना यह है कि सूरसागर में कृष्णलीला का कौनसा अंग लिया गया।... सूर ने भगवान् कृष्ण का गोपाल, नंदनंदन, और राधागोपीवल्लभ रूप अधिक अपनाया है। महाराज कृष्ण के वैभव-विस्तार, यशविस्तार पर उन्हों ने कुछ लिखना उचित नहीं समझा।..."

सूरदासांना कृष्णाच्या बाललीलांचें वर्णन करण्यांतच अधिक गोडी वाटावी आणि इतर घटनांत त्यांचें मन रमूं नये याला त्यांच्या प्रकृति-विशेषावांचून अन्य कोणतें कारण असेलसें वाटत नाहीं. रामायणाचा अनुवाद करतांना निरनिराळ्या कवींनीं आपापल्या प्रकृतिधर्मानुसार प्रभु रामचंद्रांच्या वेगवेगळ्या गुणविशेषांवर भर दिलेला जसा दिसून येतो, तसाच प्रकार कृष्णचरित्राचें विवेचन करणाऱ्यांच्याहि बाबतींत घडलेला पहावयास मिळतो. कुणी योद्धा म्हणून, तर कुणी तत्त्वज्ञ म्हणून; कुणी राजकारणपटु म्हणून, तर कुणी धर्मनीतीचा पालनकर्ता म्हणून; कुणी पीडितांचा उद्धारक म्हणून, तर कुणी भक्तांचा साहाय्यक म्हणून श्रीकृष्णाच्या जीवनकार्याची आलोचना केलेली आढळून येते.

## कृष्णवर्णनांत रमणारे सूरदास

लौकिक आणि अलौकिक अशा दोन्ही प्रकारच्या कृष्णलीलांचें वर्णन करतांना सूरदासांची प्रतिभा कशी पल्लवित होते व कांहीं ठिकाणीं तिचा स्वतंत्र, अभिजात विलासहि कसा पहावयास मिळतो, याविषयीं श्री. दशरथ ओझा म्हणतात : " सूर ने भगवान् कृष्ण की लीलाओं को दो रूपों में रचा है, ( १ ) अलौकिक और ( २ ) लौकिक. अलौकिक लीलाओं में भगवान् के वे कार्य हैं जिन्हे सुनकर सभी को आश्चर्य होता है, जैसे पूतनावध, शकटासुर-वध, अघासुर-वध, गोवर्धनपूजा, ऊखल-बंधन, कालियादमन आदि, इन कथाओंमें भगवान का षोडशकला का पूर्ण ईश्वरीय रूप दिखाई देता है। सूरप्रसिद्धि का विशेष आधार लौकिक लीलाएं हैं। श्रेष्ठ काव्यत्व, भक्ति और रहस्यवाद का सुन्दर समन्वय इन्हीं लौकिक लीलाओंमें है। चीर-हरण, पनघटलीला, दान-लीला, रास, राधा के मान आदि लीलाओं का वर्णन सूर ने इस प्रकार अविच्छिन्न सूत्र में पिरो कर किया है कि आस्चर्य होता है। एक ओर तो ये लीलाएं लीलामात्र किन्तु दूसरी ओर आध्यात्मिक रूपक भी हैं जिनके द्वारा अध्यात्मभाव की सुंदर अभिव्यंजना हुई है। सूरके अनेक कथानक काल्पनिक हैं। जो भागवत में तद्वत् रूपमें नहीं मिलते। सूर की प्रतिभाके यही द्योतक हैं।..."

सूरदासांच्या वेळची राजकीय नि सामाजिक परिस्थिति विचारांत घेतली असतां त्यांच्या जीवनकार्यांचें विशेष महत्त्व जाणवूं लागतें. मुसलमानी आक्रमणानें सारा देश खिळखिळा झाला होता, जीवनमूल्यें ढासळूं पहात होतीं, जीवनविषयक निष्ठेची जागा नैराश्य, दुःख व स्वेच्छाचार घेऊं पहात होते, अशा वेळीं वल्लभाचार्यांनीं व सूरदासादि शिष्योत्तमांनीं संभ्रमित समाजाला कृष्णभक्तीचा सर्वसुलभ मार्ग दाखवून त्यांच्या जीवनांत उत्साह नि आनंद निर्माण केला. सूरदासांनीं व त्यांच्या समकालीन कविश्रेष्ठांनीं केलेलें हें कार्य चिंतनीय नाहीं असें कोण म्हणेल ?

सूरदासांनीं ज्या काव्यगुणांच्या बळावर रसिकांचीं मनें आकृष्ट केलीं त्यांपैकीं कांहीं ठळक गुणांचा परिचय करून देणारीं एकदोन उदाहरणें देणें अप्रस्तुत ठरणार नाहीं. प्रथम भेटींत राधेविषयीं आकर्षण उत्पन्न

झाल्यानंतर कृष्ण तिच्या सहवासाला कांहीं काळपर्यंत मुकतो. पुन्हां दोन प्रेमी जीव एकत्र येतात तेव्हां त्यांच्यांत झालेलें संभाषण सूरदासांनीं किती स्वाभाविकतेनें काव्यनिबद्ध केलें आहे तें पहा.

**बूझत स्याम, कौन तू गोरी । कहां रहति, काकि तू बेटी ?**
**देखी नहिं कहूं ब्रज खोरी । काहे को हम ब्रजतन आवति ?**
**खेलति रहति आपनी पौरी । सुनति रहति श्रवनन नंद ढोढा,**
**करत रहत माखन दधि चोरी । तुम्हरी कहा चोरी हम लै हैं ?**
**खेलन चलौ संग मिलि जोरी । सूरदास प्रभु रसिक सिरोमनि,**
**बातन भुरइ राधिका भोरी ।**

यौवनसुलभ अवखळपणाचें किती सहजसुंदर दर्शन सूरदासांनीं वरील संभाषणांतून घडविलें आहे !

अशा प्रकारच्या संयत शृंगाराचीं हवीं तेवढीं उदाहरणें सूरदासांच्या काव्यसंभारांतून काढून दाखवितां येतील. कृष्ण म्हणजे एक उल्लू, स्त्रैण, उनाड पुरुष व राधा म्हणजे एक छटेल, नखरेबाज तरुण पोर समजून त्या दोघांच्या उत्तान, कामुक चेष्टांचें मिटक्या मारीत वर्णन करणाऱ्या शब्दजुळाऱ्यांनीं सूरदासांच्या शृंगाराचें हें सोज्ज्वळ नि सात्त्विक स्वरूप अवश्य ध्यानांत घ्यावें.

## अद्वैतवादी कवि

प्रेमिकांचे रुसवेफुगवे, हेवेदावे, रागलोभ इत्यादींचें कौशल्यानें वर्णन करण्यांत सूरदासांना जेवढें यश मिळालें तेवढें क्वचितच दुसऱ्या कवीला मिळालें असेल अशी अनेक समीक्षकांनीं कबुली दिली आहे. बालसुलभ विकारांचें, अल्लडपणाचें व निरागसतेचें चित्रण करण्यांतहि सूरदासांनीं विलक्षण कौशल संपादन केलें होतें यांत शंका नाही. श्री. ओझा याविषयीं म्हणतात : “ सूर ने शृंगार और वात्सल्य के क्षेत्र में जो भाव-व्यंजना की है उसकी समता म और कोई कवि नहीं पहुँच सकता । संयोग सुख के जितने प्रकार के क्रीडा-विधान हो सकते हैं, वे सब सूर ने लाकर इकठे कर दिये हैं । ...... ”

सूरदासांच्या काव्याचें अंतरंग शृंगार, वात्सल्य, भक्ति इत्यादि रसांनीं जसें मोहक बनलें आहे तसें रीति, अलंकार, छंद इत्यादि गुणांच्या आश्रयामुळें त्याचें बाह्यांगहि आकर्षक झालें आहे. सूरदासांचा उपजतच संगीताकडे ओढा असल्यामुळें व पुढें व्यासंगाची जोड देऊन त्यांनीं संगीतविषयक अभिरुचि जोपासल्यामुळें श्रुतिमधुर चालींवर व निरनिराळ्या रागरागिणींत पद्यरचना करणें त्यांना सहज साध्य झालें. त्यांच्या कवित्वांत आढळून येणारें पदलालित्य व गेयता या दोन गुणांमुळेंहि त्यांच्या काव्याला कमालीची लोकप्रियता लाभली.

**फटिक भूमिपर कर-पग-छाया। यह शोभा अति राजति।**
**करि-करि प्रति पद प्रीति मनो। वसुधा कमल बैठकी साजति॥**

स्फटिकाच्या अंगणांत गुडघ्यावर रांगणाऱ्या बालमुकुंदाचें हें वर्णन, किंवा—

**नंदनंदन के अंगअंग प्रति। उपमा न्याय दई।**
**कुंतल कुटिल भँवर भरि भाँवरि। मालति भुरै लई॥**

विरहव्याकुळ गोपिकांचा लटका रोष सूचित करणाऱ्या या पद्यपंक्ति सूरदासांच्या लालित्यपूर्ण, श्रवणसुभग रचनाकौशल्याची साक्ष सहज देतील.

पौराणिक युगांतील सांस्कृतिक नि साहित्यिक परंपरेच्या अधिष्ठानावर सूरदासांच्या काव्याची उभारणी झाली आहे. गुप्तयुगाबरोबरच बौद्धधर्मालाहि उतरती कळा लागून आठव्या शतकाच्या अखेरीस शंकराचार्यांच्या प्रयत्नामुळें वैदिक तत्त्वज्ञानाची पताका पुन्हां डौलानें आर्यावर्तांत फडकूं लागली होती. शंकराचार्यांनंतर उदयास आलेल्या बहुतेक हिंदु कवींच्या विचारसरणीवर अद्वैतवादाचा प्रभाव पडूं लागला. सूरदासहि यास अपवाद राहिले नाहींत. आचार्यांनीं पुरस्कृत केलेला अद्वैतवाद त्यांच्या काव्यांत सर्वत्र दिसून येतो.

सूरदासांच्या महनीय व्यक्तिमत्त्वाविषयीं तानसेन यानें म्हटलें आहे :

**किधौं सूर को सर लग्यो। किधौं सूर की पीर।**
**किधौं सूर को पद लग्यो। तन-मन-धुनत सरीर॥**

* * *

[ १ ]

## हिंदी साहित्यसृष्टींतील सर्वश्रेष्ठ महाकवि
# गोस्वामी तुलसीदास

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

भगवान श्रीकृष्णांच्या शैशवांतल्या अव्याज मनोहर लीला व यौवनावस्थेंतला मुग्ध शृंगार यांचें चित्रण करणारी सूरदासांचीं प्रतिभा चंद्रिकेसारखी सुशीतल म्हटली, तर मर्यादापुरुषोत्तम प्रभु रामचंद्राच्या चरित्राचा भव्य आदर्श समाजासमोर ठेवणारी तुलसीदासांची काव्यशक्ति सूर्यकिरणांसारखी समुज्ज्वल नि स्वयंप्रकाशित म्हटली पाहिजे. हिंदी साहित्यविश्वांतले हे सूर्यचंद्र-तुलसीदास नि सूरदास-आत्मोद्धाराची कास धरूं इच्छिणाऱ्या मुमुक्षूंना आणि साहित्यसाधनेचें व्रत अंगीकारूं इच्छिणाऱ्या वाङ्मयभक्तांना सदैव मार्गदर्शन करतील यांत तिळप्राय शंका नाहीं.

तुलसीदासांच्या जन्मस्थलाविषयीं विद्वानांत मतैक्य नाहीं, तशी त्यांच्या जन्मकालाविषयींहि एकवाक्यता नाहीं. कांहींजणांनीं संवत् १५८३ किंवा १५८६ हा तुलसीदासांचा जन्मकाल असावा असा तर्क केला आहे, तर कांहींनीं संवत् १५५४ श्रावण शुद्ध सप्तमी या दिवशीं त्यांचा जन्म झाला असावा असें अनुमान बांधलें आहे. चित्रकूटानजीकच्या हाजापूर या गांवीं तुलसीदासांचा जन्म झाला असावा असें मत विल्सन, लासी इत्यादि पाश्चात्त्य विद्वानांनीं व्यक्त केलें आहे. कांहीं जणांना 'तारी' नांवाचें खेडें त्यांचें जन्मस्थान असावें असें वाटलें, तर कांहींनीं 'सोरो' नांवाचें गांव त्यांचें जन्मस्थान असल्याचा दावा केला आहे. अलीकडे उपलब्ध झालेल्या कांहीं प्रमाणांवरून उत्तर प्रदेशांतील बांदा जिल्ह्यांत असलेलें 'राजापूर' हेंच तुलसीदासांचें जन्मस्थान असावें या मताला पुष्टि येत चालली आहे.

## खडतर बालपण

तुलसीदासांना मातापित्यांच्या सहवासाचें सुख मुळींच लाभलें नाहीं. मूळ नक्षत्रावर जन्मास आल्यामुळें त्यांच्या जन्मदात्रीचा मृत्यु प्रसूतिकाळाच्या वेळीं ओढवला असा सर्वांचा समज झाला. घरांतील सर्व

नातलगांच्या मनांतून ते उतरले. थोड्या कालावधिनंतर त्यांच्या वडिलांनींहि इहलोक सोडला. त्यानंतर तुलसीदासांना घरांत रहाणें जवळजवळ अशक्य झालें. त्यांना कोणीच नीट वागवीना. याविषयीं लिहितांना तुलसीदास एका दोह्यांत म्हणतात :

**मातु पिता जग जाई त्यज्यौ, बिधिहू न लिखी कछु भाल भलाई।**

स्वतःच्या दैवदुर्विलासाविषयींचे असे अनेक उल्लेख त्यांनीं आपल्या ' कवितावली ' ' विनयपत्रिका ' इत्यादि काव्यांत केलेले आढळतात. गृहत्यागानंतर त्यांना अनेक विपत्तींशीं टक्करा देत इतस्ततः भटकावें लागलें. थोड्याच दिवसांनीं ते साधुसंतांच्या मेळ्यांत सामील झाले व त्यांच्याबरोबर तीर्थयात्रा करीत परिभ्रमण करूं लागले. जातीपातीचा विचार न करतां दारोदार भिक्षा मागून मिळेल तें शिळेंपाकें अन्न खाण्याचा दुर्धर प्रसंग त्यांच्यावर ओढवला. ते एके ठिकाणीं म्हणतात :

**द्वार द्वार दीन कही, काढि रद परि पाहू।**

तसेंच, दुसऱ्या एका ठिकाणीं या अगतिक, लाचार जिण्याविषयीं ते असे उद्गार काढतात :

**जाति के सुजाति के, कुजाति के पेटागि बस।**
**खाये टूक सबके विदित दुनीसो ॥**

वाईटांतून कधीं कधीं चांगलेंहि निपजत असतें. उपेक्षित, उजाड भूमींतूनच कधीं कधीं भरघोस पीक निघतें. दारोदार भीक मागतांना तुलसीदासांना भल्याबुऱ्यांच्या हातचा शिळापाका तुकडा खावा लागला, पण त्या प्रसंगानें दोन गोष्टींची शिकवण त्यांच्या हृदयावर ठसविली. सुखासीनतेकडे धांव घेणाऱ्या ओढाळ मनाला ते आपल्या कह्यांत आणूं शकले आणि जातीपातीसंबंधींचा भ्रामक उच्चनीच भाव नाहींसा होऊन त्यांच्या ठिकाणीं समतेची भावना दृढमूल झाली. अशा परिस्थितींत नरहरिदास नांवाच्या कोणा एका सत्पुरुषाच्या सान्निध्याचा लाभ त्यांना घडला. या सत्पुरुषाकडून त्यांना उपदेश मिळाला व त्याच्याच तोंडून रामकथाहि ऐकावयास मिळाली असें कांहीं चरित्रकार सांगतात. पण हा मुद्दा अद्यापहि वादग्रस्तच राहिला आहे.

' नरहरि ' हे कोण्या व्यक्तीचें नांव नसून परमेश्वरालाच मनुष्यरूपांत आपला गुरु मानून त्यांनीं त्याचा सादर उल्लेख केला असें मानण्याकडे बऱ्याच जणांचा कल आहे.

' मूल गोसाई चरित ' या ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं, "वे (तुलसीदास) अपने गुरु के साथ काशी में पंचगंगा घाट पर स्वामी रामानन्द के स्थान-पर रहने लगे। वहीं शेष सनातनजी रहते थे। उनसे तुलसीदासजी ने वेद, वेदांग, शास्त्र, इतिहास, पुराण, काव्यकला का बडे मनोयोग से अध्ययन किया। पन्ध्रह वर्षतक यह अध्ययनक्रम चला। रामभक्ति के साथ विद्या-ध्ययन के द्वारा वे प्रकाण्ड पण्डित भी हो गए।"

तुलसीदासांनीं कुणाचें शिष्यत्व पत्करलें होतें किंवा काय हा मुद्दा वाद-ग्रस्त असला किंवा तें पत्करलें असल्यास त्यांचे गुरु कोण असावेत यासंबं-धींहि अद्याप निश्चित पुरावा उपलब्ध झाला नसला तरी काव्यरचनेला प्रवृत्त होण्यापूर्वींच त्यांच्या बुद्धीवर विद्येचे प्रगाढ संस्कार झाले होते, शास्त्राध्ययनानें ती प्रगल्भ, सुसंस्कृत बनली होती हें त्यांच्या साहित्यकृतीं-वरून सहज दिसून येतें.

लहानपणीं मातृपितृसुखाला आंचवल्यावर तुलसीदास घराबाहेर पडून बैराग्यांच्या मेळ्याबरोबर पर्यटन करूं लागले व त्याच वेळीं त्यांना राम-चरित्राची गोडी लागून एक प्रकारची विरक्ति त्यांच्या ठिकाणीं बाणूं लागली, असा उल्लेख वर केलाच आहे.

## लाज न लागत

पण माणसाचें मन हें नाठाळ जनावरासारखें असतें. कित्येकदां तें ताब्यांत आल्याप्रमाणें वाटतें, पण संधि मिळतांच पुन्हां तें मोकाट बनून चौखूर उधळूं लागतें. तुलसीदासांचें असेंच झालें. आप्तेष्टांच्या छळामुळें व घराबाहेरील हालअपेष्टेमुळें त्यांच्या वृत्तीवर उद्विग्नतेची छाया पसरून ऐहिक सुखाविषयीं त्यांना एक प्रकारची अनासक्ति वाटूं लागली होती खरी, पण ती क्षणजीवी ठरली. संसारसुखाविषयींच्या मोहानें त्यांच्या मनावर ताबा मिळविला व ते दीनबंधु पाठक यांच्या कन्येबरोबर विवाहबद्ध झाले.

तुलसीदासांची ही वधु सुविद्य, सुसंस्कृत नि सुस्वरूप होती. गळ्यांतल्या तुलसीमाळेपेक्षां तुलसीदासांना, जात्याच लावण्यसंपन्न नि सद्गुणी असलेल्या रत्नावलीचे कंठाभोंवतालचे बाहुपाश अधिक प्रिय न वाटले तरच नवल !

सामान्य जनांप्रमाणें आपणहि विषयसुखाला बळी पडून रामसेवेला कसे अंतरलों, याविषयीं त्यांनीं स्वतःच 'कवितावलीं'त कबुली दिली आहे. ते म्हणतात–

**बालपन सूधे मन राम सनमुख गयो,**
**रामनाम लेत मांगि खात टूक टाक हौं ।**
**पर्‍यो लोकरीतिमें पुनीत प्रीति रामराय**
**मोह बस बैठो तोरि तरक तराक हौं ।**

तुलसीदास वैराग्याकडून विषयाकडे वळले खरे, पण तिथेंहि त्यांचें मन फार काळ रमूं शकलें नाहीं. आपल्या रूपसंपदेनें वेड लावणाऱ्या रत्नावलीच्या ठिकाणीं मोहविवश मनाला जागें करण्याइतकें सामर्थ्यहि निहित असल्याचा तुलसीदासांना एके दिवशीं अचानक साक्षात्कार झाला ! एखाद्या विषयलोलुप जीवानें शृंगारिक लावणी घोळवून घोळवून मनाशीं गुणगुणावी आणि ती गुणगुणतांनाच तिच्यांत वैराग्यपर अर्थ भरला असल्याचें ध्यानांत येतांच त्याच्या भोगासक्त मनाला एक प्रकारची खंत वाटावी, तशी तुलसीदासांची अवस्था झाली. एके दिवशीं रत्नावलीनेंच त्यांच्या भोगप्रवण वृत्तीचा निषेध करून त्यांना परमार्थाकडे वळविलें, अशी त्यांविषयीं एक आख्यायिका प्रचलित आहे. पत्नी माहेरीं गेली असतांना तुलसीदासांना घर सुनें सुनें वाटूं लागलें अन् ते मागचा-पुढचा विचार न करतां तडक सासुरवाडीस जायला निघाले. पावसाळ्याचे दिवस, नद्यानाल्यांना पूर आलेला, काळोखी रात्र ! पण अशाहि स्थितींत रत्नावलीच्या भेटीसाठीं आतुर झालेले तुलसीदास घराबाहेर पडले.

तुलसीदासांना पाहतांच रत्नावलीला जसे आश्चर्य वाटलें तसें दुःखहि झालें. पतीविषयीं आदरभाव राखूनहि त्याचा प्रमाद त्याच्या निदर्शनाला आणून देणें तिच्या कर्तव्यकठोर मनाला आवश्यक वाटलें व ती म्हणाली,

**लाज न लागत आपको, दौरे आयेहु नाथ ।**
**धिक् धिक् ऐसे प्रेम को, कहा कहौं मैं नाथ ॥**
**अस्थिचर्ममय देह मम, तामें जैसी प्रीति ।**
**तैसे जो श्रीराम महं होती न तो भवभीति ॥**

पत्नीचे हे निर्भर्त्सनेचे शब्द ऐकून तुलसीदासांच्या वृत्तीवरील विषयाची धुंदी खाडकन् उतरली. पंचाक्षऱ्याच्या प्रभावी मंत्रोच्चाराबरोबर पिशाच्चबाधा झालेल्या इसमानें शुद्धीवर यावें, तशी त्यांची वैराग्यशील वृत्ति पुन्हा जागृत झाली आणि त्यांनीं परमार्थाचा ध्यास घेतला तो कायमचाच. त्यानंतर संसारांतील कसलाहि मोह, कोणतेंहि प्रलोभन त्यांच्या मनाला भुरळ पाडूं शकलें नाहीं; प्रभु रामचंद्राच्या ठिकाणीं विसावलेल्या त्यांच्या वृत्ति विचलित करूं शकलें नाहीं.

मोहविवश मनाला सावध करणाऱ्या रत्नावलीचा राग न येतां तिच्या कर्तव्यपरायणतेविषयीं त्यांना कृतज्ञताच वाटली. " हम तो चाखा प्रेमरस पत्नी के उपदेश " या शब्दांत त्यांनीं पत्नीविषयींचा कृतज्ञताभाव व्यक्त केला आहे.

## अपूर्व रसवत्ता

संसारांतलें लक्ष उडाल्यानंतर तुलसीदासांना घराच्या चार भिंतींची मर्यादा साहजिकच थिटी वाटूं लागली. आपल्या उपास्य देवतेच्या – प्रभु रामचंद्राच्या – दर्शनासाठीं अधीर होऊन ते घराबाहेर पडले. जगन्नाथपुरी, रामेश्वर, द्वारका, बदरिकाश्रम इत्यादि अनेक स्थळांची यात्रा करून ते मानससरोवर येथें गेले. या भ्रमन्तींत त्यांना खंडप्राय भरतभूमींतल्या समाजाचें सूक्ष्म निरीक्षण करण्याची संधि मिळाली. धर्माच्या नांवाखालीं लोकांच्या जीवनांत शिरलेले भलभलते आचार, त्यांची आर्थिक दुर्दशा, राजकीय गुलामगिरीमुळें झालेला अधःपात हें सारें त्यांनीं अगदीं जवळून पाहिलें.

त्यांच्या अनुभवसंपन्न व्यक्तिमत्त्वाचा, वैराग्यशीलतेचा सौरभ जसजसा दरवळूं लागला, तसतसे भाविक लोक त्यांच्या सहवासाचा लाभ घेण्यासाठीं, त्यांची उपदेशामृतानें भरलेली मधुरवाणी ऐकण्यासाठीं त्यांच्याभोंवतीं गोळा

होऊं लागले. पण फुलांतल्या मकरंदावर लुब्ध होऊन त्याच्याभोंवतीं भ्रमर घिरट्या घालतात, तसें त्याच्या पाकळ्या कुरतडणारे विध्वंसक वृत्तीचे कीटकहि जमा होतात, हा सृष्टीचा न्यायच आहे ! तुलसीदासांच्या लोकोत्तर गुणांवर मोहित होऊन भक्तजनांचा त्यांच्याभोंवतीं गराडा पडला, तसे दुष्ट लोकहि त्यांना छळण्यासाठीं पुढें सरसावले. परंतु ईश्वरोपासनेनें आत्मिक सामर्थ्याची प्रतीति आलेल्या तुलसीदासांना असल्या समाजकंटकांचें थोडेंच भय वाटणार ? 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे ?' असा खंबीर वाणीनें रोकडा सवाल टाकणाऱ्या समर्थ रामदासांप्रमाणेंच तुलसीदासांनींहि—

"कौन की त्रास करै तुलसी जो पै राखि है राम तो मारि है को रे ?" असें स्पष्ट शब्दांत दुष्टांना आव्हान दिलें आहे.

जगाचे बरेवाईट अनुभव घेतल्यावर नि शास्त्राध्ययनानें परिणतप्रज्ञ बनल्यानंतर तुलसीदासांनीं निर्माण केलेल्या साहित्यकृति अक्षर वाङ्मयांत गणल्या जाण्याइतक्या तोलामोलाच्या ठराव्यात यांत कोणतेंच नवल नाहीं.

साहित्यनिर्मितीकडे पाहण्याचा तुलसीदासांचा दृष्टिकोन थेट ज्ञानेश्वरांच्या मतासारखाच आहे. परतत्त्वाचा स्पर्श झाल्याशिवाय काव्याची सार्थकता नाहीं हें ज्ञानेश्वरांचें मत तुलसीदासांनाहि अभिप्रेत असल्याचें स्पष्ट दिसून येतें.

**रामचरित सर बिन्दु अन्हवाये**
**सो श्रम जाइ न कोटि उपाये ।**

अशा वचनांवरून त्यांची काव्यविषयक मतप्रणालि सहज अजमावतां येते.

लहानमोठे मिळून एकंदर बारा ग्रंथ तुलसीदासांनीं लिहिल्याचा उल्लेख सांपडतो. दोहावलि, कवित्तरामायण, रामचरितमानस, गीतावली व विनयपत्रिका या पांच ग्रंथांचा विस्तार मोठा असून पार्वतीमंगल, जानकीमंगल, वैराग्यसांदीपनी, कृष्णगीतावली वगैरे ग्रंथ त्या मानानें बरेच लहान आहेत. आणखीहि कांहीं लहानमोठ्या कृति तुलसीदासांच्या नांवावर उल्लेखिल्या जातात. परंतु या मुद्द्याच्या खरेखोटेपणांविषयीं उलटसुलट विधानें विद्वानांकडून केलीं जात असल्यामुळें त्याबद्दल निश्चित असें कांहींच लिहितां येत नाहीं.

वरील बारा ग्रंथांवरून तुलसीदासांच्या काव्यशक्तीचे उज्ज्वल पैलू दृष्टोत्पत्तीस येतात. अर्थघन शब्दांची योजना करण्याचें त्यांचें कसब जितकें विलोभनीय आहे, तितकीच रसिकांच्या अंतःकरणांत नवरसांचे सागर उचंबळायला लावणारी त्यांची रसवत्ताहि अपूर्व आहे. शब्दाशब्दांतून काव्यानंदाची प्रतीति घडविणाऱ्या त्यांच्या प्रतिभासामर्थ्याची करावी तेवढी स्तुति थोडीच होईल. दोहा, सोरठ, चौपाई वगैरे भिन्न भिन्न छंदांचा विषयानुरूप व रसानुकूल वापर करून त्यांनीं काव्याच्या बाह्यांगाकडेहि लक्ष पुरविल्याचें दिसून येतें.

'रामचरितमानस' या त्यांच्या सर्वश्रेष्ठ महाकाव्यांत काव्याचे आंतरिक व बाह्य असे दोन्ही प्रकारचे गुण उत्कटत्वानें प्रत्ययास येतात. आशयाच्या दृष्टीनें प्रस्तुत ग्रंथाची थोरवी किती असाधारण आहे, याविषयीं लिहितांना श्री. दशरथ ओझा आपल्या प्रबंधांत म्हणतात, "रामचरितमानस मानव-जीवन का महाकाव्य है। इसके द्वारा गोस्वामीजीने हमारी आध्यात्मिक और भौतिक समस्याओं को सुलझाने का प्रयत्न किया है। राम, सीता, भरत, दशरथ, कौसल्या, लक्ष्मण, हनुमान आदि के त्याग, प्रेम, सेवा, और कर्तव्यपूर्ण चरित्र हमारे ईर्षा-द्वेष,वैर-संघर्षसे भरे समाज के लिए अमृत-मयी जीवनदायिनी औषधि है। पिता-पुत्र, पति-पत्नी, भाई-भाई, स्वामी-सेवक, राजा-प्रजा के जो आदर्श रूप इसमें विद्यमान हैं, समाज में उसी की स्थापना के लिए गोस्वामीजीने निरन्तर प्रयत्न किया। ..."

## क्रान्तदर्शी तत्त्वज्ञ :

भोळ्याभाबड्या लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांचा बुद्धिभेद करणाऱ्या, त्यांना धर्मप्रणीत मार्गापासून भ्रष्ट करणाऱ्या भिन्न भिन्न संप्रदायांच्या प्रवर्तकांचा नि प्रणेत्यांचा खटाटोप तुलसीदासांनीं पाहिला होता. त्यांच्या कचाट्यांतून समाजाची सोडवणूक करण्यासाठीं त्याच्यापुढें रामायणाचाच आदर्श मांडणें उचित आहे, हें त्यांनीं ओळखलें आणि 'रामचरितमानसा'च्या रचनेला हात घातला.

सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, नैतिक आणि वाङ्मयीन गुणांच्या दृष्टीनें पूर्णत्वाला पोहोंचलेली ही एकच साहित्यकृति तुलसीदासांनीं रचली असती, तरी त्यांना ‘ महाकवि ’ ही उपाधि मिळवून द्यायला ती समर्थ ठरली असती, यांत मुळींच शंका नाहीं. ते नुसते कविच होते असें नव्हे, तर तत्त्वज्ञ, संत, क्रांतिकारक इत्यादि दृष्टींनींहि त्यांची योग्यता फार मोठी होती, हें निर्विवाद आहे. श्री. दशरथ ओझा तुलसीदासांच्या व्यक्तिमत्त्वाचें महत्त्वमापन करतांना म्हणतात,

“ गोस्वामीजी भारतीय धर्मपरंपरा के पोषक थे। उनका हृदय विशाल था और दृष्टि थी व्यापक। वे साधु, ऋषि, क्रान्तदर्शी, समाजसुधारक और सम्पूर्ण जीवनधारियों से स्नेह करनेवाले महात्मा थे। देश में परतंत्रता के कारण समाज की विशृंखलता को उन्होंने पहचाना। विवादग्रस्त निर्गुण-सगुण, शैव-वैष्णव, अवतारवाद तथा जीवन की विविध समस्याओं को उन्होंने सुलझाया। उन्होंने राम-भक्ति का प्रतिपादन करते समय अध्यात्म-तत्त्व का जो निरूपण किया है, उसका सर्वमान्य आर्यसिद्धान्तोंसे कहीं विरोध नहीं।...”

अशा या थोर, सच्चरित, प्रतिभासंपन्न महाकवीचें जीवनकार्य भवसागरांतल्या प्रवाशांना एखाद्या भव्य दीपस्तंभाप्रमाणें सदैव मार्गदर्शन करीत राहील.

* * *

[ १० ]

# हरिवरदाकार कृष्णदयार्णव

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधावर बेचाळीस हजार ओव्यांची विस्तीर्ण टीका लिहिणारे कवि श्रीकृष्णदयार्णव कालपरवांपर्यंत उपेक्षित स्थितींत रहावेत, हें आपणां महाराष्ट्रीयांचें दुर्दैव म्हटलें पाहिजे. नुसत्या संख्येच्या व विस्ताराच्याच दृष्टीनें नव्हे, तर गुणवत्तेच्या बाबतींतहि कृष्णदयार्णवांची दशमस्कंधावरील हरिवरदा टीका आजपर्यंतच्या संतपरंपरेंत निपजलेल्या काव्यांची बरोबरी करील इतकी सुरस नि विदग्ध आहे.

पण काय असेल तें असो, इतक्या रसाळ, विद्वत्तापूर्ण टीकेकडे आजवर महाराष्ट्रांतील विद्वानांचें व रसिकांचें जावें तसें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वी प्रस्तुत ओवीबद्ध टीकेची पहिली आवृत्ति प्रकाशित झाली होती. ती आवृत्ति संपल्यानंतर बरींच वर्षें लोटलीं तरी कुणीहि धंदेवाईक प्रकाशक तिचें पुनर्मुद्रण करण्यास धजेना. चाळीस पानी कादंबऱ्या, वीस पानीं नाटुकलीं व दीड ओळीचें कवित्व वाचणाऱ्या नव्या महाराष्ट्राच्या ‘ किंचित् ’-अभिरुचीला नव्वद अध्यायांत ग्रथित झालेली बेचाळीस हजार ओव्यांची प्रचंड रचना झेपणार नाहीं, या कल्पनेनें म्हणा किंवा आर्थिक दृष्ट्या प्रकाशनाचा खटाटोप अंगलट येईल कीं काय, या शंकेनें म्हणा- आजवर या टीकेच्या द्वितीयावृत्तीच्या प्रकाशनाचें दायित्व कुणीं उचललें नाहीं. शेवटीं कृष्णदयार्णवांच्याच वंशांतील एका सत्प्रवृत्त प्रकाशकांना प्रस्तुत ओवीबद्ध टीका पुनर्मुद्रित करण्याची प्रेरणा झाली आणि मोठ्या हिमतीनें व उत्साहानें ते या कार्याला लागले.

## अस्मानी-सुलतानी

सातारा जिल्ह्यांत कृष्णेच्या कांठीं असलेल्या कोपारूढ ऊर्फ कोपर्डें या गांवीं शके १५९६ मध्यें कृष्णदयार्णवांचा जन्म झाला. नरहरि हें त्यांचें मूळ नांव. लहानपणीं आईवडिलांच्या चिरवियोगाचा दुर्धर प्रसंग त्यांच्यावर

ओढवल्यामुळें त्यांची मोठी अनुकंपनीय दशा झाली. त्यांतच देशावर कोसळलेल्या अस्मानी-सुलतानीमुळें तर त्यांच्या दुःखास पारावारच राहिला नाहीं. छत्रपति शिवरायांच्या मृत्यूनंतर मुसलमानी सत्तेवरला वचक नाहींसा होऊन तिनें देशभर उच्छाद मांडला. अनेक कुटुंबांची वाताहत झाली. स्वतः कृष्णदयार्णवांवरहि आपल्या कुटुंबीयांसह देशोधडीला लागण्याची पाळी आली. ते आपल्या पत्नीला व कुटुंबांतील इतर मंडळींना घेऊन मोमिनाबाद ऊर्फ जोगाईच्या आंब्यास येऊन स्थायिक झाले. खुद्द कृष्ण-दयार्णवांनीं स्वतःच्या या दैवदुर्विलासाचें वर्णन करतांना एके ठिकाणीं म्हटलें आहे :

**शिव भूपति पावतां मुक्ति । दक्षिणे येवोनी ताम्रपति ।**
**केली विजयपुरा समाप्ति । महाविपत्ति राष्ट्रातें ॥**
**मग सोडुनी कृष्णातीर । भ्रमतां कालचक्रानुसार ।**
**आश्रयूनी ठेलों अंबापूर । सपरिवार साग्रज ॥**

जोगाईच्या आंब्यास आल्यानंतर दयार्णवांना श्रीगोविंदस्वामी नांवाच्या सत्पुरुषाच्या सहवासाचा लाभ घडला व या सिद्धपुरुषाकडूनच त्यांना श्रीकृष्णजन्माष्टमीच्या सुमुहूर्तावर श्रीकृष्णोपासनेचा दीक्षामंत्र मिळाला. आंबेजोगाईतील निवासांत ते " जय जय श्रीकृष्णदयार्णव समर्थ ! " असा नामघोष करून भिक्षा मागत, म्हणून लोक त्यांना श्रीकृष्णदयार्णव या नव्या नांवानें ओळखूं लागले.

गांवांत कोरान्नभिक्षा मागावी व उरलेला वेळ ज्ञानेश्वरी, भावार्थ-रामायण, गीतादि ग्रंथांच्या पठणांत नि भजनांत घालवावा, अशा प्रकारचा त्यांचा जीवनक्रम सुरू झाला. गुरूंच्या सहवासांत कृष्णदयार्णवांचा बराच व्यासंग झाला असल्याचें दिसून येतें. गीता, पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा, सांख्य तत्त्वज्ञान, व्याकरणशास्त्र, स्मृति, पुराणें या ग्रंथांबरोबरच संगीत-रत्नाकर, चरक-सुश्रुत, ज्योतिष इत्यादींसारखे ग्रंथहि त्यांनीं अभ्यासले असावेत, असें त्यांच्या टीकेंतील संदर्भांवरून सहज ध्यानांत येतें.

याप्रमाणें अध्ययनांत कांहीं काळ लोटल्यानंतर कृष्णदयार्णवांनीं आपल्या गुरूबरोबर काशी, उत्तरमानस, दक्षिणमानस, गया इत्यादि तीर्थक्षेत्रांची

यात्रा केली. यात्रेहून ते आंव्यास परत आले तेव्हां म्लेंच्छांनीं त्या गांवाचा पुरा विध्वंस केल्याचें हृदयद्रावक दृश्य त्यांना दिसलें. त्यांतच त्यांच्या शरीरावर कुष्ठरोगाचीं लक्षणें उमटूं लागल्याचें त्यांच्या लक्षांत आलें. अशा विपन्नावस्थेंत ढळूं पहाणारा मनाचा तोल सावरण्यासाठीं त्यांनीं भागवताच्या दशमस्कंधावर टीका रचण्यास प्रारंभ केला. "ग्रंथलेखनाच्या मिषानें होणारें भगवद्‌गुणगायन तुझी व्याधि दूर करील !" असा नाथांनीं त्यांना स्वप्नांत दृष्टान्त दिला होता.

## व्याधींतून मुक्तता

वयाच्या चौपन्नाव्या वर्षीं कृष्णदयार्णवांनीं ग्रंथलेखनास प्रारंभ करून साठाव्या वर्षीं त्याचा पूर्वार्ध समाप्त केला. पूर्वार्धाच्या समाप्तीबरोबरच आपली देहव्यथाहि संपल्याचा त्यांनीं उल्लेख केला आहे.

दशमस्कंधाचा उत्तरार्ध लिहितांना मात्र त्यांच्या ठिकाणीं पूर्वीसारखा ग्रंथलेखनाचा उत्साह शिल्लक राहिला नव्हता. महारोगासारख्या भयंकर व्याधींतून त्यांची संपूर्णतया सुटका झाली असली तरी शरीराला दिवसेंदिवस क्षीणता येत चालली होती. त्यांचे गुरु गोविंद व इतर समवयस्क मंडळी यांच्या देहावसानामुळें त्यांच्या वृत्तीवर औदासीन्याची दाट छाया पसरूं लागली होती. आपलाहि अंतकाळ समीप येऊन ठेपल्याचें त्यांना जाणवूं लागलें. अशाहि परिस्थितींत त्यांनीं ग्रंथांचा उत्तरार्ध लिहावयाला प्रारंभ करून ३७ अध्याय, म्हणजे एकंदर ग्रंथाचे ८६ अध्याय संपवून ८७ व्या अध्यायाचे २३ श्लोक लिहिले व इहलोकींची यात्रा संपविली. त्यांच्या पश्चात् त्यांचे पट्टशिष्य व 'हरिवरदे'चे 'लेखक' श्रीउत्तमश्लोक यांनीं उरलेले तीन अध्याय लिहून टीकालेखनाचें कार्य तडीस नेलें.

कृष्णदयार्णवांच्या 'हरिवरदा' टीकेशिवाय 'तन्मयानंदबोध,' 'सारांशात्मक गीता' अभंग, स्फुट पद्यें इत्यादि रचना उपलब्ध आहेत. पण या सर्वांत काव्य या नात्यानें त्यांची 'हरिवरदा' टीकाच रसिकांच्या निरंतर ध्यानांत राहील यांत संशय नाहीं.

**कालचक्रें आचारहीन। जठरचिंतनें अभ्यासविहीन।**
**एवं जडमूढ अज्ञान।......**

असे दयार्णवांनीं स्वतःसंबंधीं उद्गार काढले असले तरी ते त्यांच्या शालीनतेचे द्योतक म्हणूनच ध्यानांत घेणें आवश्यक आहे. कृष्णदयार्णवांनीं श्रीधरी टीकेच्या आधारानें दशमस्कंधाचा अनुवाद केला असला तरी त्यांच्या लेखनशैलीवर व विचारांवर ज्ञानेश्वरांच्या व एकनाथांच्या शैलीचा प्रभाव पडल्याचें जागजागीं अनुभवाला येतें.

महाराष्ट्रसारस्वतकार भावे 'हरिवरदा' टीकेंतील काव्यगुणासंबंधीं विवेचन करतांना म्हणतात, "ग्रंथकाराची विद्वत्ता व त्याचा बहुश्रुतपणा हीं या ग्रंथावरून स्पष्ट दिसतात. त्यानें यांत जरी एका श्रीधरी टीकेचाच उल्लेख केला तरी त्यांत अनेक टीकांचें सार आणून व बाहेरचेंहि अधिक विषय घेऊन हा ग्रंथपरिपाक फार स्वादिष्ट बनविला आहे. विद्वत्तेच्या दृष्टीनें तर या ग्रंथास फार मान आहेच, पण काव्य या दृष्टीनेंहि ग्रंथ सरस आहे..."

कृष्णदयार्णवांच्या काव्यात्मतेचीं हवीं तेवढीं उदाहरणें उद्धृत करतां येण्यासारखीं आहेत.

**जैसा सजळाभ्र लंघून। अमृतकिरण प्रकाशे॥**

ही कालियाच्या विळख्यांतून सुटलेल्या कृष्णाला दिलेली उपमा किंवा सज्जन मनुष्य लघुत्व स्वीकारून मोटा होतो ही कल्पना विशद करण्यासाठीं—

**पिंजून मोकळा केला तूळ। तो भासे हलुं परंतु विशाळ।**
**तैसाचि पुरुष क्षमादि सुशीळ। लघुत्वें केवळ गुरुतर॥**

पिंजलेल्या कापसाची योजलेली उपमा कवीच्या कल्पकतेचा प्रत्यय आणून देण्यास पुरेशी नाहीं काय?

विशिष्ट प्रसंगांचीं अथवा निसर्गशोभेचीं वर्णनें करण्यांतहि कृष्ण-दयार्णवांची प्रतिभा किती कुशल होती हें पुढील दोन उदाहरणांवरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

**हृदयशल्यें विरोनी गेलीं । ब्रह्मानंदें मनें निवालीं ।**
**सुहृद्भावें प्रेमाथिलीं । भूतें भूतळीं परस्परें ॥**
**नगरोनगरीं घरोघरीं । प्रतिशरीरीं सर्वांतरीं ।**
**ब्रह्मानंदाचिये गजरीं । गोष्टी दुसरी हारपली ॥**

हें कृष्णजन्माच्या वेळचें वर्णन किंवा—

**विद्युल्लता कडकडाटी । महामेघांचिया दाटी ।**
**चंडवायो झडझडाटी । करी दिग्पटीं सकंप ॥**

वगैरेसारखीं निसर्गवर्णनें वरील विधानाची सहज साक्ष पटवितील.

## मोठा शिष्यपरिवार

प्रसाद हा काव्याचा सर्वश्रेष्ठ गुणहि कृष्णदयार्णवांच्या काव्यांत सर्वत्र प्रतीतीस येतो. महाराष्ट्रसारस्वतकारांनीं आपल्या विवेचनांत दयार्णवांचा एक अभंग उद्धृत केला आहे. तो प्रसादगुणाचा उत्कृष्ट नमुना आहे.

गुरुनिधनानंतर चित्ताला प्राप्त झालेल्या विकलावस्थेचें वर्णन करतांना ते म्हणतात—

**चाड नसे मज आणिक कोणाची । एका गोविंदाची आस आहे ॥**
**तयावीण जिणें शून्य वाटे लोकीं । कोण माझे पोखी मनोरथ ॥**
**कोण जाणे माझे जीवींचा कळवळा । कोण वेळवेळां आळवील ॥**
**दाही दिशा शून्य तुजवीण झाल्या । चित्त कांहीं केल्या स्थिर नोहे ॥**
**दयार्णवा तुझ्या छायेशीं वाढलों । आजि वाटे झालों परदेशी ॥**

या अंभगांतील आर्तता नि प्रसादगुण तुकोबांच्या अभंगांतील भावनोत्कटतेची, सहजसुंदर शैलीची आठवण करून देत नाहीं काय ?

कृष्णदयार्णवांची गुरुपरंपरा मोठी आहे तसा त्यांचा शिष्यपरिवारहि बराच विस्तीर्ण आहे. जनार्दन, एकनाथ, चिदानंद, स्वानंद, गोविंद ही

त्यांची गुरुपरंपरा असून श्रीउत्तमश्लोक, सनातन, कौस्तुभ, श्रीवास इत्यादि सोळा सत्पुरुषांनीं त्यांचें शिष्यत्व पत्करलें होतें. या सोळाहि शिष्यांनीं हिंदुस्थानांत वेगवेगळ्या ठिकाणीं आपापले मठ स्थापून धर्मप्रसाराचें व लोकजागृतीचें महत्कार्य केलें आहे.

प्रपंचांतल्या त्रिविध तापांनीं होरपळून जात असतांहि मनाची संतुलितावस्था कायम ठेवून 'हरिवरदे'सारखी प्रचंड ग्रंथनिष्पत्ति करणाऱ्या कृष्णदयार्णवांचें जीवनकार्य उद्यांच्या पिढीला उद्बोधक नि प्रेरणादायक ठरेल, असा मला विश्वास वाटतो.

* * *

# ११

# प्राकृत सप्तशतीकार श्री उत्तमश्लोक

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

मराठवाड्यांतील गोदावरीचा परिसर संतभूमि म्हणून जसा विख्यात आहे, मुकुंदराजांपासून तों एकनाथ, समर्थ रामदास यांच्यापर्यंत अनेक साधुपुरुषांना जन्म देऊन तो प्रदेश जसा धन्य झाला आहे, तसा विदर्भांतील पैनगंगेचा आसमंतहि श्रीआईनाथमहाराज, साधुमहाराज, चिन्मयानंद, गोरखस्वामी, नित्यानंद इत्यादि संतांच्या पादस्पर्शानें नि वास्तव्यानें पुनीत झाला आहे. सप्तशतीवर प्राकृताचें लेणें चढविणारे कवि श्रीउत्तमश्लोक हेहि याच सत्पुरुषांच्या मालिकेंत शोभणारे एक संत होऊन गेले, ही गोष्ट परवां-परवांपर्यंत फारशी कोणास ठाऊक नव्हती. औदुंबर क्षेत्र उर्फ उमरखेड या गांवीं उत्तमश्लोकांच्या मठांत त्यांनीं लिहिलेली सप्तशतीवरील प्राकृत टिका सुमारें दोन शतकें अज्ञातवासांत पडली होती. अडीच-तीन तपांपूर्वीं उमरखेड येथील कांहीं चिकित्सक विद्वानांच्या दृष्टोत्पत्तीस उत्तमश्लोकांची ही रचना आली आणि त्यांतील विचारसौंदर्य नि काव्यसौंदर्य यांवर लुब्ध होऊन त्या रसिक विद्वानांनीं तिला प्रसिद्धि देण्याचा निश्चय केला.

## तीन भव्य दालनें

उत्तमश्लोकांची ही कृति प्रकाशांत येण्यापूर्वीं त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाविषयीं कोणास फारशी कल्पना नसावी यांत कांहीं नवल नाहीं. ते एक दत्त संप्रदायांतलि व श्रीएकनाथांच्या परंपरेंतील थोर सत्पुरुष आहेत, भागवताच्या दशमस्कंधावर 'हरिवरदा' टीका लिहिणारे सुप्रसिद्ध संतकवि श्रीकृष्णदयार्णव यांचे ते सच्छिष्य आहेत, एवढीच त्यांच्याबद्दल लोकांना माहिती होती. पण प्राकृत सप्तशतीच्या प्रकाशनानंतर मात्र त्यांच्या ग्रंथ-कर्तृत्वाची व प्रतिभासौंदर्याची सर्वांना ओळख पटली. पांडित्य, रसिकता आणि साधुत्व या तीन गुणविशेषांचा उत्कटतेनें प्रत्यय आणून देणाऱ्या उत्तमश्लोकांच्या व्यक्तिमत्त्वाचा, त्यांच्या जीवनकार्याचा नि वाङ्मयाचा

आधुनिक पिढींतील साहित्योपासकांनीं परिचय करून घेणें अत्यंत अगत्याचें आहे. किंबहुना त्यांच्या वाङ्मयाच्या परिशीलनावांचून मराठी संतवाङ्मयाचा व्यासंग पूर्ण होऊं नये, अशा असाधारण काव्यगुणानीं तें मंडित झालें आहे.

उत्तमश्लोकविरचित प्राकृत सप्तशती, प्रबोधसार व दशमस्कंधाचे शेवटचे साडेतीन अध्याय म्हणजे महाराष्ट्रसारस्वताच्या मंदिराचीं तीन भव्य, सुंदर दालनें आहेत यांत शंका नाहीं.

उत्तमश्लोकांचा जन्म मराठवाड्यांतील बीड या गांवीं झाला असला ( इ. स. १७०९ ) तरी नंतर ते विदर्भांतील उमरखेड येथें येऊन स्थायिक झाले, असा उल्लेख सांपडतो. त्यांचे वडील बीड येथें व्यापारावर उदर-निर्वाह करीत असत. लौकिक दृष्ट्या ते दुकान थाटून बसले असले तरी त्यांच्या चित्तांत मात्र सदैव अध्यात्माविषयींचेच विचार असत. साहजिकच उत्तमश्लोकांनाहि अगदीं लहानपणापासून अध्यात्मासंबंधीं जिज्ञासा वाटूं लागली. अध्यात्माच्या आश्रयानेंच आपणांस लोकोद्धाराचें व आत्मोद्धाराचें ध्येय सिद्धीस नेतां येणार आहे, अशी त्यांची मनोमन खात्री झाली.

आणि त्यांची ही आकांक्षा सुफलित होण्याचा योग लौकरच जुळून आला. कृष्णदयार्णवांची व त्यांची बीड येथें दृष्टादृष्ट झाली व त्याच क्षणीं उत्तमश्लोकांना त्या सत्पुरुषाच्या सहवासाचा लाभ घडावा, असें वाटूं लागलें. कृष्णदयार्णवांच्या अनुग्रहासाठीं, त्यांचें शिष्यत्व पत्करून परमार्थाची वाट चोखाळण्यासाठीं त्यांचें मन आसुसलें व त्यांनीं कृष्णदयार्णवांजवळ आपली मनीषा बोलून दाखविली. तेव्हां त्या संतश्रेष्ठानें उत्तमश्लोकांना आपणांबरोबर पैठणला चलण्यास सांगून तिथें त्यांना मंत्रोक्त उपदेश केला व त्यांच्याच आज्ञेवरून ते पैठण नगरांत भिक्षेवर उदरनिर्वाह करूं लागले.

या वेळीं कृष्णदयार्णव श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधावर ‘हरिवरदा’ नांवाची ओवीबद्ध टीका लिहीत होते. ‘दयार्णवदशम’ या नांवानेंहि ही टीका सुप्रसिद्ध आहे. त्यांचा आतां वृद्धापकाळ झाला होता. मृत्यूच्या छाया आसपास रेंगाळत असल्याचें त्यांना स्पष्ट दिसूं लागलें. श्रीमद्‌भागवताच्या अनुषंगानें आरंभिलेल्या वाग्यज्ञाची सांगता होण्यापूर्वींच मृत्यूचे पाश आपल्या मानेभोंवतीं पडणार, ही जाणीव त्यांच्या अंत.करणाला विद्ध करूं लागली.

दशमस्कंधाच्या शेवटच्या साडेतीन अध्यायांवरच टीका लिहावयाची राहिली होती. निदान कुणीं दुसऱ्यानें तरी आपलें अर्ध्यावर राहणार असलेलें ग्रंथलेखन पुरें करावें व प्राकृत जनाला दशमस्कंधांतील विविध सौंदर्याचें दर्शन घडवावें, अशी उत्कट तळमळ त्यांना वाटूं लागली.

## गुरूची अपेक्षापूर्ति

अर्थात् उत्तमश्लोकासारख्या सच्छिष्याखेरीज ही अवघड कामगिरी दुसरा कोण करणार ? आपली कांक्षा उत्तमश्लोकच पूर्ण करूं शकेल, असा आत्मविश्वास कृष्णदयार्णवांना वाटून दशमस्कंधाच्या शेवटच्या साडेतीन अध्यायांवर टीका लिहिण्याची कामगिरी त्यांनीं आपल्या शिष्योत्तमावर सोपवून जगाचा निरोप घेतला.

उत्तमश्लोकांचें भाषाप्रभुत्व, रसिकता, प्रगल्भ निरूपणशैली आणि उपमादृष्टान्तादि अलंकारयोजनेंतलें चातुर्य पाहून कृष्णदयार्णवांच्या आत्म्याला अपेक्षापूर्तीचें समाधान लाभलें असेल. गुरुकार्याच्या या पूर्तीनंतर उत्तमश्लोकांनीं सप्तशतीवर प्राकृत भाषेंत टीका रचण्यास प्रारंभ केला.

ही टीका लिहिण्यापूर्वीं थोडे दिवस आधीं श्रीआईनाथमहाराज या सिद्ध पुरुषाच्या सहवासाचा त्यांना उमरखेड येथें लाभ घडला व त्याच क्षेत्रीं वास्तव्य करून त्यांनीं सप्तशतीवरील टीका पूर्ण केली.

‘प्रबोधसार’ हा तिसरा ग्रंथहि उत्तमश्लोकांच्या परिणतप्रज्ञेची साक्ष पटवील असाच उतरला आहे असें म्हणतात. पण तो अद्याप अप्रकाशित असल्यामुळें व गेलीं कित्येक वर्षें त्याची मूळ प्रतहि कुठें तरी धूळ खात पडली असल्यामुळें त्यासंबंधींचे ऐकीव गौरोद्गारच प्रमाण मानण्यापलीकडे दुसरें कांहींहि करतां येणें शक्य नाहीं. आजवर दयार्णवांच्या नांवावर नोंदविला गेलेला ‘दत्तजननोत्साह’ हा लघुग्रंथहि उत्तमश्लोकांचाच आहे, असें अलीकडेच सिद्ध झालें आहे.

तथापि उत्तमश्लोकांच्या प्रतिभेंतून स्फुरलेलें सप्तशतीवरील भाष्य व दशमस्कंधावरील शेवटचे चार अध्याय त्यांच्या अलौकिक वाक्पाटवाची व काव्यात्मवृत्तीची ग्वाही देण्यास समर्थ आहेत. गायनकलेंत निपुण असलेल्या

गायकानें भिन्न भिन्न प्रकृतींच्या रागरागिणी आळवून श्रोत्यांना संगीत-कलेच्या विविध अंगांचा प्रत्यय आणून द्यावा, कधीं विलंबपदांतल्या गंभीर प्रकृतीची रागदारी, तर कधीं द्रुतांतल्या चंचल प्रकृतीच्या चिजा गाऊन गानलुब्धांना स्तिमित करून सोडावें, त्याप्रमाणें उपरोक्त दोन्ही ग्रंथांतून उत्तमश्लोकांनीं आपल्या विदग्ध प्रतिभेचे विविध विलास दाखवून रसिकांना मंत्रमुग्ध केलें आहे.

## कालसुसंगत काव्य :

भगवान् श्रीकृष्णाच्या नैकविध लीलांना नि अनेक गुणांना आश्रयीभूत असलेलें त्यांचें विशाल विभूतिमत्त्व यांचें दर्शन घडविणाऱ्या श्रीमद्भागवता-सारख्या महाकाव्यावरील टीका शृंगार, वीर, करुणादि रसांनीं ओतप्रोत भरलेली असावी, यांत कोणतेंच नवल नाहीं. तसेंच शुंभनिशुंभादि दैत्यांचा संहार करणाऱ्या आदिमायेच्या पराक्रमाच्या वर्णनांनीं भरलेलें सप्तशती-सारख्या ग्रंथावरील काव्य रौद्र, अद्‌भुत, भयानक इत्यादि स्थायी भावांना आवाहन करणारें असावें, यांतहि आश्चर्य नाहीं. उत्तमश्लोकांची रसवत्ता वरील दोन्ही भिन्न प्रकृतींच्या काव्यग्रंथांतून प्रकर्षानें प्रकट झाली आहे. भागवत सांप्रदायिकांना दशमस्कंधावरील उत्तमश्लोकांची अंशटीका जितकी आवडेल तितकीच शाक्तपंथाच्या उपासकांना त्यांची प्राकृत सप्तशतीहि विलोभनीय वाटेल.

महाराष्ट्रीय संतकवि काय किंवा अन्य प्रांतांतील संतकवि काय, त्यांच्या काव्याच्या अंगभूत सौंदर्याकडे रसिकांचीं व अध्यात्मप्रवण मुमुक्षूंचीं अंतः-करणें वेधलीं जातात तशीं आणखी एका गोष्टीमुळें तीं त्यांकडे आकृष्ट होतात. ती गोष्ट म्हटली म्हणजे या संतपरंपरेंतील कवींनीं काव्यनिर्मिति करतांना त्यांच्या अंतर्बाह्य सौष्ठवाबरोबरच तें कालमानाशीं सुसंवादी राखण्याकडे पुरविलेलें लक्ष; आत्मोद्धाराबरोबरच जगाचेंहि इहपर कल्याण साधावें या हेतूनें काव्यें रचणाऱ्या साधुसंतांनीं त्या त्या काळाला पोषक ठरेल अशाच धोरणानें विषयांची निवड केली व मोठी समयज्ञता दाखविली. एकनाथांनीं तत्कालीन परिस्थितीच्या अनुसंधानानेंच रामायणांतील प्रसंगांची निवड

करून प्रतिभेच्या उन्मेषाबरोबरच औचित्याचीहि लोकांना प्रतीति आणून दिली. महाभारताचा अनुवाद करतांना मुक्तेश्वरांनींहि तत्कालीन परिस्थितीचें आपल्या साहित्य-कृतींत प्रतिबिंब पहावयास मिळेल अशा चातुर्यानें काव्य-रचना केली. तुलसीदासांनाहि या गोष्टीचा विसर पडला नव्हता. सारांश, बहुतेक सर्व संतकवींनीं सभोंवतालच्या समाजजीवनावर प्रकाश पडेल, त्यांत उत्साह संचरेल, अशा धोरणानें साहित्यनिर्मितीला हात घातल्याचें दिसून येतें. उत्तमश्लोकहि याला अपवाद नव्हते.

ज्या सामाजिक नि राजकीय परिस्थितींत त्यांनीं सप्तशतीची रचना केली तिचा थोडा बारकाईनें विचार केला म्हणजे वीररसाचा परिपोष करणाऱ्या काव्यरचनेला प्रवृत्त होण्यांत उत्तमश्लोकांनीं केवढी समयज्ञता दाखविली याचें प्रत्यंतर येतें.

## स्वकीयांना प्रेरणा :

उत्तमश्लोकांचा कालखंड म्हणजे मराठेशाहीच्या अपकर्षाचा कालखंड. मुसलमानी आक्रमणांनीं विकलांग बनलेल्या हिंदुराष्ट्रांत शिवरायांनीं नव-चैतन्य ओतून त्याचें पुनरुज्जीवन केलें होतें. पण दुर्दैवानें त्यांच्या मृत्यूनंतर लौकरच त्या सामर्थ्याला ओहटी लागली व सारा देश दुर्बळ बनला. स्वत्वाची जाणीव शिल्लक राहिली नाहीं. शिवबांच्या प्रभावापुढें नमलेले मोंगल, इंग्रज व पोर्तुगीज पुन्हा हळूहळू वर डोकें काढूं पहात होते. अशा स्थितींत असुरांचें मर्दन करून जीवमात्राला संकटमुक्त करणाऱ्या जगदंबेच्या पराक्रमाचें नि विजयाचें गुणगानच समाजाची अस्मिता व विजिगीषा जागृत करील, असा उत्तमश्लोकांना भरंवसा वाटला असल्यास नवल नाहीं.

**ते शत्रु उद्भवले अनिवार । राज्याभिलाषें महाक्रूर ।**
**प्रवर्तले करावया समर । जिगीषापर सुरथेसी ॥**

अशासारखीं वर्णनें करतांना उत्तमश्लोकांना तत्कालीन यवन-इंग्रजा-दिकांच्या पाशवी सामर्थ्याचा निर्देश अभिप्रेत नव्हता असें म्हणतां येईल का?

कालानुसंधान राखणाऱ्या उत्तमश्लोकांच्या व्यावहारिक दृष्टीविषयीं लिहितांना प्राकृत सप्तशतीच्या प्रस्तावनेंत लोकनायक माधव श्रीहरि उर्फ

बापूजी अणे म्हणतात, "...राज्याभिलाष धरून क्रूर कृत्यें करण्याचा यवनांचा स्वभाव त्यांच्या वेळीं मोठा जोरांत असला पाहिजे हें स्पष्ट दिसतें. नाहीं तर उत्तमश्लोकांसारखे केवळ आत्मनिष्ठ ग्रंथकार एका पदाचा विवक्षित जातिवाचक अर्थ करण्याच्या यातायातींत खात्रीनें पडले नसते ! किंबहुना यवनांच्या हातून सुरथ राज्यभ्रष्ट झाला तो पुन्हा देवीची आराधना करून पूर्ववैभवसंपन्न झाला, ही कथा त्यांतील आध्यात्मिक रहस्यासह मांडण्यांत उत्तमश्लोकांचा काय आशय असावा, हाहि एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे....याच संबंधांत चौथ्या अध्यायांतील ३० व्या श्लोकांतील 'नाशाय चाशुभभयस्य मतिं करोतु' या चरणावरील टीकाहि विचार करण्यासारखी आहे. इतकेंच नव्हे तर कवीच्या अंतःकरणांत तत्कालीन स्थितीसंबंधानें वसत असलेल्या विचारलहरींचें ही ओवी द्योतक आहे असें वाटतें.

**संपूर्ण जगत्पालन कारणें । आणि अशुभें जें अकल्याणें ।**
**अथवा अशुभरूपी असुरराणें । दुःखदानें अपकारी ॥**
**तज्जनित भय नाशावया । मति करो देवी आर्या ।**
**सनातन सद्धर्म कार्या । वाढावया हो अनुकूल ॥**

हा अभिप्राय मनांत धरून उत्तमश्लोकांनीं टीकेकरितां सप्तशती हा देवी-विजयग्रंथ मुद्दाम घेतला असावा, असाहि एक तर्क संभवतो.

**देवीविजय सूर्योदयें । शर्वर हरलें असुरभयें ॥**
**सुरर्षींची हृत्कुशेशयें । आनंदमयें विकासलीं ॥**

हा अनुभव या ग्रंथांत उत्तमश्लोकांनीं वारंवार सांगितला असून शक्तीची उपासना करण्याचा स्वकीयांस ते आग्रह करीत आहेत असें दिसतें..."

प्रस्तुत प्रस्तावनेंत लोकनायक अण्यांनीं सप्तशतीच्या वैचारिक सामर्थ्या-बरोबरच तिच्या छंद, रीति वगैरे बाह्यांगांचाहि मोठ्या मार्मिकपणें ऊहापोह केला आहे. जिज्ञासूंनीं ती सबंध प्रस्तावनाच मुळांतून वाचून काढावी, अशी माझी आग्रहाची सूचना आहे. अशी आहे लौकिकदृष्ट्या सप्तशतीची थोरवी नि फलश्रुति. आध्यात्मिक दृष्ट्या मंत्रस्वरूप असलेल्या या ग्रंथाची योग्यता मोठी आहे.

* * *

[ १२ ]

## मानवता धर्माची शिकवण देणारे थोर भगवद्भक्त
# म हा त्मा क बी र

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

विश्वसाहित्याला भूषणभूत ठरणारें अक्षरवाङ्मय लिहूनहि ज्यांच्या जन्मकालासंबंधीं किंवा जन्मस्थळासंबंधीं निश्चित पुरावा उपलब्ध नाहीं अशा कवींपैकीं कबीरदास हे एक होत. यांच्या जन्मासंबंधीं अनेक प्रकारच्या किंवदन्ती ऐकावयास मिळतात.

असें सांगतात कीं, काशींत रामानंदांचा एक ब्राह्मण भक्त वास्तव्य करीत होता. त्याच्या कन्येला वैधव्यदशेंत पुत्रप्राप्ति झाल्यामुळें तिनें आपली अब्रू वांचविण्यासाठीं त्या अर्भकाला जन्मकाळींच लहरतारा नांवाच्या तलावावर टाकून दिलें. कर्मधर्मसंयोगानें त्या तलावाजवळून जात असलेल्या नीरू कोष्टयाची व त्याच्या पत्नीची त्या सुकुमार बालकाकडे दृष्टि जाऊन उभयतांच्या मनांत त्याच्याविषयीं दया उत्पन्न झाली. त्यांनीं त्यास आपल्या घरीं आणलें आणि अपत्यनिर्विशेष प्रेमानें त्याचा प्रतिपाळ केला.

कबीरांचें बाळपण मुसलमानी कुटुंबांत व्यतीत झालें असलें तरी हिंदुत्वाच्या जन्मजात संस्कारामुळें अगदीं लहानपणापासून भजनपुराणादि श्रवणाकडे त्यांची प्रवृत्ति झुकूं लागली. कपाळाला गंधटिळा लावून रामनामाचा जप करीत गंगेच्या घाटावर ते घटका घटका बसूं लागले.

## रामानंदांचें शिष्यत्व

थोडेंबहुत कळूं लागल्यानंतर रामानंदांचें शिष्यत्व पत्करण्याचा विचार त्यांच्या मनांत डोकावूं लागला. पण वर्णाश्रमधर्माचा कट्टर अभिमान बाळगणारे रामानंद आपणांसारख्या मुसलमान समजल्या जाणाऱ्या मनुष्याला शिष्यत्वाची दीक्षा देतील, ही कल्पनाच त्यांना शक्य कोटींतली वाटेना. म्हणून त्यांनीं एक युक्ति अवलंबिली. रामानंद भल्या पहांटेच मणिकर्णिका घाटावर स्नानासाठीं जात असतात हें त्यांना ठाऊक होतें. एके दिवशीं झांपड

पडण्यापूर्वींच ते रामानंदाच्या वाटेवर गुपचुपपणें जाऊन पडले. अंधारांत रामानंदांच्या पायाची ठोकर लागतांच ते कासावीस झाले. पण लगेच " ऊठ बेठा ! रामनाम कह ! " हा त्या सत्पुरुषाच्या तोंडून बाहेर पडलेला कळवळ्याचा उद्गार ऐकतांच त्यांना आपल्या वेदनांचा विसर पडला व ' रामनाम ' हाच आपणांला गुरुमंत्र समजून ते समाधानानें घरीं परतले.

कापड विणण्याचा व्यवसाय सांभाळून कबीरदास त्या दिवसापासून आपला उर्वरित वेळ साधुसंतांच्या समागमांत घालवूं लागले. हिंदूंप्रमाणेंच मुसलमानहि त्यांना आपल्या गुरुस्थानीं मानून त्यांच्याकडून उपदेश घेऊं लागले. शेख तकी नांवाच्या एका मुसलमान सूफी फकीराकडून कबीरांना शिष्यत्वाची दीक्षा मिळाली होती, असें एक विधान केलें जात असतें. पण याला ऐतिहासिक आधार मिळत नाहीं. उलट,

**कह कबीर दुविधा मिटी, गुरु मिलीया रामानन्द**
**काशीमें हम प्रकट भय हैं, रामानन्द चिताये ॥**

या प्रत्यक्ष कबीरांच्या वचनांवरून त्यांनीं रामानंदांकडूनच उपदेश ग्रहण केला होता हें सिद्ध होतें.

कबीरांनीं तीर्थयात्रेच्या निमित्तानें भारतभर प्रवास करून समाजस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण केलें. अनेक वेळां मुसलमान फकिरांच्या सहवासांतहि त्यांना भटकावें लागलें. याच वेळीं शेख तकी या सूफी फकिराच्या सहवासाचा लाभ त्यांना घडल्यामुळें त्यांच्या विचारांवर सूफी तत्त्वज्ञानाची छाया पडलेली दिसून येते.

कबीरांच्या जन्मकालासंबंधीं निश्चित पुरावा अद्याप मिळालेला नाहीं. तसेंच त्यांच्या निर्याणकालाविषयींहि विद्वानांत एकमत नाहीं. संवत् १५४९ मध्यें मगहर येथें त्यांचें देहावसान झालें असावें असें कांहीं इतिहासकार मानतात. पण अलीकडे उपलब्ध झालेल्या कांहीं ऐतिहासिक पुराव्यांवरून संवत् १५७५ मध्यें कबीरांनीं इहलोकची यात्रा संपविली हें मत स्वीकारावें लागतें. कबीरांच्या चरित्रांतील कांहीं घटना विचारांत घेतल्यास त्यांच्या मृत्युकालासंबंधींचें हें दुसरें मतच अधिक सुसंगत नि विश्वसनीय मानायला हवें.

## कबीरांची शब्दसृष्टि

कबीरांच्या शब्दसृष्टीसंबंधीं विचार करतांना प्रथम कोणत्या गोष्टीचें आश्चर्य वाटत असेल तर तें जन्मभर निरक्षर राहूनहि केवळ अंतःस्फूर्तीच्या नि बहुश्रुतपणाच्या बळावर त्यांनीं समाजाच्या हृदयावर उमटविलेला स्वतःच्या व्यक्तित्वाचा ठसा पाहून.

**मसि कागद छुओ नहीं, कलम गही नहीं हाथ।**

अशी स्वतः कबीर आपल्या निरक्षरतेविषयींची स्पष्ट कबुली देतात. असें असतांहि जनमनावर आपल्या विचारप्रणालीची छाप पाडून त्याला इष्ट वळण लावण्याइतकें सामर्थ्य त्यांच्या वाणीला प्राप्त व्हावें, ही नवलाचीच गोष्ट नव्हे काय ?

पण त्यांत नवल तरी कां वाटावें ? जनतेच्या अंतःकरणाची पकड घेणाऱ्या शब्दांत व्याकरण नि अलंकारशास्त्रापेक्षां प्रतीति अन् जिव्हाळा यांचाच आढळ होत नाहीं काय ? सुसंस्कृत पंडित कवींच्या विदग्ध रचनेपेक्षां संतांच्या मुखावाटें प्रकट होणारी साधीभोळी पण अनुभवांत मुरलेली साक्षात्कारी वाणीच जनमनाला आवाहन करीत नाहीं काय ?

कबीरांना अक्षरओळख नसली तरी अक्षरांत निहित असलेले महान् आशय त्यांच्या प्रतिभेला स्पष्ट दिसत असत. त्यांना वाचतां येत नसलें तरी मानवी जीविताच्या प्रचंड ग्रंथावर भाष्य करण्याइतकी परिणत प्रज्ञा त्यांना लाभली होती. अक्षरवाङ्मयाला ज्या ज्या गुणांची जोड असणें आवश्यक आहे ते सारे गुण कबीरांच्या ठिकाणीं वास करीत होते.

कबीरग्रंथावलि, आदिग्रंथ, बीजक, रमैनी, साखी, सबद इत्यादि रचना कबीरांच्या म्हणून ओळखल्या जातात. कबीर साक्षर नसल्यामुळें त्यांचें सारें वाङ्मय त्यांच्या समकालीन व नंतरच्या शिष्यांनीं संकलित केलें आहे. पण यामुळें एक आपत्ति ओढवली ती ही कीं, पुष्कळशीं पदें, दोहे, भजनें मूळचीं कबीरांचीं नसूनहि तीं त्यांचीं म्हणून समजलीं जाऊं लागलीं. मूळ रचनेंत अपपाठ, अशुद्ध प्रयोग घुसल्यामुळें अनेक ठिकाणीं रसापकर्ष व सौंदर्यहानि झाली आहे.

यामुळें कबीरांच्या वाङ्मयाचें परीक्षण करतांना परीक्षकाची मोठी पंचाईत होते. कबीरांच्या नांवावर आज उल्लेखिल्या जाणाऱ्या साहित्यांत उलटसुलट विचारांचे प्रवाह दृष्टोत्पत्तीस येतात. त्यांतली कबीरांची विचारधारा कोणती हें चटकन ओळखतां येत नाहीं. त्यांतल्या त्यांत आचार्य हजारीप्रसाद द्विवेदी, डॉ. श्यामसुंदरदास वगैरे कांहीं आधुनिक विद्वानांनीं चिकित्सापूर्वक कबीर-वाङ्मयाचें संशोधन नि संपादन करून त्यांत बराचसा एकसूत्रीपणा आणायचा प्रयत्न केला आहे, यामुळें अभ्यासकांची पुष्कळच सोय झाली आहे. डॉ. श्यामसुंदरदासांनीं संपादिलेल्या कबीरवाङ्मयाच्या आवृत्तींत कांहीं दोष राहून गेले असले तरी, त्यांनीं संपादनाच्या बाबतींत घेतलेले परिश्रम नि त्यामुळें अभ्यासू वाचकांची झालेली सोय या गोष्टी दृष्टीआड करतां येणें शक्य नाहीं.

कबीरांनीं स्वतःच्या विचारांच्या अभिव्यक्तीची भाषा ‘ पूरवी ’ असल्याचा एका साखींत उल्लेख केला आहे.

**बोली हमारी पुरब की, हमें लखनहिं कोय ।**

असें असलें तरी पूरवीबरोबरच अवधी, भोजपुरी, खडी, व्रज, पंजाबी, राजस्थानी, इत्यादि भाषांतून त्यांनीं आपलें हृद्गत प्रकट केलेलें दिसून येतें. ही वस्तुस्थिति लक्षांत घेऊन कांहीं टीकाकारांनीं कबीरांना ‘ बोली हमारी पूरब की ’ या पद्यपंक्तीचा आध्यात्मिक दृष्ट्या अर्थ अभिप्रेत असला पाहिजे, असा तर्क केला आहे. श्री. दशरथ ओझा म्हणतात,

“ ...अतः बोली हमारी पूरब की, इस साखी का अर्थ आध्यात्मिक दृष्टिकोन के अनुसार ही लगाना उचित होगा। जैसे हमारा कथन आध्यात्मिक दशा से संबंध रखता है जिस कारण हमें कोई समझ नहीं पाता। हमारी बातें वही समझेगा जिसे उसका अनुभव भी हो चुका हो।...”

तसेंच कबीरांच्या काव्यांतून जें अनेक भाषांचें मिश्रण झालेलें दृष्टोत्पत्तीस येतें त्याविषयीं श्री. ओझा यांनीं केलेली मीमांसा विचारांत घेण्यासारखी आहे. त्यांच्या विवेचनाचा सारांश असा कीं, भिन्नभिन्न प्रांतांतील अनुयायांनीं कबीरांच्या तोंडून प्रकट झालेली काव्यवाणी अक्षरनिबद्ध करतांना

आपापल्या प्रकृतिधर्मानुसार व भाषावैशिष्ट्यानुसार त्यावर कळत न कळत संस्कार केले आहेत.

## काव्याचा हेतु

कबीरांच्या काव्याचें परीक्षण करतांना एक गोष्ट ध्यानांत घेणें आवश्यक आहे. आत्मोद्धार व सामाजिक कल्याण साधण्याच्या हेतूनेंच प्रामुख्यानें त्यांनीं काव्यरचना केली असल्यामुळें त्यांच्या रचनांना साहित्यशास्त्राचे नियम कांटेकोरपणानें लावणें अन्यायाचें होणार आहे. अंतर्यामांत सांठलेल्या प्रबळ भावनोर्मींना वाट करून देतांना त्यांची वाणी जी कांहीं लय नि ताल धारण करीत असेल तेंच त्यांच्या काव्याचें छंदात्मक स्वरूप म्हटलें पाहिजे. आणि अंतरींच्या जिव्हाळ्यांतून, भावनावेगांतून उत्स्फूर्त झालेलें काव्य हेंच खरें काव्य नव्हे का ? हजारीप्रसाद लिहितात, " कबीर मस्त मौला थे, जो कुछ कहते साफ कहते थे। मौज में आकर जो कुछ कहते वह सनातन कवित्व या शृंगार होता था । वे जो कुछ कहते अनुभव के आधारपर कहते थे । वे पढे-लिखे नहीं थे। कवित्व करना उनका लक्ष्य भी नहीं था, फिर भी उनकी उक्तियों में कविता की ऊंची ऊंची शक्ति प्राप्य है । "

उपमा-उत्प्रेक्षादि अलंकारांचा कबीरांनीं बुद्धिपुरस्सर अभ्यास केला नसला तरी त्यांच्या संयोजनेचें मर्म त्यांनीं हेरलें होतें. आणि मानवी व्यवहाराचें व सृष्टीचें सूक्ष्म निरीक्षण केल्यानंतर उपमा-रूपकादिकांचा कौशल्यपूर्ण उपयोग करून त्यांनीं आपल्या काव्याची परिणामकारकता वाढविली.

**जल में कुंभ कुंभ में जल है बाहर भीतर पानी ।**
**फूटा कुंभ जल जल ही समाना यह तथ कथौ ज्ञानी ॥**

या दोह्यांत कबीरांनीं परमात्मा व त्याचा अंश यांच्यांतील अभेद स्पष्ट करतांना किती बहारीची उपमा दिली आहे ?

**गहना एक कनकते गहना तामें भाव न दुजा ।**

सृष्टीच्या मुळाशीं असलेलें आदितत्त्व व मनुष्यानें आपापल्या आवडीनिवडीप्रमाणें त्याचीं मानलेलीं रूपें यांत वस्तुतः कसा भेद नाहीं हें मर्म विशद करण्यासाठीं त्यांनीं वरील पंक्तींत दिलेली, सोनें व त्यापासून घडविलेले अलंकार यांतील एकरूपतेची उपमा किती अर्थपूर्ण आहे !

## वेदान्ताचें विवेचन

एकनाथांनीं भारुडें रचून त्यांत जशी चमत्कृति उत्पन्न केली तशी कबीरांनींहि वेदान्तांतील व योगांतील कूटांचें विवेचन करतांना चमत्कृति-जनक रचना केली आहे. ‘ कबीर की उलटबांसियाँ ’ या नांवानें हा प्रकार ओळखला जातो. या रचनाप्रकाराबद्दल लिहितांना श्री. ओझा म्हणतात, “ रचना की यह परंपरा पुरानी है। इसके प्रयोग वैदिक साहित्यमें भी मिलते हैं। बौद्ध ग्रंथों में भी इसका प्रयोग पाया जाता है। इस शैली को जैन मुनियों ने भी अपनाया। ”

पुढें या मुद्द्याच्या विवेचनाच्या संदर्भांत त्यांनीं कबीरांच्या प्रस्तुत रचना-प्रकाराचीं कांहीं ठळक उदाहरणें दिलीं आहेत. त्यांपैकीं एकच उदाहरण मी इथें नमुन्यादाखल उद्धृत करूं इच्छितों—

**अंबर बरसै धरती भीजै यहु जोणे सबु कोई।**
**धरती बरसैं अंबर भीजै बुझै बिरला कोई ॥**

“ वळचणीचें पाणी आढ्याला गेलें ” अशा अर्थाचा उद्गार ज्ञानदेवांच्या देहावसानाला अनुलक्षून नामदेवांनीं एका ठिकाणीं काढला आहे. मोठ्या-आधीं लहानांनाच आधीं मृत्यु यावा, ही नियतीची विपरीत लीला या उद्गारांतून सूचित झाली आहे. कबीरांच्या वरील उक्तींतहि याच मासल्याची चमत्कृतिपूर्ण कल्पना आपणांस आढळून येते.

कबीरांच्या विचारसरणीवर वैदिक तत्त्वज्ञानाची व अध्यात्माची छाप पडली असली तरी विशिष्ट संप्रदायाला अगर पंथाला चिकटून राहण्याचा व एकांतिक विचारप्रणालीचा पुरस्कार करण्याचा अविचार त्यांच्या हातून कधीं घडला नाहीं. रामानंदांचें शिष्यत्व पत्करल्यामुळें लोक त्यांना वैष्णव मानीत, तसें त्यांच्या काव्यांत योगसाधनेविषयीं आलेले उल्लेख पाहून ते नाथपंथीय असावेत, असा त्यांचा समज होई! शून्यवादासारख्या विषयाची चर्चा कबीरांनीं केल्यामुळें कांहीं जण त्यांना बौद्ध संप्रदायांत घालीत, तर कांहीं जण त्यांना सूफी संप्रदायाचे कट्टर पुरस्कर्ते मानीत. वस्तुस्थिति अशी आहे कीं, कबीरांना भिन्न भिन्न संप्रदायांतले जे जे विचार ग्राह्य वाटले, त्यांचा त्यांनीं प्रामाणिकपणें पुरस्कार केला.

## सगुण व निर्गुण

कबीरांच्या एकंदर रचनांचा विचार केल्यास ते निर्गुण ब्रह्माचे उपासक असावेत असें दिसतें. तथापि थोडें सूक्ष्म निरीक्षण केल्यास सगुण व निर्गुण अशा दोन्ही प्रकारच्या तत्त्वांच्या पलीकडे असलेल्या अव्यक्त परमात्मतत्त्वावरच त्यांची श्रद्धा स्थिरावल्याचें आपल्या लक्षांत येतें. तसेंच ते अद्वैतवादी होते, हेंहि त्यांच्या काव्यांतील अनेक उल्लेखांवरून सहज सिद्ध होतें. तथापि ब्रह्मप्राप्तीपूर्वी जीव आणि ब्रह्मतत्त्व यांच्यांतील व्यावहारिक दृष्ट्या असलेला भेदहि ते मान्य करतात. यामुळें त्यांचें अद्वैत हें विशिष्टाद्वैताच्या तत्त्वज्ञानाला अधिक जवळचें आहे, असा विद्वानांचा अभिप्राय आहे. श्री. ओझा या मुद्द्याचें विवरण करतांना म्हणतात : आत्मोद्धाराची कास धरणारीं माणसें सामान्यतः लोकस्थितीविषयीं उदासीन असतात. पण कबीर केवळ स्वतःपुरता विचार करणारे, आत्महितावरच सारें लक्ष केंद्रित करणारे, संकुचित वृत्तीचे साधक नव्हते. स्वतःबरोबर विश्वकल्याणहि साधण्याची दुर्दम्य ईर्ष्या त्यांच्या ठिकाणीं वास करीत होती. किंबहुना, जगताच्या उद्धारांतच आत्मोद्धाराचें श्रेय अनुस्यूत असल्याचा विश्वास बाळगण्याइतकी आत्मौपम्य वृत्ति त्यांच्या ठिकाणीं बाणली होती. हिंदु-मुसलमानांतील तेढ पाहून कबीरांना मनस्वी दुःख होई. धर्मांच्या नांवाखालीं दोन्ही समाजांतील ढोंगी व्यक्तींकडून होणारे अनाचार त्यांना अस्वस्थ करून सोडीत असत. त्यांनीं अनेक पदांतून व दोह्यांतून समाजांतील दांभिक, पोकळ आचाराविचारांची सडकून हजेरी घेतली आहे.

**जात पात पूछै नहिं कोई । हरि को भजै सो हरि का होई ।**

अशी त्यांची शिकवण होती. बाह्य अवडंबरापेक्षां मानसिक शुद्धता राखल्यानें व रामनामाचा जप केल्यानें मनुष्य मोक्षाचा अधिकारी होऊं शकतो, असा ते सर्वांना कळवळून उपदेश करीत. कटु वाक्‌ताडनानें अंतःकरणाला होणारी वेदना ही हिंसेंतच गणली जावी, असें मानण्याइतकें त्यांचें मन कोमल होतें.

सर्व धर्मांच्या, सर्व पंथांच्या समाजांना मानवताधर्माच्या एकाच पातळीवर आणायचा प्रयत्न करणाऱ्या महात्म्यांत कबीरांचें स्थान सदैव उच्च राहील; यांत बिलकुल शंका नाहीं.

* * *

[ १३ ]

# पौराणिक कथावाङ्मयावर प्राकृताचा साज चढविणारा लोकप्रिय कवि
# श्री ध र

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

रसाळ वर्णनशैलीनें महाराष्ट्रीयांचीं अंतःकरणें जिंकून अमाप लोकप्रियता मिळविणारा कवि म्हणून श्रीधराचा उल्लेख करावा लागेल. रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप हे ग्रंथ ज्याला ऐकून ठाऊक नाहींत, असा एकहि मनुष्य उभ्या महाराष्ट्रांत शोधूनहि सांपडणार नाहीं ! सुशिक्षित-अशिक्षित, ब्राह्मण-अब्राह्मण वगैरे साऱ्याच प्रकारच्या लोकांवर या कवीनें गेलीं अडीचशें वर्षें मोठी विलक्षण मोहिनी घातली आहे.

श्रीधरला ही उदंड लोकप्रियता कोणत्या कारणानें लाभली ? आबाल-वृद्धांना, स्त्रीपुरुषांना आकृष्ट करणारा असा कोणता गुण, कोणती शक्ति या कवीच्या ठिकाणीं वास करीत होती ? प्रसाद, रसाळपणा हेंच या प्रश्नाचें उत्तर द्यावें लागेल. श्रीधरांच्या अमृतमधुर वाणीविषयीं प्रशंसोद्गार काढतांना महाराष्ट्रसारस्वतकार भावे म्हणतात, “ श्रीधराच्या गोड वाणीची माधुरी ज्यानें मुळींच चाखिली नाहीं असा अभागी देह – स्त्री किंवा पुरुष – महाराष्ट्रांत कोठेंहि सांपडावयाचा नाहीं. आमच्या अठरापगड जातींत सर्वांचा आवडता, संसारतापानें तापलेल्या अनाथांचें मनरंजन करून त्यांचें चित्त परमेश्वराकडे लावणारा, सर्वांच्या संकटकाळांतला एक तऱ्हेनें आधार असा, श्रीधरस्वामींशिवाय दुसरा ग्रंथकार नाहीं.”

महाराष्ट्रांतील इतर संतकवींनीं महाभारत-भागवतादि पुराणांच्या आधारानें ज्या कथांवर काव्याचा साज चढविला त्याच विषयावर श्रीधरांनींहि ग्रंथरचना केली. पण इतर कवींच्या तुलनेनें श्रीधरांच्या वांट्याला आलेली लोकप्रियता लक्षांत घेतली म्हणजे महाराष्ट्रसारस्वतकारांनीं त्यांच्या काव्य-वाणींतील माधुर्याची मुक्तकंठानें केलेली प्रशंसा यथार्थ असल्याची खात्री पटूं लागते.

## सुबोध लेखनशैली

रसाळ, प्रसन्न, सुबोध लेखनशैलीशिवाय संस्कृत वाङ्मयाचा व्यासंग, उपमा-उत्प्रेक्षादि अलंकारयोजनेतील चातुर्य, प्रसंगवर्णनांतले बारकावे वगैरे गुणांमुळें श्रीधरांच्या काव्याला शोभा आली आहे यांत शंका नाहीं; तथापि त्यांचें एकंदर साहित्य वाचल्यानंतर मनावर ठसा शिल्लक राहतो तो त्यांच्या रसाळ, मधुर वाणीचाच. आज घरोघर श्रीधरांच्या शिवलीलामृत, पांडवप्रताप इत्यादि ग्रंथांचीं पारायणें होतात त्याला कारण साहित्यविषयक अभिरुचीपेक्षां सामान्य जनांचा भाविक दृष्टिकोन असूं शकेल, पण या भाविकांच्या वृत्तीला आवाहन करणारी असामान्य रसवत्ता श्रीधरांना लाभली होती, हें कुणालाहि कबूल करावें लागेल. एरव्हीं श्रीधरांपूर्वींच्या व नंतरच्याहि कांहीं कवींनीं महाभारतावर मराठी वेषभूषा चढविली असूनहि भाविकांना त्याविषयीं फारसें आकर्षण न वाटतां पांडवप्रतापावरच त्यांनीं लुब्ध कां व्हावें? अनेक नव्या-जुन्या कवींनीं रामाचें व कृष्णाचें चरित्र काव्यांत गोवलें असूनहि श्रीधरांच्या रामविजयावर व हरिविजयावरच लोकांच्या उड्या कां पडाव्यात?

या मुद्द्याची चिकित्सा करतांना सारस्वतकारांनीं, श्रीधरांच्या सुबोध भाषाशैलीबरोबरच आणखी कांहीं गुणांमुळें त्यांच्या काव्याला बहुजनसमाजाच्या हृदयांत स्थान मिळालें, अशा आशयाचें विधान केलें आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, महाराष्ट्रांतील आबालवृद्ध, स्त्रीपुरुष श्रीधरांच्या काव्यकृतीकडे आकृष्ट झाले ते त्यांच्या व्यक्तिगत शुचिर्भूत चारित्र्यामुळें व त्यांच्या पाठीशीं असलेल्या पूर्वजांच्या पुण्याईमुळें.

कवीच्या वैयक्तिक नीतिमत्तेचा त्याच्या काव्यावर प्रभाव पडत असतो, ही गोष्ट खरी आहे. त्यांतून अध्यात्मपर, नीतिप्रवण साहित्य निर्माण करणाऱ्याच्या ठिकाणीं विशुद्ध चारित्र्याची अपेक्षा कुणीं बाळगली तर तीहि अगदीं स्वाभाविक म्हटली पाहिजे. तथापि साहित्याच्या उत्कृष्टपणाचें अन् चिरंतनत्वाचें तेंच एक गमक मानणें म्हणजे साहित्याच्या मूल्यांविषयीं अज्ञान प्रकट करण्यासारखें आहे. तसेंच पूर्वजांच्या पुण्याईसंबंधीं सारस्वतकारांनीं उपस्थित केलेला मुद्दाहि काव्यगुणांच्या चर्चेंत अप्रस्तुतच समजायला हवा.

ज्या कारणांनीं श्रीधरांना लोकांची प्रीति संपादन करतां आली असें सारस्वतकारांना वाटतें तीं मुक्तेश्वर-मोरोपंतादिकांच्या बाबतींतहि वस्तुतः दृष्टीस पडत नाहींत का ? उत्तम कुलांत जन्म, पूर्वजांची पुण्याई, व्यक्तिगत शुद्ध आचरण यांचा या दोन्ही कवींच्या चरित्रांत आढळ होतो. या दोघांनींहि महाभारतांतील व इतर पुराणांतील आख्यानांचा प्राकृतांत अनुवाद केला आहे; पण श्रीधरांच्या मानानें या उभय कवींना जनतेकडून कमीच पाठिंबा मिळाला, असें स्वतःच सारस्वतकार कबूल करतात. तेव्हां श्रीधरांना लाभलेल्या लोकप्रियतेची त्यांनीं केलेली मीमांसाच ठिसूळ ठरत नाहीं काय ?

सर्वसामान्य स्त्रीपुरुषांना सहज आकलन होईल, त्यांच्या हृदयाला स्पर्श करील, अशा प्रवाही, सुबोध भाषेंत श्रीधरांनीं काव्यरचना केल्यामुळें ती त्यांच्या आदरास पात्र झाली हेंच खरें !

## काव्याचा विस्तार

श्रीधरांच्या काव्यग्रंथांचा विस्तारहि बराच मोठा आहे. हरिविजय, वेदान्तसूर्य, रामविजय, पांडवप्रताप, जैमिनी अश्वमेध, शिवलीलामृत, पांडुरंग-माहात्म्य, व्यंकटेशमाहात्म्य, मल्हारीमाहात्म्य, ज्ञानेश्वरचरित्र इत्यादि लहानमोठे मिळून दहा-बारा ग्रंथ त्यांच्या नांवावर उपलब्ध आहेत. तसेंच अंबिकाउदय, स्फुट प्रकरणें, संस्कृत कविता, पदें वगैरे स्फुट रचनाहि त्यांनीं केली आहे. या सर्वांचा विस्तार सुमारें साठ हजार ओव्यांपर्यंत सहज जाऊं शकेल. या ग्रंथांपैकीं जैमिनी अश्वमेध हा ग्रंथ श्रीधर नांवाच्या दुसऱ्याच कोणातरी कवीचा असावा, असें प्रा. पोतदार यांनीं कांहीं पुराव्यांनिशीं आपलें मत व्यक्त केलें आहे. तसेंच शिवलीलामृतांतील पंधरावा अध्यायहि मूळचा श्रीधरलिखित नसून तो मागाहून दुसऱ्याच कुणातरी कवीनें त्यांत समाविष्ट केला असावा, हें श्री. चांदोरकरांचें मत प्रा. तुळपुळे यांनीं महाराष्ट्रसारस्वताच्या चौथ्या आवृत्तीच्या पुरवणींत नमूद केलें आहे, तेंहि विचारांत घेण्यासारखें आहे.

प्रा. तुळपुळ्यांनीं या पुरवणींत आणखी कांहीं गोष्टींवर प्रकाश पाडला आहे. श्रीधरांचा जन्मकाळ व मृत्युकाळ, त्यांचा संन्यासाश्रम वगैरे कांहीं

दाहकता संध्येच्या स्पर्शानें नाहींशी होऊन त्यांना मृदुलता प्राप्त व्हावी किंवा महावृक्षांना उन्मळून टाकणारा वर्षाकालीन झंझावात वसंताची चाहूल लागतांच जाईजुईच्या कळ्या खुलविण्याइतका हळुवार, रसिक बनावा, तशी अनेकविध शास्त्रांच्या अध्ययनानें प्रगल्भ, प्रौढ बनलेली श्रीधरांची प्रतिभा काव्याच्या प्रांतांत शिरतांच अल्लड युवतीच्या विलोल विभ्रमांची आठवण करून देते !

हीच उपमा आणखी थोडी ताणून श्रीधरांच्या विदग्ध रसवत्तेचें स्वरूप स्पष्ट करावयाचें झालें तर असें म्हणतां येईल कीं, कुलशीलवान, लावण्य-संपन्न स्त्रीला स्वतःच्या सौंदर्याबरोबरच प्रापंचिक कर्तव्यांची जाणीवहि जशी मनांत सदैव वागवावी लागते, तशी श्रीधरांची सुसंस्कृत रसवृत्ति केवळ भाव-विलासांत निमग्न न होतां आत्म्याच्या नि जनतेच्या उन्नयनाचें ध्येय सतत आपल्यासमोर ठेवीत होती. तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन करून श्रीधरांनीं मोठ्या चातुर्यानें आपल्या काव्यांतून तिचे पडसाद उमटविले; परकीयांच्या आक्रमणानें व अत्याचारानें भेदरलेल्या, बावरलेल्या समाजाला कर्तव्योन्मुख करण्याच्या आकांक्षेनें ‘ पांडवप्रतापा’-सारखे पौरुषाला आवाहन करणारे काव्यग्रंथ रचले आणि इहपरकल्याण साधणाऱ्या भक्तिमार्गाचा आपल्या काव्यांतून प्रभावीपणें पुरस्कार केला.

## तत्कालीन परिस्थितीचें चित्र

श्रीधरांच्या काव्यांत तत्कालीन राजकीय स्थितीचें प्रतिबिंब कसें पडलें होतें, हें स्पष्ट करतांना प्रा. जोशी आपल्या ग्रंथांत म्हणतात—

“ वर निर्देशिल्याप्रमाणें श्रीधरकालीन राजकीय स्थितींत शिवाजीचे पराक्रम व राज्याभिषेक, संभाजी व राजाराम यांच्या वेळचें मराठेशाही-वरील संकट व शाहूच्या सुटकेपासून पहिल्या दोन पेशव्यांच्या भरभराटीचा काल यांचा समावेश होतो. श्रीधरांच्या ग्रंथांत तत्कालीन स्वराज्याच्या ध्येयाचें व विजिगीषु वृत्तीचें प्रतिबिंब पडलेलें दिसतें. ”

आणि या विधानाच्या पुष्ट्यर्थ प्रा. जोशी यांनीं, ‘पांडवप्रतापां’तील कांहीं वेचक उदाहरणें दिलीं आहेत. त्यांतील एक-दोन पुढीलप्रमाणें आहेत—

**क्षत्रियधर्म हा साचार । कीं दुर्जन संहारावे समग्र ।**
**दृष्टीं देखता मारक विखार । तोंड आधीं ठेचावें ॥**
**कीं वृश्चिक दृष्टीं देखोन । पादरक्षेनें करिजे चूर्ण ॥**
**परपीडक संहारून । आधीं टाकावे धर्म हा ॥**

श्रीधरांनीं राजकीय स्थितीप्रमाणेंच सामाजिक स्थितीचेंहि अवलोकन केलें होतें, याची पदोपदीं साक्ष मिळते. त्यावेळीं वर्णाश्रमधर्मानुसार समाजाचें व्यवहार होत असत; मूर्ख लोक म्हसोबा, जाखाई, जोखाई वगैरे क्षुद्र देवदेवतांना भजत असत; होमकुंडांत बळी देत; स्मार्त व वैष्णव यांच्यांत तीव्र वैमनस्य होतें; केरळ देशांत जारकर्मादि अनेक प्रकारचे अनाचार चालत (" दक्षिण दिशे समुद्रतीर । केरळ मल्याळ देश थोर । जार-कर्मरीति अपवित्र । तेथें चालत अद्यापि ॥ "), शुभाशुभ शकुनांवर लोक विश्वास ठेवीत; भोंदू गुरु भाबड्या जनतेस लुबाडीत, वगैरे अनेक गोष्टींचा निर्देश त्यांनीं आपल्या काव्यांत केला आहे. आणि हें सारें करीत अस-तांना त्यांनीं काव्यात्मतेची बैठक शेवटपर्यंत कुठेंहि ढळूं दिली नाहीं, हा त्यांच्या ग्रंथनिर्मितीचा सर्वांत प्रमुख विशेष म्हटला पाहिजे. रसिक श्रोत्यांना उद्देशून जें कांहीं सांगायचें तें सुबोध, रसपूर्ण, आकर्षक असायला हवें, हें उद्दिष्ट त्यांनीं केव्हांहि नजरेआड केलें नाहीं.

सुबोध आणि रसाळ निवेदनशैलीमुळें त्यांच्या काव्याला लालित्य आलें, तसें आणखी इतर गुणांचेंहि त्यास साहाय्य झालें. प्रसंगवर्णनांतली उत्कटता, यथोचित अलंकारयोजना, नवरसांचा परिपोष, संभाषणचातुर्य, वास्तवपूर्ण स्वभावचित्रण वगैरे अनेक गुणांमुळें श्रीधरांच्या काव्याची शोभा वृद्धिंगत झाली आहे यांत संशय नाहीं. विशेषतः हरिविजय, रामविजय इत्यादि बहुतेक ग्रंथांना भक्तीची पार्श्वभूमि लाभली असूनहि शृंगार, वीर, करुण, अद्भुत वगैरे रसांचाहि उठाव श्रीधरांनीं मोठ्या कौशल्यानें करावा, ही खचित कौतुकास्पद गोष्ट आहे. संतकवींनीं सामान्यपणें हास्यरसाकडे दुर्लक्ष केलेलें दिसून येतें. पण श्रीधरांनीं याहि रसाची प्रसंगानुरूप बूज राखलेली पाहून विशेष आनंद वाटतो.

## तत्त्वज्ञानविषयक भूमिका

श्रीधरांच्या एकंदर ग्रंथनिर्मितीवरून त्यांच्या तत्त्वज्ञानाचा ठाव घ्यावयाचा झाला तर असें म्हणतां येईल कीं, त्यांना अद्वैत वेदान्त व मायावाद अभिप्रेत असून मोक्षसाधनांत भक्तिमार्गास प्राधान्य देणाऱ्यांपैकीं ते एक होते. प्रत्येक अध्यायाच्या प्रारंभीं येणाऱ्या नमनपर भागांत त्यांनीं वेदान्तविषयक विचारसरणी थोड्याफार प्रमाणांत मांडली आहे. आख्यान-निरूपणाच्या ओघांत पात्रांच्या संभाषणांतूनहि त्यांनीं वेदान्तविषयक विचार स्पष्ट केले आहेत. उदाहरणार्थ, सांदीपनीच्या तोंडीं घातलेले जिवाशिवाच्या स्वरूपा-संबंधींचे किंवा सृष्टीच्या उत्पत्तीविषयींचे विचार, वसिष्ठानें रामास केलेला महावाक्याचा उपदेश, मन्दोदरी व सीता यांच्या भेटींतील वेदान्तमय संवाद, रामानें बिभीषणास केलेला वेदान्तोपदेश अशीं कितीतरी स्थळें उल्लेखितां येतील.

प्रा. चिं. नी. जोशी यांनीं श्रीधरांच्या प्रमुख काव्यग्रंथांची समीक्षा करतांना, स्वतःला ठिकठिकाणीं आढळून आलेल्या वेदान्तविषयक प्रणालींचा मोठ्या साक्षेपानें उल्लेख केला आहे. तो जिज्ञासूंनीं अवश्य पहावा, म्हणजे काव्याप्रमाणेच वेदान्ताच्या क्षेत्रांतहि या कवीचा केवढा थोर अधिकार होता याची स्थूल कल्पना येऊं शकेल.

'वेदान्तसूर्य' हा ग्रंथ तर प्रत्यक्ष वेदान्तविषयक प्रश्नांच्या चर्चेलाच श्रीधरांनीं वाहिला आहे. मायेचें लक्षण कोणतें, पिण्डब्रह्माण्डाची उत्पत्ति व उभारणी कशी झाली, मुमुक्षु साधक यांचीं चिन्हें कोणतीं, इत्यादि प्रकारच्या प्रश्नांचा ऊहापोह सदरहू ग्रंथांत मोठ्या पांडित्यपूर्ण शैलीनें केला आहे. याच विषयावर प्रस्तुत कवीनें 'तत्त्वगीता' नांवाचा काव्यबद्ध ग्रंथ संस्कृतमध्यें लिहिला असल्याचा अलीकडे शोध लागला आहे. वेदान्ता-बरोबरच कवीचें संस्कृत भाषेवरहि केवढें प्रभुत्व होतें, हें या ग्रंथा-वरून सिद्ध होतें.

श्रीधरांनीं संस्कृतमध्येंहि बरीच रचना केली आहे. कांहीं वर्षांपूर्वीं श्री. द. अ. आपटे यांनीं फक्त मोरोपंत व वामन पंडित यांनींच काय ती संस्कृत-मध्यें काव्यरचना केली, श्रीधरानें संस्कृतांत एक ओळहि लिहिली नाहीं

असें एक विधान केलें होतें. पण त्यांचें हें विधान किती निराधार व भ्रममूलक आहे, हें प्रा. जोशी यांनीं आपल्या ग्रंथांत श्रीधरांच्या अनेक संस्कृत रचनांचा उल्लेख करून सिद्ध केलें आहे.

श्रीधरांनीं शिव, राम, कृष्ण, अंबिका, गणेश, सूर्य, महालक्ष्मी वगैरे अनेक देवदेवतांवर संस्कृतमधून स्तोत्रें रचलीं आहेत. शिवाय प्रश्नोत्तर-मालिका, गुरुमहिमा, महावाक्यपंचीकरणम्, राघवाष्टकम्, परंपरा, इत्यादि अनेक लहानमोठीं स्फुट काव्यें रचून त्यांनीं संस्कृत भाषेवरील आपलें प्रभुत्व उत्तम प्रकारें सिद्ध केलें आहे.

श्रीधरांच्या काव्यप्रतिभेची ओळख महाराष्ट्रांतील यच्चयावत् स्त्रीपुरुषांस झालेली आहे. पण त्यांच्या प्रगाढ विद्वत्तेची मात्र आजपर्यंत फारशी कुणीं कदर केली नाहीं. प्रा. चिं. नी. जोशी, कै. नेने, प्रा. तुळपुळे इत्यादींनीं परिश्रमपूर्वक संशोधन करून श्रीधरांचे उपेक्षित ग्रंथ उजेडांत आणले आहेत. महाराष्ट्र त्यांच्या परिश्रमांचें चीज करील यांत शंका नाहीं.

* * *

[ १४ ]

# अध्यात्मिक लोकशाहीचे प्रणेते

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

सध्यांचें युग हें लोकशाहीचें युग म्हणून ओळखण्याचा प्रघात पडला आहे. पण प्रत्यक्षांत पहावें तों राज्ययंत्रणांना फुटणारा लोककल्याणाचा पान्हा हा पूतना मावशीच्या पान्ह्याच्या जातींतला असल्याचा कटु अनुभव प्रत्ययाला येत आहे. सावकाराच्या पेढीच्या भिंतीवर रामदास-तुकारामाचीं बोधवचनें चिकटविलेलीं असलीं तरी त्याच्या जिभेवर व्याज, जप्ती, दामदुप्पट असलेच शब्द सदा रेंगाळत असावेत, तसे आजच्या लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांच्या ओठावर समता, बंधुत्व, समान संधि इत्यादींसारखे शब्द नाचत असले तरी त्यांच्या पोटांत मात्र सत्ता, स्वार्थ, गटबाजी असल्या शब्दांचेंच थैमान चालत असतें यांत शंका नाहीं.

पण भारताच्या इतिहासांत असा तीन-चार शतकांचा एक कालखंड येऊन गेला कीं, ज्या कालावधींत लोकशाहीचें अस्सल, अविकृत, विशुद्ध स्वरूप जनतेस पहावयास मिळालें. ही लोकशाही राजकीय स्वरूपाची नव्हती. अध्यात्माच्या पायावर तिची उभारणी झाली होती. ज्ञानेश्वरांपासून तों तुकारामापर्यंत महाराष्ट्रांत निर्माण झालेल्या संतपरंपरेनें आध्यात्मिक लोकशाही जिवाभावानें रुजविली, जोपासली अन् परिपुष्ट केली. हां हां म्हणतां महाराष्ट्राबाहेरहि या लोकशाहीच्या वेलीचीं पाळेंमुळें विस्तारूं लागून भारतभर तिचा व्याप पसरला. भागवत संप्रदाय किंवा वारकरी संप्रदाय या नांवानें ही लोकशाही ओळखली जाऊं लागली.

अठरापगड जातींच्या लोकांना एकाच भगव्या निशाणाखालीं आणून भगवद्भक्तीची प्रेरणा देणारा भागवत संप्रदाय हा लोकशाहीचा अवतार नव्हे काय ?

महाराष्ट्र भूमींत ज्ञानेश्वरांनीं रुजविलेल्या वारकरी संप्रदायाच्या वल्लरीला खतपाणी घालण्याचें नि तिचा विकास घडवून आणण्याचें कार्य सर्व

जातींतल्या व सर्व थरांतल्या संतांनीं केलें. ब्राह्मण, मराठा, सोनार, शिंपी, तेली, तांबोळी, कुंभार, चांभार, महार या सान्यांनींच एकदिलानें भागवत-धर्मप्रसाराच्या कार्याला हातभार लावला. कांहीं कर्मठांनीं या महान् आक्र-मणाला अपशकुन करण्याचा प्रयत्न केला. नाहीं असें नाहीं. पण ज्ञानदेव, एकनाथमहाराज, समर्थ रामदास यांच्यासारख्या प्रज्ञाभास्करांपुढें मिण-मिणत्या दिवट्यांना कोण विचारणार ?

**कुळजाति वर्ण । हें अवघेंचि गा अकारण ।**
**भलतेणें भावें । मन मज आंतु येतें होआवें ।**
**आलें तरी आघवें । मागील वावो ॥**

असा जातिभेदांच्या वैयर्थ्याबद्दल स्पष्ट अभिप्राय बोलून दाखविणारे ज्ञानेश्वर काय, किंवा—

**भेटो कोणी एक नर । धेड महार चांभार ।**
**त्याचें राखावें अंतर । या नांव भजन ॥**

असा निःसंदिग्ध शब्दांत अंत्यजांविषयींचा समतेचा दृष्टिकोन व्यक्त करणारे समर्थ रामदास काय, किंवा श्राद्धासाठीं शिजविलेलें अन्न ब्राह्मणांच्याहि आधीं भुकेलेल्या महारांना वाढून टाकून कृतींतून भूतदयेचें तत्त्व आविष्कृत करणारे एकनाथ महाराज काय, या साधुश्रेष्ठांच्या समतेच्या तत्त्वज्ञानानें सर्वसामान्य जनता प्रभावित न झाली तरच नवल !

सर्वांना समानतेची शिकवण देऊन भक्तिमार्गास लावणाऱ्या संतांत, आध्यात्मिक लोकशाहीच्या प्रणेत्यांत, विसोबा खेचर, परिसा भागवत, जोगा परमानंद, गोरोबा कुंभार, सांवता माळी, नरहरी सोनार, सेना न्हावी इत्याहि संतकवींचा उल्लेख करणें आवश्यक आहे. यांच्याविषयीं उल्लेख करतांना कै. गं. भा. निरंतरांनीं म्हटलें आहे, "...हे आणि असे असंख्य लोक भक्तिपंथांत दाखल झाले. जात, व्यवसाय, ज्ञान इत्यादि गोष्टींसंबंधींचे भेद या पंथांत विलीन झाले. ही अतिशय महत्त्वाची घटना या काळांत घडून आली...."

कै. ह. भ. प. पांगारकरांनीं या वैष्णववीरांच्या जातिभेदनिरपेक्ष वृत्ति-विषयीं मोठें सुंदर वास्तव विवेचन आपल्या ग्रंथांत केलें आहे. ते म्हणतात, "...वैष्णवांच्या या मेळाव्यांत पुरुष आहेत, स्त्रिया आहेत, ब्राह्मणेतर आहेत, अस्पृश्यहि आहेत. ज्ञानी आहेत व केवळ भक्तीनें मान्य झालेले साधेभोळेहि आहेत. पण सर्व जण जातिकुलादिकांच्या अभिमानापलीकडे गेलेले आहेत. परमात्मसुखापुढें व परस्परप्रेमापुढें त्यांना इतर कसलीहि आठवण नसे...हे सर्व संत संसारी होते व हरीला सर्वस्व वाहिल्यानें त्यांनीं संसारच ब्रह्मरूप करून टाकला होता. महानुभावीयांची भिक्षावृत्ति व संन्यास या संतांना मान्य नव्हता. ते जातिकुलस्वभावें आलेलें संसारकृत्य आनंदानें करीत...सर्वांचें अन्योन्य प्रेम इतकें होतें कीं, कोणीहि कोणाचेहि अभंग उतरून घेत...जोगा परमानंदाची कविता विसोबा खेचर, सांवता माळ्याची काशीबा गुरव व चोखामेळ्याची अनंतभट्ट हे लिहून घेत... भेदभावशून्य एका श्रीहरीच्या परमानंदसुखांत सर्व डोलत असत." म्हणूनच कै. प्रिं. वा. ब. पटवर्धन यांनीं त्या काळांतील वातावरणास अनुलक्षून Spiritual Democracy ( आध्यात्मिक लोकशाही ) हा यथार्थ शब्द-प्रयोग वापरला आहे.

निरनिराळ्या व्यवसायक्षेत्रांत वावरणाऱ्या कवींनीं आपापल्या जाति-वैशिष्ट्यांचा वा धंद्यांतील विशेषांचा उल्लेख करून परमात्म्याच्या स्वरूपाचें, भक्तिमार्गाचें अथवा अध्यात्मिक क्षेत्रांतील गोष्टींचें विवरण करावें, हें स्वाभाविकच म्हटलें पाहिजे. आपापल्या व्यवसायावर वेदान्तपर रूपकें रचणाऱ्या भक्तांत सांवता माळी, नरहरी सोनार, विसोबा खेचर, सेना न्हावी वगैरे कवींचा अवश्य निर्देश करावा लागेल.

केवळ उच्च कुळांत जन्म पावल्याचा अभिमान बाळगणाऱ्यांविषयीं चोखोबा म्हणतात—

**पंचहि भूतांचा एकाचि विटाळ ।**
**अवघाचि मेळ जगीं नांदे ॥ १ ॥**
**तेथें तो सोंवळा वोवळा तो कोण ।**
**विटाळाचें कारण देह मूळ ॥ २ ॥**

आदिअंतीं अवघा विटाळ संचला ।
सोंवळा तो जाला कोण न कळे ।। ३ ।।
चोखा म्हणे मज नवल वाटतें ।
विटाळापरतें आहे कोण ।। ४ ।।

नरहरी सोनारानें केलेलें रूपक कसें मजेदार आहे तें पहा—

देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार ।।
देह बागेसरी जाणें । अंतरात्मा नाम सोनें ।।
त्रिगुणाची करुनी मूस । आंत ओतिला ब्रह्मरस ।।
जीव शिव वारुनी फुंकी । रात्रंदिवस ठोकाठोकी ।।
विवेक हातवडा घेऊन । कामक्रोध केला चूर्ण ।।
मन-बुद्धीची कातरी । रामनाम सोनें चोरी ।।
ज्ञान ताजवा घेऊनी हातीं । दोन्ही अक्षरें जोखिती ।।

सांवता माळ्यालाहि स्वतःच्या कृषिकार्यांतूनच विठ्ठलाचें रूप अवलोकन करणें आवडतें. तो म्हणतो—

कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।।
लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरि ।।
मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ।।
सांवता म्हणे केला मळा । विठ्ठलापायीं गोविला गळा ।।

निरनिराळ्या व्यवसायक्षेत्रांत वावरणाऱ्या या भक्तांपैकीं कोणावरहि अध्ययनाचे फारसे संस्कार झाले नव्हते. आत्मोद्धाराची लालसा, भूतमात्राविषयींचा कळवळा आणि ईश्वरावर अपार श्रद्धा हेंच या संतमंडळींच्या काव्याचें अधिष्ठान होतें. बहुश्रुतपणाची जोड देऊन त्यांनीं आपल्या काव्याचें संगोपन केलें होतें. उपमा-दृष्टान्तासारखे सोपे व सर्वपरिचित अलंकार आपल्या काव्यांतून योजण्याइतकी सौंदर्यदृष्टिहि बहुतेक कवींच्या ठिकाणीं वास करीत होती.

ऊंस डोंगा परी रस नोहे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रंगा ।।
कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा ।। काय० ।।
नदी डोंगी परी जळ नोहे डोंगें ।। काय० ।।

वगैरे चरणांतून चोखोबांनीं दिलेले दृष्टान्त किती चपखल नि मार्मिक आहेत! बाह्य स्वरूपावरून अंतरंगाची परीक्षा करूं पहाणें चुकीचें आहे, हा अनुभव कथन करतांना त्यांनीं ऊंस, धनुष्य व नदी यांचीं उदाहरणें देऊन जशी व्यावहारिक दृष्टि व्यक्त केली, तशी काव्यात्मताहि प्रकट केली यांत शंका नाहीं.

प्रसाद हा तर सर्वच संतकाव्याचा प्रमुख गुण मानतां येईल.

**वैकुंठींचा देव आणूं या कीर्तनीं। विठ्ठल गाऊनी नाचों रंगीं ॥**
**सुखाचा सोहळा करूनी दिवाळी। प्रेमें वनमाळी चित्तीं धरूं ॥**

सांवतां माळ्याच्या या उद्गारांतलें नादमाधुर्य जितकें विलोभनीय आहे तितकाच प्रसादगुणहि चिंतनीय नाहीं काय?

आपापली व्यवसायिक जबाबदारी पार पाडीत हरिभजनांत तल्लीन होणाऱ्या उपरिनिर्दिष्ट संतकवींच्या प्रापंचिक दृष्टिकोनाविषयीं महाराष्ट्रांतील एका विद्वान् महर्षींनीं कांहीं आक्षेप घेतले आहेत. त्यांचें म्हणणें असें कीं, एकनाथांनीं प्रपंचाला परमार्थाच्या पायरीपर्यंत नेऊन पोंचविण्यांत जसें चातुर्य दाखविलें तशी इतर संतकवींना स्वार्थ नि परमार्थ यांची योग्य ती सांगड घालून दाखवितां आली नाहीं. त्यांनीं आपापल्या परीनें स्वतःचे व्यवसाय सांभाळले खरे, पण प्रपंच म्हणजे परमार्थसाधनांतील एक धोंडच होय, असें बहुतेक संतांना वाटत होतें.

नेटका प्रपंच करण्याच्या बाबतींत एकनाथांइतकें यश इतर संतांच्या वांट्याला आलें नसेल, पण यावरून हे सर्व संत प्रापंचिक जबाबदारी टाळूं पहात होते किंवा प्रपंचाची बुद्धिपुरस्सर हेळसांड करीत होते, असा कसा निष्कर्ष काढतां येईल? मोक्षाच्या मार्गांत देह, प्रपंच हे मोठमोठे अडथळे आहेत, ही वेदान्ताची भाषा ज्ञानदेवांपासून तों तुकाराम-रामदासांपर्यंत सर्वच साधुसंतांनीं वापरली आहे. म्हणून ते जीवनाविषयीं उदासीन होते असा तर्क बांधतां येईल का? इतर सामान्य संतकवींबद्दल महर्षि रानड्यांना आक्षेप घ्यावयाचा असेल, तर माझें कांहींच म्हणणें नाहीं. पण चोखोबा, गोरोबा, सांवता माळी, नरहरी सोनार इत्यादि संतकवींना अनुलक्षून त्यांची टीका असेल तर मात्र ती मान्य करणें कठिण आहे.

* * *

# [ १५ ] महाराष्ट्रांतील संत कवयित्री

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

सामान्यतः स्त्रियांचें कार्यक्षेत्र चार भिंतींच्या आंत मर्यादित झालेलें आपण पाहतों. त्यांचें कर्तृत्व पुरुषांनीं सीमित केलें, असा एक आरोप कधीं कधीं कानांवर येत असतो. पण हा वस्तुस्थितीचा विपर्यास आहे. खरी गोष्ट अशी आहे कीं, स्त्रीच्या कर्तृत्वाला निसर्गानेंच प्रारंभापासून कांहीं बंधनें घातलीं आहेत. या बंधनांतच तिच्या व्यक्तिमत्त्वाचें विकसन घडून यावें, असा नियतीचा संकेत आहे. निसर्गानें घालून दिलेल्या या मर्यादा मान्य करण्यांत स्त्रियांचा अवमान आहे असें मुळींच नाहीं. पराक्रमाची लालसा, विजिगीषा, बुद्धिमत्ता हे पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वाला उठाव आणणारे कांहीं विशेष आहेत, तसे वात्सल्य, कोमलता, भावनोत्कटता, सौंदर्य हीं स्त्री-जीवनाचीं ठळक वैशिष्ट्यें गणलीं गेलीं आहेत. मानवी संसाराला दोघांच्याहि गुणविशेषांमुळें शोभा आली आहे. बागेला वृक्षामुळें शोभा येते, तशी वेलीमुळेंहि ती खुलून दिसते. दोघांचींहि कार्यें आपापल्या परीनें सारखींच महत्त्वाचीं आहेत. वेलीचा शाखाविस्तार वृक्षाच्या फांद्यांप्रमाणें विस्तीर्ण नाहीं म्हणून उपयुक्ततेच्या वा सौंदर्याच्या दृष्टीनें ती वृक्षापेक्षां कमी लेखणें हें अज्ञानाचें लक्षण नव्हे का?

मात्र याचा अर्थ असा नव्हे कीं, बौद्धिक वा शारीरिक पराक्रमाच्या क्षेत्रांत स्त्रियांना कधींच विक्रम प्रस्थापित करतां येणार नाहीं, किंवा त्यांना तो करतां आला तरी त्यांनीं त्याच्या भरीस पडूं नये! विशेष कर्तृत्व गाज-विण्याची ज्यांच्या ठिकाणीं धमक आहे, त्यांनीं तिचा अवश्य प्रत्यय आणून द्यावा. आजवर 'कर्तुमकर्तुम्' सामर्थ्याची प्रचीति आणून देणाऱ्या अनेक स्त्रिया जगाच्या पाठीवर होऊन गेल्या. भरतखंडहि याला अपवाद राहिला नाहीं. विद्वत्ता, शौर्य, राजकारण अशा विविध क्षेत्रांत आपल्या असाधारण व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवून अजरामर झालेल्या अनेक स्त्रियांचीं नांवें

सांगतां येण्यासारखीं आहेत. साहित्याच्या नि परमार्थसाधनाच्या क्षेत्रांतहि त्यांनीं दिगंत कीर्ति संपादन केली आहे. पण कांहीं झालें तरी अपवाद म्हणूनच या गोष्टीकडे पहाणें अवश्य आहे. काव्य नि अध्यात्म या दोन्ही क्षेत्रांत असामान्य यश मिळविणाऱ्या मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, वेणाबाई, बहिणाबाई इत्यादि संतकवयित्रींचा अपवाद म्हणूनच विचार करणें वस्तुस्थितीला धरून होणार आहे.

वर उल्लेखिलेल्या संतकवयित्री एकंदर स्त्रीजातीच्या परंपरेला अपवाद आहेत म्हणूनच वाङ्मयाच्या व अध्यात्माच्या क्षेत्रांतलें त्यांचें माहात्म्यहि तसेंच अनन्यसाधारण आहे.

## स्थितप्रज्ञ मुक्ताबाई

महाराष्ट्रांतील आद्य कवयित्रीचा मान महदाइसा ऊर्फ महदंबा या महानुभावपंथीय स्त्रीकडे जात असला तरी महाराष्ट्राची पहिली संतकवयित्री म्हणून मुक्ताबाईचाच उल्लेख करणें इष्ट ठरेल. महदाइसेनें रचलेलीं 'धवळे', 'मातृकीरुक्मिणीस्वयंवर' आणि 'गर्भकांड—ओव्या' (यांपैकीं शेवटची रचना अद्याप अनुपलब्ध आहे.) हीं प्रकरणें काव्य या दृष्टीनें कितीहि महत्त्वाचीं असलीं तरी त्यांची संतकाव्यांत गणना करणें इष्ट ठरणार नाहीं. संतकवयित्रींच्या काव्यविवेचनापुरतीच मी मर्यादा ठरविली असल्यामुळें मुक्ताबाई व इतर संतस्त्रियांच्या वाङ्मयाचा यथामति परामर्श घेण्याचें मीं ठरविलें आहे.

वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षीं वेदान्तांतल्या प्रमेयांवर भाष्य करणाऱ्या स्थितप्रज्ञ योगिनी मुक्ताबाईचें सारें चरित्रच ज्ञानदेवांच्या चरित्रासारखें अद्भुतरम्य आहे यांत शंका नाहीं. किंबहुना निवृत्तिनाथ-ज्ञानदेवादि चारी भावंडांचें अवतारकार्य हें विश्वांतील अनंत अगम्य घटितांपैकीं एक अनाकलनीय, अतर्क्य अशी घटना आहे, हें कुणालाहि सहज मान्य होईल. उपजतच प्रगल्भ, परिणतप्रज्ञेचें देणें लाभलेल्या या भावंडांच्या जीवितकार्याचा जितका जितका विचार करावा, तितकी तितकी बुद्धि स्तिमित होते, वृत्ति

अवाक् बनते. विशेषतः ज्या दुर्धर, प्रतिकूल परिस्थितीचे आघात सहन करून या भावंडांनीं आपल्या वृत्ति अविचलित ठेवल्या ती लक्षांत घेतली म्हणजे विशेषच आश्चर्य वाटूं लागतें ! नुसत्या वृत्ति अविचलित ठेवल्या एवढेंच नव्हे तर साऱ्या विश्वाला आनंदाचें आवार घालण्याची, अवघा संसार आनंदमय करून सोडण्याची दुर्दम्य महत्त्वाकांक्षा या चौघांनीं बाळगावी, ही सर्वांत नवलाची गोष्ट आहे. काळोख गिळून जगाला प्रकाश देणाऱ्या दिव्यासारखी या भावंडांचीं अंतःकरणें परोपकारी होतीं, उदार होतीं !

## ताटी उघडा ज्ञानेश्वरा

मुक्ताबाईच्या नांवावर उपलब्ध असलेली कविता संख्येच्या दृष्टीनें फारशी मोठी नाहीं. पण गुणांच्या बाबतींत कोणाहि प्रतिभासंपन्न कवीच्या काव्याची बरोबरी करील इतकी ती सुंदर नि प्रसन्न आहे. ‘ ताटीचे अभंग ’ म्हणून ओळखले जाणारे मुक्ताबाईचे अभंग तर साऱ्या मराठी वाङ्मयास ललामभूत होतील इतके काव्यगुणांनीं ओथंबलेले आहेत. जगाच्या निर्घृणतेची उबग येऊन वैतागाच्या भरांत स्वतःला कोंडून घेणाऱ्या ज्ञानदेवांची समजूत काढण्याच्या उद्देशानें मुक्ताबाईनीं हे अभंग रचले आहेत. जगाविषयीं अढी न धरतां उदार मनानें त्याचे अपराध संत म्हणविणाऱ्यांनीं आपल्या पोटांत घातले पाहिजेत, अशा आशयाचे ते अभंग आहेत. ज्ञानदेवांहून वयानें लहान असूनहि त्यांना उपदेश करण्यास धजलेल्या या चिमुरड्या कवयित्रीच्या वृत्तींतली धिटाई वाखाणावी कीं एखाद्या जीवन्मुक्ताला शोभणारी तिच्या वाणींतली धीरोदात्तता पाहून तिचें कौतुक करावें, हें ताटीचे अभंग वाचतांना कळेनासें होतें. स्वतःला कोंडून घेऊन रुसून बसलेल्या ज्ञानदेवांना उद्देशून मुक्ताबाई म्हणते—

**योगी पावन मनाचा । साही अपराध जनांचा ॥**
**विश्व रागें झालें वन्ही । संतें सुखें व्हावें पाणी ॥**
**शब्दशस्त्रें झाले क्लेश । संतीं मानावा उपदेश ॥**
**विश्वपट ब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥**

हे ताटीचे अभंग ज्ञानदेवभगिनी मुक्ताबाईचे नसून याच नांवाच्या दुसऱ्या कोणा-तरी कवयित्रीचे असावेत, अशी कै. म. भा. भू. आजगांवकर यांनीं ' महाराष्ट्र-संतकवयित्री ' या ग्रंथांत शंका व्यक्त केली आहे. ताटीच्या अभंगांची भाषा मुक्ताबाईच्या भाषेच्या मानानें बरीच अर्वाचीन वाटते, असें कै. आजगांवकरांचें म्हणणें आहे. शिवाय ताटीच्या अभंगांत इतर अभंगां-तल्याप्रमाणें ' मुक्ताई ' असा स्वतःचा उल्लेख न करतां ज्या अर्थी मुक्ताबाई असा उल्लेख केला आहे, त्या अर्थी ती ज्ञानदेवभगिनीहून दुसरीच कुणी तरी निराळी स्त्री असली पाहिजे, असाहि त्यांनीं एक तर्क केला आहे. कै. आजगांवकरांचे दोन्ही तर्क मला स्वतःला मात्र पटत नाहींत. स्वतःकडे जाणतेपणाची भूमिका घेऊन ज्ञानेश्वरांची समजूत काढण्याचा काल्पनिक खटाटोप कां होईना पण दुसरी कुणी कवयित्री करील असें वाटत नाहीं. भाषेच्या अर्वाचीनत्वाविषयीं कै. आजगांवकरांनीं उपस्थित केलेला मुद्दाहि फारसा पटण्यासारखा नाहीं. कै. आजगांवकरांना मुक्ताबाईच्या इतर अभंगांतली भाषा ताटीच्या अभंगांतील भाषेच्या मानानें बरीच प्राचीन वाटली. पण ताटीच्या अभंगांची भाषा खरोखरच इतकी आधुनिक आहे काय ?

आणि घटकाभर आजगांवकरांचें विधान मान्य केलें तरी मुक्ताबाईच्या काव्यप्रतिभेची ग्वाही देणारे ताटीच्या अभंगांशिवाय आणखी कितीतरी अभंग उदाहरणादाखल उद्‌धृत करतां येतील.

**मुक्तपणें ब्रीद बांधोनिया द्विज । नेणती तें बीज केशव हरि ।।**

वगैरेसारख्या उद्गारांवरून तत्कालीन कर्मठपणाविरुद्ध बंड उभारणाऱ्या ज्ञान-देवादि भावंडांशीं मुक्ताबाईहि सहमत असल्याचें जसें दिसून येतें, तसा तिच्या अभिजात काव्यशक्तीचाहि प्रत्यय येतो.

**मुंगी उडाली आकाशीं । तिणें गिळिलें सूर्यासी ।।**

असें मुक्ताबाईनें एके ठिकाणीं चमत्कृतिपूर्ण रूपक योजून वेदान्तविषयक प्रश्नाचें विवरण केलें आहे. मुक्ताबाईची प्रतिभाहि याच चमत्काराच्या जातींत मोडण्यासारखी आहे, असें म्हटलें तर तें वस्तुस्थितीस सोडून होणार

नाहीं. अध्यात्माच्या क्षेत्रांत नामदेवांचें मडकें कच्चें असल्याचा धीटपणें निर्वाळा देणाऱ्या मुक्ताबाईनें एवढा अधिकार प्राप्त करून घ्यावा, हें एक कोडेंच नव्हे काय ?

**अखंड जयाला देवाचा शेजार । कां रे अहंकार नाहीं गेला ।।**
**मान अपमान वाढविसी हेवा । दिवस असतां दिवा हातीं घेसी ।।**
**परब्रह्मासंगें नित्य तुझा खेळ । आंधळ्याचे डोहाळे कां बा झाले ।।**
**घरीं कामधेनु ताक मागूं जाये । ऐसा व्हाड आहे जगामाजीं ।।**

इतक्या सडेतोड शब्दांनीं नामदेवांच्या अहंकाराचा समाचार घेणारी व त्याला अंतर्मुख बनवून अनन्ययत्नानें सद्‌गुरूची कांस धरावयास लावणारी मुक्ताबाई सामान्य कोटींतील स्त्री म्हणतां येईल का ?

## भावविवश मुक्ताबाई

नामदेवांनंतर चांगदेवांची भेट झाली तेव्हांहि मुक्ताबाईच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाची अशीच चुणूक सर्वांच्या अनुभवास आली. नामदेवांप्रमाणें चांगदेवांनाहि ‘ ग ’ ची बाधा झाल्याचें मुक्ताबाईच्या ध्यानीं आलें तेव्हां ती स्पष्टच म्हणते—

**चौदाशें वरूषें शरीर केलें जतन । बोधावीण शीण वाढविला ।।**
**नाहीं गुरुमंत्र नाहीं उपदेश । परमार्थासि दोष लावियेला ।।**
**स्वहिताचें कारण पडियेलें जेव्हां । शरण आला तेव्हां अलकापुरीं ।।**

अन् काय चमत्कार पहा ! मुक्ताबाईनें घातलेला घाव बरोबर वर्मी बसून चांगदेवांनीं त्याच क्षणीं मनमोकळेपणानें आपल्या अहंतेची कबुली दिली अन् ते म्हणाले—

**मी माझें दुरित आशापाश चित्तीं । मोहो ममता भ्रांति अहंभावें ।।**
**मुक्ताई जीवन चांगया दिधलें । निर्गुणीं साधिलें घर कैसें ।।**

तसेंच “मुक्ताबाई करें लेइलें अंजन । चांगया निधान उपदेशिलें ” वगैरे उद्गारांवरून चांगदेवांवर मुक्ताबाईनेंच अनुग्रह केला असल्याचें स्पष्ट होतें.

चांगदेवांनीं वरील उद्गारांत मुक्ताबाईच्या थोर व्यक्तिमत्त्वाविषयीं जशी ग्वाही दिली, तशी नामदेवांनींहि कांहींशा फटकळ शब्दांत का होईना पण तिचा थोर अधिकार मान्य केला आहे. ते म्हणतात--

**लहानशी मुक्ताबाई जशी सणकांडी । केले देशोधडी महान संत ॥**

नामदेवांसारख्या संतश्रेष्ठाला नि चांगदेवांसारख्या महान् योगी पुरुषाला उपदेश करून ताळ्यावर आणणारी मुक्ताबाई सिद्धावस्थेला पोहोंचलेली अधिकारी स्त्री खरीच, पण स्त्रीसुलभ भावविवशतेला नि जीवनासक्तीलाहि ती पारखी झाली नव्हती, ही विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. ज्ञानदेवांनीं समाधि घेण्याचा आपला मनोदय बोलून दाखविला तेव्हां साहजिकच सर्वांचीं अंतःकरणें व्यथित झालीं. ज्ञानदेवासारख्या भावाला आपण कायमचे अंतरणार, या कल्पनेनें मुक्ताबाई किती शोकाकुल झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी. राग, लोभ, अहंकार हे मिथ्या असल्याचा ज्ञानदेवांना अधिकारवाणीनें उपदेश करणारी वैराग्यशील मुक्ताबाई आतां उरली नव्हती. भावाच्या चिरवियोगाच्या कल्पनेनें ढळढळां रडणाऱ्या सामान्य स्त्रीचें व्यक्तित्त्व तिच्या ठिकाणीं जागृत झालें होतें. 'आतांपर्यंत ममतेनें आपलें पालनपोषण करून लळा लावणारा आपला भाऊ पुन्हा कधीं आपल्या दृष्टीस पडणार ?' या प्रश्नानें विद्ध झालेल्या मुक्ताबाईची अगतिक, असहाय अवस्था आणि त्या अवस्थेंत तिच्या तोंडून बाहेर पडणारी करुणार्त वाणी पाहून ज्याचें अंतःकरण पिळवटून निघणार नाहीं, असा कुणी तरी असूं शकेल का ?

**आम्हां मातापिता नित्य ज्ञानेश्वर । नाहीं आतां थार विश्रांतीला ॥**

या करुणार्त उद्गारांतून प्रत्ययाला येणारी मुक्ताबाईची जीवनाभिमुख वृत्ति सामान्य प्रापंचिकांना तिच्या शोकमोहादिविकारातीत व्यक्तिमत्त्वापेक्षां अधिक जवळची, अधिक परिचयाची वाटते.

मुक्तावस्थेंतून सामान्यांच्या पायरीवर येऊन धाय मोकलून शोक करण्याचा मुक्ताबाईवर ओढवलेला दुसरा प्रसंग याहूनहि हृदयद्रावक आहे. ज्ञानेश्वरांच्या पाटोपाठ थोड्याच दिवसांनीं सोपानदेवांनींहि समाधि घेतली.

मुक्ताबाईच्या चित्ताला अधिकच विषण्णता प्राप्त झाली. चारीकडून आभाळ भरत आल्यावर वातावरण, जसें कुंद उदास वाटावें, तसें तिला आपलें जीवित भकास, शून्य वाटूं लागलें. तेव्हां तिची विषण्णता घालविण्यासाठीं नामदेवांनीं तिला निवृत्तिनाथांसह आपल्या जन्मभूमीच्या गांवीं म्हणजे आपेगांवास जाण्याचा सल्ला दिला. मुक्ताबाई निवृत्तिनाथांसह आपेगांवीं गेली, पण तिथें गेल्यावर तिच्या अंतःकरणांत बाळपणींच्या अनंत स्मृति उचंबळून येऊन ती अधिकच कष्टी झाली. तिची मनःस्थिति वर्णितांना नामदेव म्हणतात—

**निवृत्तीमुक्ताबाईनें पाहुनी स्थळ डोळां । आलासे उमाळा ओसंडोनी ॥**
**तात आणि माता गेलीसे येथूनी । तेव्हां आम्ही लहान पांडुरंगा ॥**
**निवृत्ति ज्ञानेश्वर कोरान्नाचें अन्न । सांभाळी सोपान मजलागीं ॥**
**तुझ्या योगें हरी क्रमियलें काळा । फुटलासे मेळा तापसांचा ॥**

हे त्या वेळीं तिच्या तोंडून बाहेर पडलेले उद्गार किती हृदयस्पर्शी, किती कारुण्यपूर्ण आहेत !

महाराष्ट्रांत मुक्ताबाईपासून सुरू झालेली संतकवयित्रींची परंपरा जनाबाई, सोयराबाई, निर्मळाबाई, बाइयाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई, वेणाबाई, प्रेमाबाई वगैरे स्त्रियांनीं सुमारें तीनशें-साडेतीनशें वर्षेंपर्यंत चालू ठेवली.

## जनाबाई आणि कान्होपात्रा

मुक्ताबाईप्रमाणेंच जनाबाई, सोयराबाई, कान्होपात्रा, वेणाबाई वगैरे कवयित्री निस्सीम भक्तिभाव व प्रासादिक काव्यरचना यांमुळें महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. या सर्वच कवयित्रींच्या काव्यांत स्त्रीसुलभ भावनोत्कटता नि कोमलता यांचा वाचकांना सारखाच प्रत्यय येतो. तसें पाहिलें तर वरील संतकवयित्रींपैकीं कुणाच्याहि ठिकाणीं फारशी व्युत्पन्नता नव्हती, साहित्याचा अगर शास्त्रांचा व्यासंग करण्याची कुणालाहि संधि प्राप्त झाली नव्हती. केवळ उत्कट भक्तिभाव आणि बहुश्रुतपणा यांच्या बळावर त्यांची काव्यसंपदा मराठी वाङ्मयांत अजरामर ठरली यांत शंका नाहीं.

नामदेवांच्या घरीं झाडलोट, सडासारवण करणारी जनी नित्याचीं कामें करीत असतांनाच भक्तिपर अभंग रचून स्वत:शीं गुणगुणे. काव्यनिर्मितीच्या अलौकिक आनंदाचा आस्वाद घेतांना तिला कष्टाचा आपोआपच विसर पडे आणि प्रत्यक्ष पांडुरंगच अदृश्य रूपानें आपल्या साहाय्याला येऊन आपल्या कामांचा भार हलका करतो, अशी ती श्रद्धा बाळगी. जनाबाईच्या श्रद्धेंतलें मर्म ध्यानांत न घेतां भाबड्या भक्तांनीं प्रत्यक्ष ईश्वरच नामदेवांच्या घरीं येऊन धुणेंपाणी करीत असे, असें बुद्धीला न पटणारें वर्णन करून ठेवलें आहे. योगसाधनेच्या बळावर साधुसंतांनीं मानवी बुद्धीला अनाकलनीय असे चमत्कार करून दाखवल्याचीं पुष्कळ उदाहरणें आहेत. पण जनाबाईचा योगविद्येशीं कधींच परिचय झाला नव्हता. ती एक साधीभोळी निरक्षर स्त्री होती. परमेश्वराच्या ठिकाणीं दृढ श्रद्धा ठेवून प्राप्त कर्म आचरीत राहणें हाच तिच्या जीवितकार्याचा असाधारण विशेष होता. एवढ्यावर समाधान न पावून तिचें महत्त्व वाढवण्याच्या हेतूनें तिच्या चरित्राला चमत्कारांची जोड देणें हा शुद्ध भोळसटपणा आहे, असें स्पष्ट म्हणावेंसें वाटतें. दिवाळीच्या सणाच्या दिवशीं नामयानें देवाचा हात धरून त्यास आपल्या घरीं अभ्यंगस्नानासाठीं आणलें, गोणाईनें त्याला उटणीं वगैरे लावून ओवाळलें, अशा अर्थाचे अनेक चमत्कार जनाबाईनें आपल्या अभंगांतून वर्णन केले असले तरी ते सारे लाक्षणिक अर्थानेंच विचारांत घ्यावयास हवेत.

जनाबाईच्या नांवावर तीनशें अभंग प्रसिद्ध असून त्यांत तिच्या नांवावर घुसडलेल्या बनावट अभंगांचाच भरणा फार आहे, असें कै. आजगांवकरांनीं म्हटलें आहे. द्रौपदीवस्त्रहरणाच्या प्रसंगावरील अभंग किंवा देवानें आपणांसाठीं नाना रूपें घेतल्याचा व आपलीं कामें केल्याचा उल्लेख असलेले अभंग जनाबाईचे नसावेत, असें त्यांचें मत आहे. खुद्द जनाबाईचे म्हणून म्हणतां येतील असे कांहीं विश्वसनीय, निवडक अभंग त्यांनीं आपल्या ग्रंथांत उद्धृत केले आहेत. हे अभंग पांच-पंचवीसच असले तरी तेवढ्यावरूनहि जनाबाईच्या प्रासादिक, रसाळ वाणीची चांगलीच प्रचीति येते.

शूद्र कुळांत जन्म पावूनहि जनाबाईनें मराठी साहित्यास भूषणभूत ठरेल अशी काव्यसंपदा निर्माण केली, तशी कान्होपात्राहि उच्च कुळांत जन्मली

नसूनहि तिनें महाराष्ट्र-सारस्वताची शोभा वाढवील अशी भक्तिरसपूर्ण सहजसुंदर कविता रचली. वेश्येच्या कुळांत जन्म पावूनहि तिनें पार्थिव सौंदर्याऐवजीं आत्म्याच्या सौंदर्याची विशेष काळजी वहावी, शृंगाराऐवजीं भक्तिरसाला जीवनांत प्राधान्य देऊन त्याच्या परिपोषांत आयुष्याचा क्षणन् क्षण वेंचावा, ही जितकी आश्चर्याची तितकीच कौतुकाची गोष्ट आहे. " दीन पतित अन्यायी ", " जन्मांतरीचें सुकृत आजि फळासि आलें ", " माझें माहेर पंढरी ", " वर्म वैरियाचे हातीं । देऊं नको गा श्रीपती ॥ " वगैरे-सारखे जिव्हाळ्यानें भरलेले अभंग वाचतांना कान्होपात्रेच्या ऋजु, निर-हंकारी अंतर्यामाचें दर्शन घडल्यावांचून रहात नाहीं.

## थोर परंपरेचा वारसा

शूद्र जातींत जन्म पावून कवयित्री म्हणून संतमंडळींत मानाचें स्थान मिळविणारी आणखी एक स्त्री म्हटली म्हणजे सोयराबाई ही होय. ही चोखामेळ्याची पत्नी.

**येई येई गरुडध्वजा । विटेसहित करीन पूजा ॥**
**नाहीं उरली वासना । तुम्हां पाहतां नारायणा ॥**
**अवघा एक झाला रंग । रंगीं रंगला श्रीरंग ॥**

इत्यादि अभंगांवरून चपखल शब्दयोजनेच्या बाबतींतलें तिचें कौशल्य सहज मनांत भरतें. " उदारा पंढरिराया नको अंत पाहूं ", " आजि माझा सर्व पुरला नवस ", इत्यादि अभंगांतील अर्थपूर्ण शब्दांच्या योजने-बरोबरच त्यांतून उत्पन्न होणारें नादमाधुर्यहि रसिकांना आकृष्ट केल्यावांचून रहात नाहीं. चोखामेळ्याची बहीण निर्मळा हिच्या नांवावरहि कांहीं अभंग प्रसिद्ध आहेत.

मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, सोयराबाई इत्यादि कवयित्रींच्या अभंगांप्रमाणें निर्मळेच्या अभंगांतहि भरपूर गोडवा, प्रेमळपणा नि साधेपणा आढळून येतो. वानगीदाखल या कवियित्रीचा एकच अभंग इथें देतों—

**नाहीं मज आशा आणिक कोणाची । स्तुति मानवाची करून काय ॥१॥**
**काय हे देतिल नाशवंत सारे । यांचें या विचारें यांसी न पुरे ॥२॥**
**ऐसें ज्याचें देणें कल्पांतीं न सरे । तेंचि एक वरें आम्हांलागीं ॥३॥**
**जो भक्तांचा विसांवा वैकुंठनिवासी । असे पंढरीसी उभा विटे ॥४॥**
**निर्मळा म्हणे सुखाचा सागर । लावण्य आगर रूप ज्याचें ॥ ५ ॥**

लिहिण्यावाचण्याचे संस्कार नसतांहि अशी प्रसादपूर्ण रचना करणाऱ्या सोयराबाईची काव्यप्रतिभा अभिजात नव्हती असें कोण म्हणेल ?

तुकाराममहाराजांची शिष्या बहिणाबाई आणि समर्थ रामदासांची शिष्या वेणाबाई यांच्या कवित्वासहि याच प्रासादिकतेमुळें संतकाव्यांत बहुमानाचें स्थान प्राप्त झालें आहे. संत बहिणाबाईचें तर सारें चरित्रच तिच्या काव्याप्रमाणें चित्तवेधक आहे. पूर्वजन्माच्या सिद्धान्तावर प्रकाश पाडतील, निदान त्या सिद्धान्तास बळकटी आणतील, अशा कांहीं अद्भुत घटना या कवयित्रीच्या आयुष्यांत घडल्या आहेत. कै. शि. म. परांजपे, कै. आजगांवकर इत्यादि लेखकांनीं आपापल्या ग्रंथांत यासंबंधीं सविस्तर ऊहापोह केला आहे. कट्टर नास्तिकाच्याहि अंतःकरणास पाझर फोडतील व त्यास विचार करावयास लावतील अशा या विलक्षण घटना आहेत.

सारांश, संतकवींप्रमाणें संतकवियत्रींनींहि भक्तिरसाला आपल्या काव्यांत प्रमुख स्थान देऊन मराठी साहित्याचें सामर्थ्य व वैभव वृद्धिंगत केलें आहे. हें कुणीहि मान्य करील.

* * *

REFBK-0010901

१०९०१